# गीताबोध

(मराठी)

मो. क. गांधी



नवजीवन

# गीताबोध

मो. क. गांधी

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

प्रकाशक
नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.

**वीस रुपये**

© नवजीवन ट्रस्ट, २०१३

पहिली आवृत्ति, प्रति ३,०००, अगस्त २०१३

ISBN 978-81-7229-475-5

मुद्रक व प्रकाशक
विवेक जितेन्द्रभाई देसाई
नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद - ३८० ०१४
फोन: ०७९-२७५४०६३५
Email: jitnavjivan10@gmail.com
Website: www.navajivantrust.org

## प्रस्तावना

आश्रमवासीयांकरिता येरवडा जेलमधून गांधीजी दर आठवड्याला गीतेच्या एकेका अध्यायाचा सार लिहून पाठवत असत. त्याची सुरुवात त्यांनी गीतेच्या बाराव्या अध्यायापासून केली. त्यावेळी गांधीजींनी लिहिले - हा भक्तियोग आहे. विवाहाच्या वेळी दांपत्याला जे पाच यज्ञ (सात) करावे लागतात त्यात एक यज्ञ म्हणून या अध्यायाचे पाठांतर करावे लागते. भक्तीशिवाय ज्ञान आणि कर्म शुष्क आहे आणि ते बंधनरूप होण्याची शक्यता असते. म्हणून भक्तिपूर्ण अंतःकरणाने गीतेच्या या अध्यायापासून सुरुवात करतो. रूढ विवाहात सप्तपदी होत असते. गांधीजींनी त्या ठिकाणी पुढील सात यज्ञ करण्याकरिता सुचवले होते. ते असे -

ज्यांचा पतिपत्नी म्हणून संबंध येणार असतो त्यांच्याकरिता गांधीजींनी पुढील सात यज्ञांचा उल्लेख केला आहे.

१) विवाहविधी सुरू होण्याआधी दोघांनीही व्रत घेऊन उपवास करावा. (इच्छा असेल तर फलाहार करू शकतात.)

२) दोघांनीही वेगवेगळ्या ठिकाणी भूमीसेवा आणि वृक्षसेवा म्हणून वृक्षाच्या आसपासची जमीन प्रेमाने साफ करावी आणि वृक्षांना पाणी घालावे.

३) जलाशयशुद्धी - विहीर वा तलाव यांच्या आजुबाजूचा चिखल साफ करून पाण्यातील कचरा काढावा आणि पाणीही स्वच्छ करावे.

४) गोशाळेत जाऊन गायीची सेवा करावी.

५) मुत्री आणि संडास साफ करावे.

६) सूत्रयज्ञ - टकळीवर वा चरख्यावर सूत कातावे आणि रोज कताई करण्याचा संकल्प सोडावा.

७) श्रीमदभगवद्‌गीतेच्या १२व्या अध्यायाचा अर्थ समजून घेऊन तो पाठ करावा.

विवाहाआधी हे सात यज्ञ केल्यानंतरच गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची अट मला मान्य आहे.

गृहस्थाश्रमाच्या सिद्धीकरिता हे सात यज्ञ करावेत अशी अपेक्षा आहे.

गीताबोधचे काही अध्याय गांधीजींनी सन १९३०मध्ये लिहिले होते. उरलेले अध्याय १९३२ साली तुरुंगात असताना पूर्ण केले. अशा प्रकारे गीतेचे हे चिंतन ४-११-१९३० पासून २१-२-१९३२पर्यंत सुरू होते.

अठरा अध्यायांचा सारांश वेगवेगळा सांगितल्यानंतर संपूर्ण गीतेचे सार एकदम सांगण्याचा गांधीजींचा विचार होता. त्याकरिता गांधीजींना वेळ मिळाला नाही. त्यामुळे तो सारांश 'गीताबोध'बरोबर भविष्यात देण्यात येईल.

संपादक

## ऋणनिर्देश

श्रीयुत टीआरके सोमैय्याजी यांनी गांधीजींच्या गीताबोधच्या अनुवादाची संधी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. गुजरातीतून हा अनुवाद करताना श्रीयुत वालजी गोविंदजी देसाई यांनी केलेल्या अनुवादाचेही मला मार्गदर्शन झाले. तसेच त्यांनी लिहिलेल्या टीपांचाही मी या अनुवादामध्ये समावेश केला आहे. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

नवजीवन प्रकाशनाच्या संचालक मंडळाचाही मी आभारी आहे.

ब्रिजमोहन हेडा

सॅन होजे, अमेरिका

९-४-२०१२

# भूमिका

'...आश्रमात पाळल्या जाणा-या व्रतांविषयी, यज्ञाविषयी आणि व्रतांच्या आवश्यकतेविषयी आपल्याकडे चौकशी करण्यात आली. या पुस्तकाचे आपण पंधरवडाभर दररोज थोडे थोडे करून पारायण केले पाहिजे आणि मनन केले पाहिजे. आपणा सर्वांना आध्यात्मिक दीपस्तंभ म्हणून त्याचा उपयोग होईल. त्याचा जसा अर्थ मला कळला तसाच मी इथे विचाराकरिता मांडला आहे. असा विचार एका पत्रामुळे आधीच माझ्या मनात आला होता. परंतु गेल्या आठवड्यातील भाईं....च्या पत्रामुळे माझा निश्चय अजूनच दृढावला. त्यांनी लिहिले होते की, 'मी अनासक्तियोग वाचतो परंतु तो समजून घेणे कठीण होते. त्यामुळे तो समजेल अशा भाषेत त्याचा अर्थ सांगा. शब्दशः अनुवाद केल्यामुळे अडचण तर जाणवतेच. जर विषयच कठीण असला तर सोपी भाषा काय करणार? त्यामुळे विषयच सोप्या भाषेत मांडण्याचे ठरवले आहे. ज्या वस्तूचा दर वेळी आपल्याला उपयोग करायचा असतो, ज्याच्या मदतीने आपल्या अंतःकरणातील अनेक गुंतागुंत सोडवण्याचा प्रयत्न करायचा असतो, तो ग्रंथ ज्या कोणत्या पद्धतीने समजू शकेल त्या पद्धतीने समजून घेण्याचा आणि त्याचे वारंवार मनन करण्याचा प्रयत्न केला तर अखेरीस आपण त्या ग्रंथाशी एकरूप होऊ शकतो. मी तर माझ्या अनेक अडचणीच्या प्रसंगी गीतामातेजवळ धावत जातो आणि आजपर्यंत मला तिच्याकडून नेहमीच आधार मिळत आला आहे. माझ्याप्रमाणेच गीतेची मदत हवी असणारे इतरही लोक असू शकतील. मी दररोज गीता समजून घेण्याचा प्रयत्न करतो व मला गीतेचा जो अर्थ जाणवतो त्याची मदत अशा लोकांना होऊ शकेल. ते करत असताना त्यांना गीतेचा काही नवीनच अर्थ गवसणे अशक्य नाही.

४-११-'३०, येरवडा जेल. मो. क. गांधी

## प्रास्ताविक

गीता हा महाभारतातील एक लहानसा विभाग आहे. महाभारत हा ऐतिहासिक ग्रंथ आहे असे समजले जाते. परंतु आपल्याकरिता रामायण आणि महाभारत हे ऐतिहासिक ग्रंथ नसून धार्मिक ग्रंथ आहेत आणि त्यांना ऐतिहासिक म्हणायचेच असेल तर तो आत्म्याचा इतिहास आहे आणि त्यात हजारो वर्षांपूर्वी जे घडले त्याचा इतिहास नाही तर आज प्रत्येक मनुष्याच्या देहात काय सुरू आहे याचे चित्रण करण्यात आले आहे. महाभारत आणि रामायण या दोन्ही ग्रंथांत देव आणि असुर - राम आणि रावण यांच्यामध्ये दररोज सुरू असलेल्या संघर्षाचे वर्णन आहे. या वर्णनात कृष्ण आणि अर्जुन यांच्यामधील संवाद आहे. त्या संवादाचे वर्णन संजय अंध धृतराष्ट्राजवळ करत असतो. अशा रीतीने गीता लिहिण्यात आली. हिच्यात उपनिषद अध्याहृत आहे. यामुळे हिचा सर्व अर्थ उपनिषदावर आधारित आहे, अशा प्रकारे गीतेचा अर्थ श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला बोध असा होतो. असे समजून आपण गीता वाचली पाहिजे. आपल्या देहात अंतर्यामी श्रीकृष्ण भगवान आजही वसत आहेत आणि जिज्ञासू अर्जुनाचे रूप घेऊन धर्मसंकटात सापडलेला अंतर्यामी भगवान श्रीकृष्णाला विचारतो, त्याला तो आपले सर्वस्व अर्पायला तयार असतो. आपण झोपलेलो असलो तरी तो अंतर्यामी सदैव जागाच असतो. आपल्यामधील जिज्ञासेची तो वाट पाहत बसलेला असतो. परंतु आपल्याला तर प्रश्न विचारणेच आवडत नाही. प्रश्न विचारणारे मनसुद्धा आपल्याजवळ नसते. त्यामुळे गीतेसारख्या पुस्तकाचे रोज ध्यान केले पाहिजे. तिचे मनन करता करता आपल्यामध्ये धर्मजिज्ञासा निर्माण केली पाहिजे. प्रश्न विचारणे शिकले पाहिजे. आपण अडचणीमध्ये सापडतो तेव्हा ती दूर करण्याकरिता आपण गीतेकडे धावत गेलो पाहिजे आणि तिच्याकडून दिलासा मिळवला पाहिजे. या दृष्टीने गीता वाचली पाहिजे. ती आपल्याकरिता

सद्‌गुरुचे रूप असते, माता असते आणि आपल्याला हवे असेल तेव्हा आपण तिच्या मांडीवर डोके टेकवून आश्वस्त होऊन राहू शकतो. गीतेजवळ आपल्या सर्व धार्मिक प्रश्नांचा गुंता सोडवण्याची शक्ती आहे. अशा प्रकारे रोज जो गीतेचे मनन करतो त्याला त्यामध्ये रोज नवीन आनंद मिळेल, नवीन अर्थ आढळेल. धर्मातील अशी एकही समस्या नाही जिचे उत्तर गीतेजवळ नाही. आपल्या श्रद्धेच्या अपुरेपणामुळे आपल्याला तिचे वाचन करणे, ती समजून घेणे आवडत नसेल तर ती गोष्ट वेगळी. परंतु आपली श्रद्धा रोज वाढत जावी, आपण सावध राहिलो पाहिजे म्हणून आपण गीतेचे वाचन रोज केले पाहिजे. अशा प्रकारे गीतेचे मनन करता करता जो काही अर्थ मिळत गेला त्याचे सार मी आश्रमवासीयांच्या मदतीकरिता सांगतो आहे.

## वाचकांना

माझ्या लेखनाच्या मेहनती वाचकांना आणि माझ्या लेखनात रस असलेल्या इतरांनाही मी सांगू इच्छितो की जे काही मी लिहितो त्या लेखनाची माझ्या पूर्वीच्या लेखनाशी सुसंगती असलीच पाहिजे असे माझे मत नाही. माझ्या सत्याच्या शोधात निरुपयोगी वा चुकीचे म्हणून मी अनेक विचार टाकून दिले आहेत आणि अनेक नवीन गोष्टी शिकलो आहे. मी जरी वयाने म्हातारा झालो असलो तरी माझी आंतरिक वाढ खुंटली आहे वा माझ्या मृत्यूनंतर ती थांबेल असे मला वाटत नाही. मला काळजी आहे ती सत्याची, माझ्या ईश्वराची, ज्या क्षणी जी काही हाक येईल तिचे पालन करण्याकरिता माझी तयारी असली पाहिजे याची. त्यामुळे माझ्या दोन वेळेच्या लेखनात जेव्हा कोणाला विसंगती आढळेल तेव्हाही त्याचा माझ्या शहाणपणावर विश्वास असेल तर त्यांनी विषयावरील माझ्या लेखनातील नंतरचा भाग निवडावा.

मो. क. गांधी

हरिजन, २४-४-३३, पृष्ठ २.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ३ |
| | भूमिका | ५ |
| | प्रास्ताविक | ६ |
| १. | अध्याय १ | १० |
| २. | अध्याय २ | १२ |
| ३. | अध्याय ३ | १७ |
| ४. | अध्याय ४ | २४ |
| ५. | अध्याय ५ | ३६ |
| ६. | अध्याय ६ | ४१ |
| ७. | अध्याय ७ | ४५ |
| ८. | अध्याय ८ | ४७ |
| ९. | अध्याय ९ | ५० |
| १०. | अध्याय १० | ५४ |
| ११. | अध्याय ११ | ५६ |
| १२. | अध्याय १२ | ५९ |
| १३. | अध्याय १३ | ६३ |
| १४. | अध्याय १४ | ६५ |
| १५. | अध्याय १५ | ६८ |
| १६. | अध्याय १६ | ७० |
| १७. | अध्याय १७ | ७२ |
| १८. | अध्याय १८ | ७४ |
| १९. | अनुवादकाच्या टिपा | ८१ |
| २०. | संदर्भग्रंथ सूची | ८८ |




## अध्याय पहिला

दिनांक ११ नोव्हेंबर १९३०

मंगलप्रभात

कुरुक्षेत्राच्या (कुरुंचे क्षेत्र) रणभूमीवर जेव्हा पांडव आणि कौरव आपल्या सैन्यासह गोळा झाले तेव्हा कौरवांचा राजा दुर्योधन गुरू द्रोणाचार्यांकडे (युद्धकलेतील त्याचे शिक्षक) गेला व आपल्या निवडक योद्ध्यांचे वर्णन करू लागला. युद्ध सुरू होण्याची सूचना म्हणून दोन्ही बाजूच्या लोकांनी शंखध्वनी करायला सुरुवात केली. त्याचवेळी अर्जुनाचा सारथी असलेल्या श्रीकृष्णाने अर्जुनाचा रथ दोन्हीकडील सैन्यांच्या मध्यभागी नेऊन उभा केला. तिथे दिसलेल्या दृश्यामुळे अर्जुनाचा धीर सुटला आणि तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'मी यांच्याशी युद्ध कसा काय करू शकतो? परक्या लोकांशी मला लढायचे असते तर मी लढण्याकरिता सहज तयार झालो असतो, परंतु हे तर माझेच स्वजन आहेत, हे माझेच लोक आहेत. कौरव कोण आणि पांडव कोण?' हे तर सख्खे चुलत भाऊ आहेत. आम्ही सर्व एकत्र खेळलेलो आहोत. द्रोणाचार्य केवळ कौरवांचे आचार्य थोडेच आहेत? त्यांनी आम्हालाही विद्या शिकवली आहे. भीष्म पितामह हे आम्हा दोन्ही पक्षाचे सन्माननीय पूर्वज आहेत. त्यांच्याशी युद्ध कसे? मला मान्य आहे की कौरवांनी अन्याय केला आहे, त्यांनी दुष्ट कर्म केले आहे. त्यांनी पांडवांची भूमी हडप केली आहे. द्रौपदीसारख्या साध्वीला अपमानित केले आहे. हे सर्व त्यांचे दोष आहेत हे खरे आहे. परंतु त्यांना मारून मी काय मिळवणार आहे? ते तर मूर्ख आहेत. त्यांच्याप्रमाणे मीही मूर्खपणा करू शकत नाही. परंतु मला तर थोडे फार कळते आहे ना. मला सारासारविवेक आहे. काय चूक आणि काय बरोबर ते मला कळते. अशा प्रकारे आता मला वाटते की नातलगांबरोबर युद्ध करणे पाप आहे. कौरवांनी जरी राज्यातील आमचा हिस्सा अन्यायाने बळकावलेला असला, त्यांनी जरी आम्हाला मारण्याचे ठरवले असले तरी आम्ही त्यांच्याशी युद्ध कसे काय करणार? त्यांच्या

विरोधात मी कसा काय हात उगारू शकतो? हे कृष्णा माझ्याच रक्ताच्या माझ्या या नातलगांबरोबर मी युद्ध करू शकत नाही. असे म्हणून विचलित होऊन अतिशय व्यथित अंतःकरणाने अर्जुन रथात आपल्या जागेवर बसला.

(इथे पहिला अध्याय संपतो. त्याचे नाव 'अर्जुनविषादयोग' आहे. अर्जुनाप्रमाणेच आपणा सर्वांनाही अर्जुनाच्या वेदना जाणवल्या पाहिजेत. धर्मवेदना, धर्मजिज्ञासा यांच्याशिवाय ज्ञान मिळू शकत नाही. ज्याच्या मनात मी जसा आहे तसाच चांगला आहे, ईश्वराने मला जसे ठेवले तशात मी समाधानी आहे ही भावना नसेल त्याच्याशी धर्मचर्चा कशी? काय चांगले आणि काय वाईट हे जाणून घेण्याची इच्छाच माणसाला नसेल तर त्याला धर्माचा काय उपयोग?

कुरुक्षेत्रातील लढाई ही केवळ निमित्त आहे. खरे कुरुक्षेत्र माणसाच्या अंतःकरणात आहे. जर त्याच्याकडे आपण ईश्वराचे निवासस्थान म्हणून पाहिले आणि त्याला तिथे राहण्याकरिता बोलावले तर तेच धर्मक्षेत्रही होते. या युद्धभूमीवर दररोज कोणती ना कोणती लढाई सुरूच असते. त्यातील बहुतेक लढाया 'माझे' आणि 'तुझे' याकरिता होत असतात. त्यामुळे, कसे ते नंतर आपण पाहणारच आहोत, या सर्व गोष्टींकरिता मोह आणि द्वेष हेच कारणीभूत आहेत असे भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. जेव्हा एखाद्या व्यक्तीकडे वा वस्तूकडे आपण 'माझी' म्हणून पाहतो तेव्हा मोह मनाचा ताबा घेतो आणि जेव्हा एखाद्या व्यक्तीकडे आपण परकी म्हणून पाहतो तेव्हा तिरस्कार वा द्वेष मनाचा ताबा घेतो. त्यामुळे 'माझे' आणि 'तुझे' हा भेद आपण विसरलो पाहिजे. याचाच अर्थ आपण आवड आणि नावड यांचा त्याग केला पाहिजे. हीच गीतेची आणि इतर सर्व धर्मग्रंथांचीही शिकवण आहे. हे सांगणे ही एक गोष्ट आहे आणि यानुसार आचरण करणे ही अगदी वेगळी गोष्ट आहे. ही गोष्ट कशी करावी हे आपल्याला गीता शिकवते.

(तिच्यात सांगितलेली पद्धत आपण समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.)

## अध्याय दुसरा

१७ नोव्हेंबर १९३०

सोमप्रभात

अर्जुनाने स्वतःला थोडेसे सावरल्यानंतर भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला दोष देत म्हणाले, 'तुला हा भ्रम झालाच कसा? तुझ्यासारख्या वीरपुरुषाला हे शोभत नाही.' परंतु अर्जुनाचा मोह एवढ्याने नाहीसा होणारा नव्हता. तो सुरुवातीच्या आपल्या भूमिकेवर ठाम होता. युद्ध करण्याला नकार देत तो म्हणाला, 'युद्ध जिंकण्याकरिता मला नातलगांना मारावे लागणार असेल तर मला या पृथ्वीवरील राज्यसुद्धा नको. एवढेच काय स्वर्गीय सुखांकरिताही मी असे करणार नाही.' माझे मन अंधारात चाचपडत आहे. माझे कर्तव्य काय ते मला कळत नाही. मी तुला शरण आलो आहे. आता तूच मला धर्म समजावून सांग.

अर्जुन गोंधळलेला आहे आणि त्याला ज्ञानाची इच्छा आहे असे आढळल्यानंतर कृष्णाला त्याची दया आली आणि तो त्याला समजावून सांगू लागला : तू विनाकारण दुःखी झाला आहेस. तू जे ज्ञान सांगतो आहेस त्यातील काहीही तुला कळलेले नाही. खरी गोष्ट म्हणजे देह आणि त्यातील आत्मा यामधील अंतरच तू विसरलेला आहेस. आत्मा कधीही मरत नसतो परंतु हा देह मात्र जन्मतःच नाशिवंत आहे. बालपण, तारुण्य, वार्धक्य या अवस्थांमधून देह जात असतो आणि शेवटी तो नष्ट होतो. देहाचा जन्म होत असतो तर देहीचा जन्म होत नसतो. आत्मा तर अजन्मा आहे. त्याच्यात कधी बदल होत नसतो. तो चिरंतन आहे, तो आता आहे आणि पुढील काळातही कायम राहणार आहे. हे अर्जुना, तू कुणासाठी शोक करतो

आहेस? तुझ्या शोकाचे कारण तुझा मोह आहे. या कौरवांकडे तू तुझे म्हणून पाहतो आहेस त्यामुळे त्यांच्याबद्दल तुला प्रेम वाटते. परंतु तू लक्षात ठेव की तुला यांच्या देहांबद्दल जो मोह वाटतो आहे ते यांचे देह तर नष्ट होणारच आहेत आणि त्यांच्या शरीरात राहणा-या आत्म्याचा नाश करण्याकरिता कोणीही समर्थ नाही. आत्म्याला शस्त्रांनी जखमी करता येत नाही, आगीने जाळता येत नाही, वा-याने तो वाळू शकत नाही आणि पाण्यात तो बुडू शकत नाही. तू एक क्षत्रिय आहेस. तू तुझ्या धर्माचा विचार कर. तुझ्या हाताखाली हे सैन्य इथे उभे झाले आहे. तू जर हे न्याय्य युद्ध लढण्याला नकार दिलास तर त्याचे परिणाम तुझ्या अपेक्षेपेक्षा अगदी विपरीत होतील आणि तू चेष्टेचा विषय होशील. तू भित्रा आहे असे समजले जाईल. शूर पुरुष म्हणून तुझी ख्याती आहे. परंतु आता तू युद्धातून माघार घेतलीस तर तू असे भीतीपोटी केलेस असे समजले जाईल. धोक्यापासून दूर पळून जाणे हे तुझे कर्तव्य असते तर बदनामीची फिकीर करण्याचे काहीही कारण नव्हते. परंतु आता तू युद्धातून माघार घेतलीस तर तुझ्या पलायनाबद्दल लोकांनी केलेली टीका सार्थच असेल.

'आतापर्यंत मी तुझ्या बुद्धीला आवाहन करण्याचा प्रयत्न केला. शरीर आणि आत्मा यांच्यातील अंतर लक्षात आणून देऊन तुझा कुलधर्म काय आहे याची तुला जाणीव करून देण्याचा मी प्रयत्न केला. परंतु आता मी तुला कर्मयोग समजावून सांगतो. कर्मयोगाप्रमाणे आचरण करणा-याची कधीही हानी होऊ शकत नाही. ही तर्काची गोष्ट नाही. ही गोष्ट आचरण आणि अनुभव यांच्याद्वारेच कळू शकते. टनभर युक्तिवादापेक्षा तोळाभर आचरण श्रेष्ठ असते. आणि या आचरणातसुद्धा ब-यावाईट परिणामांचा विचार शिरला की बुद्धी मलीन होते. वैदिक ज्ञान असलेले पंडित कर्मकांडात पडून विविध प्रकारची फळे मिळवण्याकरिता अनेक क्रिया करतात. एका क्रियेपासून फळ मिळाले नाही तर दुसरी क्रिया करण्याकरिता धावतात आणि

त्यानेही समाधान झाले नाही तर तिसरी. अशा प्रकारे त्यांचा मानसिक गोंधळ उडालेला असतो. खरे पाहता फळाचा क्षणभरही विचार न करता आपले कर्तव्य पार पाडणे हा माणसाचा धर्म आहे. या क्षणी तुझे कर्तव्य युद्ध करणे आहे. हे कर्तव्य पूर्ण करणे हा तुझा धर्म आहे. लाभहानी, यश-अपयश या गोष्टी तुझ्या हातात नाहीत. असे असेल तर गाडीखालील कुत्र्याप्रमाणे तू या गोष्टींचे ओझे विनाकारण का वाहतोस? जय-पराजय, थंडी आणि उकाडा, सुख आणि दुःख या गोष्टी देहामागे लागलेल्याच आहेत. माणसाला त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागत असते. फळाची काळजी न करता माणसाने आपले सर्व लक्ष समभावनेने कर्तव्याकडे लावले पाहिजे. हाच योग आहे. यालाच आपण कर्मकुशलता असे म्हणू शकतो. कामाचे यश ते करण्याच्या पद्धतीत आहे, त्याच्या परिणामात नाही, मग तो कसाही असो. त्यामुळे हे अर्जुना, शांत हो आणि फळाचा अभिमान सोड आणि तुझे कर्तव्य पार पाड.'

हे ऐकल्यानंतर अर्जुन म्हणाला, 'मला तू जसे आचरण करण्याकरिता सांगतो आहेस ते माझ्या आवाक्यातील नाही. जयपरायजयाची काळजी करायची नाही, परिणामांचा विचार करण्याकरिता क्षणही वाया घालवायचा नाही - अशा प्रकारच्या समभावनेने माणूस कसा काय वागू शकतो? अशी खंबीर वृत्ती माणसामध्ये कशी काय निर्माण होऊ शकेल? अशा प्रकारे माणूस कसा काय वागू शकेल? आणि कोणी असा वागत असला तर त्याला कसे ओळखायचे हे श्रीकृष्णा, तू मला समजावून सांग.'

यावर भगवान म्हणाले, 'हे राजा! माणसाने सर्व कामनांचा त्याग केलेला असेल व अंतःकरणातून त्याला समाधान वाटत असेल तर त्या माणसाला स्थिरचित्त, स्थितप्रज्ञ, स्थिरबुद्धी वा समाधिस्थ असे म्हणतात. अशा माणसाचे मन प्रतिकूल परिस्थितीतही विचलित होत नाही आणि सुखाने तो फुगत नाही. सुख आणि दुःख हे पंचज्ञानेंद्रियांचे विषय आहेत. त्यामुळे ज्याप्रमाणे कासव आपले हातपाय आत ओढून घेते त्याप्रमाणे सूज्ञ माणूस आपल्या

पंचज्ञानेंद्रियांना इंद्रियांच्या विषयांपासून दूर करतो. धोक्याची जाणीव होते तेव्हा कासव आपली इंद्रिये आत ओढून घेते. माणसाच्या बाबतीत मात्र माणसाच्या पंचज्ञानेंद्रियांवर हल्ला करण्याकरिता त्यांचे विषय जणू अहोरात्र टपून बसलेले असतात. त्यामुळे माणसाने आपल्या इंद्रियांना नेहमी कासवाप्रमाणे नियंत्रणात ठेवले पाहिजे आणि इंद्रियविषयांशी झगडण्याकरिता इंद्रियांना तयार ठेवले पाहिजे. हे खरे युद्ध आहे.

इंद्रियांना त्याच्या विषयाच्या मोहापासून मुक्त ठेवण्याकरिता काही लोक देहदमन आणि उपवास यांचा आधार घेत असतात. हे ठीकही आहे. परंतु या उपायांचा मर्यादित उपयोग आहे. जोपर्यंत माणसाचा उपवास सुरू असतो तोपर्यंत इंद्रियांना विषयांचा फारसा मोह होत नाही. परंतु केवळ उपवासामुळे विषयांच्या मोहापासून इंद्रिये पूर्णपणे मुक्त होत नाहीत. उलटपक्षी उपवास सुटल्यानंतर तो मोह अजूनच वाढू शकतो. विषयांपासून माणूस पूर्णपणे मुक्त होण्याकरिता ईश्वरी कृपाच पाहिजे. इंद्रियविषय इतके ताकदवान असतात की माणूस थोडासा जरी बेसावध असला तर ते त्याला आपल्यामागे फरफटत नेतात. त्यामुळे माणसाने सदैव आपली इंद्रिये ताब्यात ठेवली पाहिजेत. परंतु हे तो तेव्हाच साध्य करू शकतो जेव्हा तो आपली दृष्टी आत वळवतो, अंतःकरणातील ईश्वराला ओळखतो आणि त्याची भक्ती करतो. अशा प्रकारे जो माणूस माझ्यात परायण होऊन आपली इंद्रिये ताब्यात ठेवतो त्यालाच स्थिरबुद्धी योगी म्हणतात.

जो असे करणार नाही त्याचे हाल काय होतात तेही आता मी तुला सांगतो. माणूस जर आपल्या इंद्रियांचा स्वामी नसेल तर तो नेहमी विषयांचा विचार करत राहतो. त्यामुळे त्यांच्याबद्दल त्याला मोह वाटू लागतो. परिणामी इतर कशाचाही विचार तो क्वचितच करू शकतो. या मोहामुळेच त्याच्या मनात कामभावना उत्पन्न होते. जेव्हा ती कामभावना पूर्ण होत नाही तेव्हा त्याच्या मनात क्रोध निर्माण होतो. क्रोधामुळे जवळपास वेड लागल्यासारखी

त्याची अवस्था होते. त्याला स्वतःचे भानही राहत नाही. आपण असे का वागतो हेही त्याला कळेनासे होते. मग त्याचा स्मृतिभ्रंश होतो आणि तो वाटेल त्याप्रमाणे बडबडू लागतो व वागू लागतो. अखेरीस त्याचा सर्वनाश होणार नाही तर काय होईल? जेव्हा माणसाची इंद्रिये सुकाणू नसलेल्या जहाजाप्रमाणे मनात येईल तिकडे भरकटू लागतात तेव्हा वारा जिकडे ओढत नेईल तिकडे त्याला जावे लागते. शेवटी ते जहाज एखाद्या खडकावर जाऊन आदळते व त्याचे तुकडे तुकडे होतात. ज्यांची इंद्रिये इकडेतिकडे भरकटत जातात त्यांचीही अवस्था अशीच होते. इंद्रियांनी नको ते आचरण करू नये म्हणून माणसांनी आपल्या सर्व इच्छांचा त्याग केला पाहिजे आणि इंद्रियांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. असे झाले की डोळे सरळ पुढे पाहतील व ते फक्त पवित्र गोष्टींकडेच लक्ष देतील. कान केवळ ईश्वराच्या स्तुतीत केलेली स्तोत्रे अथवा संकटात सापडलेल्या माणसाने मदतीकरिता फोडलेला टाहोच ऐकतील. हात आणि पाय सेवेच्या कामातच गुंतून राहतील. अशा प्रकारे माणसाची सर्व इंद्रिये त्याला कर्तव्यकर्म पार पाडण्याकरिता मदत करतील व त्यामुळे माणूस ईश्वर कृपेला पात्र होईल. एकदा का माणसावर अशी ईश्वरी कृपा झाली की त्याच्या सर्व दुःखांचा अंत झालाच म्हणून समजा. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशामुळे बर्फ वितळतो त्याप्रमाणे ईश्वरी कृपा झाली की माणसाची सर्व दुःखे लोप पावतात. अशा माणसाला स्थिरबुद्धी वा स्थितप्रज्ञ म्हणतात.

पण ज्याची बुद्धी अशी स्थिर नसेल त्याची अवस्था कशी असेल? माणूस जर स्थितप्रज्ञ नसेल तर तो चांगल्या विचारांवर कसा स्थिरावू शकेल? उत्तम विचारांशिवाय शांती मिळू शकत नाही आणि ज्याला शांती नसेल त्याला सुख कसे मिळेल? स्थिर प्रवृत्तीच्या माणसाला दिव्याप्रमाणे सर्व काही स्पष्ट दिसत असते. उलट अस्थिर मनोवृत्तीच्या, जगाच्या धकाधकीत पडलेल्या माणसाला काहीही दिसू शकत नाही. समाधिस्थ योग्याला मात्र सर्व काही स्पष्टपणे दिसत असते. नदी सतत समुद्राकडे धाव घेत असते परंतु सागर मात्र जिथल्या तिथेच

असतो. याचप्रमाणे इंद्रियांचे सर्व विषय जरी स्थितप्रज्ञाकडे येत असले तरी स्थितप्रज्ञावर त्याचा कोणताही परिणाम होत नाही, तो समुद्राप्रमाणे अविचलित असतो. अशा प्रकारे जी व्यक्ती सर्व इच्छांचा त्याग करते ती व्यक्ती अहंकार आणि स्वार्थाच्या भावनेपासून मुक्त असते. ही व्यक्ती सर्व प्रसंगात तटस्थपणे वागते. तिला शांती मिळालेली असते. हीच ईश्वरप्राप्तीची स्थिती आहे आणि ज्याची अशी स्थिती मृत्यूपर्यंत कायम टिकते तो मुक्त होतो.

## अध्याय तिसरा

दिनांक २४-११-१९३०

सोमप्रभात

अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला जेव्हा स्थितप्रज्ञाला ओळखण्याच्या खुणा सांगितल्या आणि स्थितप्रज्ञाने काय केले पाहिजे याबद्दल श्रीकृष्णाने अवाक्षरही काढले नाही तेव्हा अर्जुनाला वाटले की स्थितप्रज्ञाची अवस्था प्राप्त करून घेण्याकरिता माणसाने काहीही न करता एका ठिकाणी केवळ शांत बसून राहिले पाहिजे. त्यामुळे तो कृष्णाला विचारतो, 'असे दिसते की तुला कर्मापेक्षा ज्ञान अधिक श्रेष्ठ आहे असे वाटते. असे असेल तर तू मला हे भयानक कृत्य करण्याकरिता आग्रह करून माझ्या मनात गोंधळ का निर्माण करतो आहेस? हे देवा, मला स्पष्टपणे सांग की माझे कल्याण कशात आहे?'

याचे उत्तर देत कृष्ण म्हणाला, 'अरे निष्पाप अर्जुना! आदिकाळापासून या जगात हे दोन मार्ग चालत आले आहेत. एका मार्गामध्ये ज्ञानाला महत्त्व देण्यात आले आहे तर दुस-यात कर्माला. परंतु तुझ्या लक्षात येईल की कर्म केल्याशिवाय माणसाला अ-कर्मीही होता येऊ शकत नाही. कर्म केल्याशिवाय माणसाला ज्ञान मिळूच शकत नाही. सर्व सोडून माणूस एका ठिकाणी बसून राहिला तर तो सिद्ध पुरुष होऊ शकत नाही. आपल्यापैकी

प्रत्येक जण दर क्षणी काही ना काही करत असतो हे तुझ्या लक्षात येत नाही काय? आपली प्रकृतीच अशी आहे की ती आपल्याला कर्म करायला लावते. जगाचा हाच नियम असल्यामुळे जो माणूस केवळ हाताला हात जोडून बसलेला असतो परंतु मनातून मात्र तो विविध विषयांमध्ये रमलेला असतो असा माणूस मूर्ख तर असतोच शिवाय लोक त्याला दांभिकही म्हणतात. अशा प्रकारे निरर्थक कृती करत बसण्यापेक्षा आपली इंद्रिये नियंत्रणात ठेवायची, आवडीनिवडी बाजूला ठेवायच्या आणि अनासक्त भावाने या अथवा त्या कर्मात स्वतःला गुंतवून घ्यायचे हे उचित होणार नाही काय? हे अर्जुना नियत कर्म - सहजपणे वाट्याला आलेले सेवाकार्य तू इंद्रियनिग्रह करून करत जा. आपल्यावर सोपवण्यात आलेले काम करणे ही गोष्ट आळशीपणामुळे काहीही न करण्यापेक्षा उत्तम आहे. परंतु एक गोष्ट लक्षात ठेव की जर आपण त्यागाच्या वा यज्ञाच्या भावनेने कर्म केले नाही तर आपण कर्मबंधनांनी बांधले जातो. यज्ञाचा इथे शब्दशः अर्थ घ्यायचा नाही. इतरांच्या मदतीकरिता झटणे, म्हणजे सेवा करणे हा यज्ञाचा अर्थ आहे. आणि जेव्हा सेवा केवळ सेवेकरिता करण्यात येते तेव्हा आसक्तीचा वा रागद्वेषाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. हे अर्जुना, तू असा यज्ञ, अशी सेवा करत जा. ब्रह्माने जेव्हा हे विश्व निर्माण केले तेव्हाच त्याने विश्वाबरोबरच या यज्ञाचीही निर्मिती केली आणि माणसाच्या कानात सांगितले, 'जगात जा, परस्परांची सेवा करा आणि स्वतःचा उत्कर्ष करून घ्या. सर्व प्राणिमात्रांकडे ईश्वर म्हणून पाहा. त्यांची सेवा करून त्यांना प्रसन्न करा आणि मग तेही तुम्हाला प्रसन्न ठेवतील. असे केले तर ईश्वराची तुमच्यावर कृपा होईल व तो तुम्हाला मनोवांछित फळ देईल.' त्यामुळे लक्षात ठेवा की जो इतरांची सेवा न करता, इतरांचा वाटा न देता खातो तो चोर असतो आणि जो लोकांना, प्राणिमात्रांना कर्मफळातील त्यांच्या हक्काचा वाटा देतो व नंतर खातो त्याला कर्मफळाचा उपभोग घेण्याचा अधिकार असतो व तोच कर्मफलाच्या

पापांपासून मुक्त होतो. उलटपक्षी जो स्वतःकरिताच कमावतो, मजुरी करतो तो पापी असतो आणि तो पापाचे अन्न खातो. निसर्गनियम आहे की प्राणीमात्र अन्नावर जगत असतात, अन्नधान्याची निर्मिती पावसाद्वारे होत असते आणि पाऊस पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांच्या यज्ञामुळे म्हणजे त्यांच्या परिश्रमाद्वारे पडत असतो. जिथे प्राणिमात्र असतात तिथे पाऊस असतोच. प्राणिमात्र श्रमजीवी असतात. सर्व परिश्रमावर जगत असतात, कोणीही आळसात पडून राहून खाऊ शकत नाही. आणि जर हे मूढ जिवांकरिता खरे असेल तर माणसाकरिता ही गोष्ट किती मोठ्या प्रमाणात लागू होईल? कर्माचे मूळ ब्रह्म आहे आणि ब्रह्म अक्षरब्रह्मामधून निर्माण झाले आहे. त्यामुळे तो अक्षरब्रह्म सर्व प्रकारच्या त्यागामध्ये आणि सेवेमध्ये उपस्थित असतो. जो कोणी परस्परांच्या सेवेची ही साखळी तोडतो तो पापी असतो आणि त्याचे जगणे व्यर्थ असते.

(मंगलप्रभात)

'जेव्हा माणसाला मनःशांती आणि समाधान असते तेव्हा असे म्हणतात की त्याच्याकरिता करण्यासारखे काहीही शिल्लक नसते. कर्म केल्यामुळे त्याचा कोणताच लाभ होत नाही आणि न केल्यामुळेही काही लाभ होत नाही. त्याला सेवेद्वारे कोणताही वैयक्तिक स्वार्थ साध्य करायचा नसतो आणि तरीही त्याने यज्ञ करणे थांबवता कामा नये. त्याचप्रमाणे हे अर्जुना, तू तुझे दैनंदिन कर्तव्य पार पाड आणि ते करताना रागद्वेष वा आसक्ती वगैरे ठेवू नकोस. जो माणूस अनासक्त भावनेने आपले कर्तव्य पार पाडतो त्याला ईश्वरप्राप्ती होते. शिवाय परिपूर्णता प्राप्त केलेल्या जनकासारख्या निस्पृही राजानेही कर्म करता करताच सिद्धी प्राप्त करून घेतली होती. जिथे जनकासारखा राजाही लोकहितार्थ सतत कर्म करत होता तर तू वेगळा कसा काय वागू शकतोस? नियमच असा आहे की चांगली आणि मोठी माणसे जशी वागतात तशीच सामान्य माणसेही वागत असतात. तू माझेच उदाहरण

घे. कर्म करून मला काय मिळवायचे असते? आणि तरीही क्षणाचाही विसावा न घेता मी स्वतःला सतत कर्मात गुंतवून ठेवत असतो. त्याचमुळे लोकही कमी अधिक प्रमाणात सतत कामात व्यस्त असतात. परंतु मी काम करणे बंद केले तर या जगाचे काय होईल?

सूर्य, चंद्र आणि तारे यांनी फिरणे बंद केले तर जगात काय उलथापालथ होईल, याची कल्पना तू करू शकतोस. या सर्वांना गती देणारा व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारा तर मीच आहे. परंतु माझ्या वृत्तीत आणि सामान्य माणसांच्या वृत्तीत अंतर आहे. माझ्यात आसक्ती नाही, त्यांच्यात आसक्ती असते आणि त्यामागे त्यांचा स्वार्थ असतो. तुझ्यासारख्या सूज्ञ माणसाने काम करणे बंद केले तर इतरही तसेच करतील आणि मग ते बुद्धिभ्रष्ट होतील. त्यामुळे इतरांनी काम करणे थांबवू नये आणि हळूहळू त्यांनी अनासक्त भावाने काम करणे शिकावे. म्हणून तू अनासक्त भावनेने तुझे कर्तव्य पार पाड. माणसाच्या स्वभावात जे गुण असतात त्याप्रमाणे त्याला कार्य करावेच लागते. 'मीच कर्ता आहे' असे केवळ मूर्खच समजत असतो. श्वासोच्छ्वास करणे ही माणसाची प्रकृती आहे, स्वभाव आहे आणि डोळ्याच्या पापणीवर एखादा किडा बसला तर पापण्यांची आपोआप हालचाल होते. परंतु असे कोणीही म्हणत नाही की, 'मी श्वासोच्छ्वास करतो' वा 'मी माझी पापणी हालवतो'. मानवाचे सर्व वर्तनही याच निसर्गनियमाप्रमाणे का होऊ नये? त्याबद्दल अहंकार बाळगण्याचे कारण काय? अनासक्त भावनेने काम करता येण्याचा उत्तम मार्ग आहे किंचितही अहंकार मनात न बाळगता आपली सर्व कामे मला अर्पण करणे आणि माझ्या हातातील एक साधन बनून प्रकृतीच्या गुणधर्माप्रमाणे सर्व कर्म करणे. अशा प्रकारे काम केल्यामुळे माणसातील अहंवृत्ती, स्वार्थ इत्यादी नष्ट होतात व त्याचे कर्म स्वाभाविक आणि निर्दोष होते आणि अनेक प्रकारच्या भानगडीतून ते मुक्त होते. त्यासमोर कर्मबंधन तर मुळीच शिल्लक राहत नाही. त्यानंतर कर्मांचा माणसाला कोणत्याही

प्रकारचा त्रास होत नाही. असे झाल्यानंतर माणसाला बंधनात अडकवण्याचे सामर्थ्य कर्मांमध्ये राहत नाही. कर्म स्वाभाविक झाल्यानंतर 'मी कर्म करणार नाही' असे म्हणणे हा व्यर्थ अहंकार होईल. अहंकारग्रस्त माणूस जरी वरवर काम करताना दिसत नसला तरी त्याच्या मनात सतत काही ना काही योजना सुरू असतात. ही गोष्ट तर बाह्यतः कार्यरत असलेले दिसण्यापेक्षाही वाईट आहे व तिच्यामध्ये बंधन निर्माण करण्याची अधिकच ताकद असते.

'खरे पाहता इंद्रियांना आपापल्या विषयांबद्दल आकर्षण वा अपकर्षण वाटत असते. उदाहरणार्थ कानांना काही ध्वनी चांगले वाटत असतात तर काही नाही. नाकाला गुलाबाच्या फुलाचा सुगंध आवडतो तर घाणीचा वास आवडत नाही. इतर ज्ञानेंद्रियांबद्दलही हेच सांगता येईल. त्यामुळे माणसाने रागद्वेषरूपी या दोन दरवडेखोरांना कधीही शरण जाऊ नये. त्यांच्या नजरेतून सुटण्याकरिता माणसाने कर्माच्या शोधात जाऊ नये. त्याने आज एका गोष्टीच्या, उद्या दुस-या गोष्टीच्या आणि परवा तिस-या गोष्टीच्या मोहात पडू नये तर ईश्वरकृपेने जे कोणते काम त्याच्या वाट्याला आले असेल ते काम करण्याकरिता त्याने सदैव तत्पर राहिले पाहिजे. अशा प्रकारे त्याची तयारी झाली की मग आपण जे काही करतो आहो ते ईश्वरी कृपेमुळे करतो, ते ईश्वरी काम आहे, आपले नाही अशी भावना त्याच्या मनात निर्माण होईल व मग त्याचा अहंकार नाहीसा होऊन जाईल. हाच स्वधर्म आहे. प्रत्येकाने आपल्या धर्माला चिकटून राहिले पाहिजे कारण तो त्याच्याकरिता सर्वोत्तम असतो. एखाद वेळी परधर्म अधिक चांगला आहे असे वाटू शकेल. असे झाले तरी तो धोक्याचा मार्ग आहे असे समजून माणसाने त्यापासून दूर राहिले पाहिजे. आपले कर्तव्य पार पाडत असताना मृत्यू येणे यातच मोक्ष आहे.'

रागद्वेषविरहित कर्म म्हणजेच यज्ञ वा त्याग, असे भगवान कृष्ण म्हणाले तेव्हा अर्जुनाने विचारले, 'माणसाला पाप करण्याकरिता प्रवृत्त करते ती गोष्ट कोणती? अनेकदा असे आढळते की माणूस त्याच्या इच्छेशिवायच पाप

कर्माकडे ढकलला जातो.'

त्यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'आपल्याला गुलामाप्रमाणे वागायला लावणारे मुख्य आरोपी काम आणि क्रोध आहेत. हे जणू सख्ख्या भावाप्रमाणे आहेत. जर कामना पूर्ण झाली नाही तर क्रोध हा स्वाभाविक परिणाम असतो. जो माणूस काम आणि क्रोधाचा गुलाम असतो तो रजोगुणी आहे असे म्हणतात. काम हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे आणि या शत्रूविरुद्ध माणसाला अहर्निश युद्ध करावे लागत असते. ज्याप्रमाणे आरशावर धूळ बसली की तो झाकला जातो, धुरामुळे अग्नी गुदमरतो आणि गर्भ गर्भाशयात झाकला जातो त्याप्रमाणे क्रोध ज्ञानाचे तेज हिरावून घेतो वा त्याला गुदमरून टाकतो आणि हा काम अग्नीसारखाच विकराळ आहे. त्याची भूक कधीही तृप्त होत नसते. तो माणसाच्या इंद्रियांचा, मनाचा आणि बुद्धीचा ताबा घेतो व त्याला स्खलनाकरिता प्रवृत्त करतो. त्यामुळे आधी तू तुझ्या इंद्रियांवर नियंत्रण मिळवून मनावर विजय मिळव.

तू जेव्हा असे करशील तेव्हा तुझी बुद्धी तुझ्या आज्ञेचे पालन करील. इंद्रियांपेक्षा मन बलशाली आहे आणि मनापेक्षा बुद्धी अधिक शक्तिशाली आहे आणि या सर्वांमध्ये आत्म्याचे महत्त्व सर्वाधिक आहे. माणसाला त्याच्या आत्मशक्तीचे भान नसल्यामुळे इंद्रिये, मन आणि बुद्धी या गोष्टी आपल्या नियंत्रणात नाहीत असे त्याला वाटू लागते. परंतु आत्मशक्तीबद्दलचा विश्वास एकदा त्याच्या मनात निर्माण झाला की इतर सर्व गोष्ट आपोआपच सुलभ होत जातात. त्यानंतर काम, क्रोध आणि त्यांची इतर मित्रमंडळी यांचा धसका घेण्याचे कोणतेही कारण राहत नाही.'

(या अध्यायाला मी गीता समजून घेण्याची किल्ली म्हणतो. याचा एका वाक्यात सारांश सांगायचा तर तो असा आहे - 'जीवन सेवेकरिता आहे, भोगाकरिता नाही.' त्यामुळे आपण आपले जीवन यज्ञमय केले पाहिजे. हे विचार बुद्धीला पटणे ही केवळ पहिली पायरी आहे आणि ही गोष्ट

पटल्यानंतर त्यानुसार आपण आचरणाला सुरुवात केली की कालानुक्रमाने आपले अंतःकरण शुद्ध होऊ लागते. परंतु खरी सेवा म्हणजे काय हे कळण्याकरिता इंद्रियदमनाची आवश्यकता असते. इंद्रियदमन करता करता सत्यदेवतेचे स्पष्ट आणि अधिक स्पष्ट दर्शन होऊ लागते. ज्या सेवेमागे स्वार्थ असतो त्या सेवेत यज्ञभावना राहत नाही, म्हणजे तिच्यातील त्यागाचा गुण हरवतो. हे कळल्यानंतर दुस-या तिस-या वादविवादात पडण्याचे कारण नाही. त्याकरिता अनासक्तभाव निर्माण करण्याकरिता तातडीने प्रयत्न करणे आवश्यक असते. हे कळले की सर्व प्रकारचे वाद आपल्याकरिता निरर्थक ठरतात. 'कृष्णाने अर्जुनाला आपल्या नातलगांना मारण्याकरिता खरोखरच सांगितले होते काय? त्याचा धर्म कोणता होता?' अशा प्रकारच्या प्रश्नांना या ठिकाणी कायमचे उत्तर मिळते. जेव्हा अनासक्त भावाने आपण वर्तन करू लागतो तेव्हा शत्रूला मारण्याकरिता उचललेली सुरीही आपल्या हातातून गळून पडते. परंतु अनासक्तभावाच्या केवळ देखाव्याने कोणताही लाभ होऊ शकत नाही. आपण जर आपले प्रयत्न चिकाटीने सुरू ठेवले तर अनासक्तीची भावना आपल्या मनामध्ये निर्माण होऊ शकते. असे कदाचित पहिल्याच दिवशी होऊ शकेल वा त्याला हजारो वर्षेही लागू शकतील. याकरिता किती वेळ लागतो याची काळजी करण्याचे कारण नाही कारण प्रयत्नांमध्येच यशाची मुळे दडलेली असतात. परंतु आपण मात्र सदैव दक्ष असले पाहिजे आणि जो काही प्रयत्न करतो आहोत तो अंतःकरणापासून आहे की आपण आत्मवंचना करतो आहोत, याची काळजी आपण घेतली पाहिजे आणि ही गोष्ट करणे आपल्या सर्वांना नक्कीच शक्य आहे.)

## अध्याय चौथा

दिनांक १-१२-'३०

सोमप्रभात

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, 'मी जो निष्काम कर्मयोग तुला सांगितला तो पुरातन काळापासून चालत आला आहे. त्यात नवीन असे मी काहीही सांगितलेले नाही. तू माझा भक्त आहेस आणि तू धर्मसंकटात असल्यामुळे त्यातून तुला मुक्त करण्याकरिता मी हे सगळे सांगतो आहे. जेव्हा जेव्हा धर्माची निंदा होते आणि अधर्माचा प्रसार होतो तेव्हा तेव्हा मी अवतार घेतो आणि भक्तांचे रक्षण करतो व पाप्यांचा विनाश करतो. ज्या लोकांना माझ्या या मायेचे ज्ञान असते त्यांना माहीत असते की एक ना एक दिवस वाईटाचा अंत निश्चित होणार आहे. साधुपुरुषांच्या बाजूने नेहमीच ईश्वर असतो. ते धर्माचा त्याग करत नसतात. अखेरीस मी त्यांना पावतो. ते माझे ध्यान करत असतात आणि माझ्या आश्रयाला आलेले असतात, कामक्रोधापासून ते मुक्त असतात आणि तप व ज्ञानाने ते शुद्ध झालेले असतात हे याचे कारण आहे. माणूस जसे करतो तसेच त्याला फळ मिळते. मी तयार केलेल्या कायद्यापासून कोणाचीही सुटका होऊ शकत नाही.

गुणकर्माच्या भेदाप्रमाणे मी चार वर्ण (वर्ण म्हणजे जात नाही) निर्माण केले आहेत. असे असले तरी मी त्यांचा कर्ता आहे असे समजू नकोस. माझ्या या कृतीच्या कोणत्याही फळाची मला अपेक्षा नाही व याचे पाप-पुण्यही मला लागत नाही. ही ईश्वरी माया कशी आहे हेही समजून घेणे आवश्यक आहे. ज्या काही घडामोडी जगात सुरू असतात त्या सर्व दैवी नियमांप्रमाणे घडत असतात आणि तरीही ईश्वर त्यापासून अलिप्त असतो. त्यामुळे तो त्यांचा कर्ताही असतो आणि अकर्ताही असतो. अशा प्रकारे अलिप्त राहून, न गुंतता, फलाशा न ठेवता ईश्वराप्रमाणे जो माणूस अनासक्त भावनेने कर्म करील त्यालासुद्धा मोक्षप्राप्ती होईल. अशा माणसाला

कर्मामधूनही अकर्माचे दर्शन होत असते आणि कोणते कर्म करू नये हेही त्याला लगेच कळते. जे कर्म कामनापूर्ती करण्याकरिता करण्यात येते व कामनापूर्तीच्या अभावी जे कर्म करणे शक्य नसते ते कर्म चांगले नसते, उदाहरणार्थ चोरी, व्यभिचार इत्यादी. अशा प्रकारची कामे अनासक्त भावनेने करताच येऊ शकत नाहीत. त्यामुळे जे लोक प्राप्त कर्तव्य अनासक्त भावनेने पार पाडतात ते त्या कर्मांना ज्ञानाग्नीत जाळून टाकतात असे म्हणता येईल. अशा प्रकारे जो माणूस कामना आणि संकल्प सोडून फळाच्या आसक्तीपासून मुक्त होतो तो नेहमी समाधानी आणि स्वतंत्र असतो असे म्हणता येईल. त्याचे मन त्याच्या नियंत्रणात असते. तो कशाच्याही मोहात पडत नाही. निरोगी माणसाच्या शरीराच्या सर्व हालचाली ज्याप्रमाणे स्वाभाविकपणे होतात त्याप्रमाणे तोसुद्धा सर्व कामे प्रकृतीच्या नियमांप्रमाणे स्वाभाविकपणे करत असतो आणि 'मी हे करतो आहे' अशा अहंकारापासूनही तो मुक्त असतो वा असेही म्हणता येईल की आपण काही करतो आहोत याचे भानही त्याला नसते. तो केवळ निमित्तमात्र असतो. यश मिळाले काय आणि यश मिळाले नाही तरी काय फरक पडतो? तो फुगतही नाही आणि घाबरूनही जात नाही. सर्व कामे त्याने त्यागभावनेने म्हणजे यज्ञभावनेने केलेली असतात वा असे म्हणता येईल की त्याच्या प्रत्येक कर्मामागे विश्वसेवेचा उद्देश असतो. आपल्या प्रत्येक कृतीद्वारे तो ईश्वराचेच ध्यान करत असतो व अखेरीस तो त्याच्यातच विलीन होऊन जातो.

'यज्ञाचे अनेक प्रकार आहेत. परंतु त्या सर्वांची मुळे पावित्र्य आणि सेवेमध्ये असतात. उदाहरणार्थ इंद्रियनिग्रह हा एक प्रकारे यज्ञच आहे. दानधर्म हा दुस-या प्रकारचा यज्ञ आहे आणि प्राणायामादीसुद्धा आत्मशुद्धीकरिता केलेले यज्ञच आहेत. या गोष्टींचे ज्ञान आपण विनय, जिज्ञासू वृत्ती आणि सेवा यांच्याद्वारे विद्वान गुरूकडून मिळवू शकतो. जर कोणी व्यक्ती यज्ञ म्हणजे काय हे न समजून घेता अज्ञानामुळे अनेक गोष्टी

करण्याचा प्रयत्न करत असेल तर चांगले होण्याऐवजी वाईट होण्याची शक्यता असते. ती व्यक्ती स्वतःचे तर नुकसान करून घेतेच पण जगाचेही नुकसान करते. त्यामुळे आपण करत असलेले सर्व कर्म समजून उमजून केले पाहिजे.

'ज्ञान केवळ पुस्तकी शिक्षणाने मिळत नाही. या ज्ञानामध्ये शंकेला कोणतेही स्थान नसते. त्याची सुरुवात श्रद्धेपासून होते आणि त्याचा अंत अनुभवात होतो. त्याला सर्व प्राणीमात्रांचे दर्शन स्वतःमध्ये होते आणि ईश्वरामध्ये तो स्वतःला पाहतो. त्यामुळे प्रत्येक गोष्टीमध्ये ईश्वरी संदेश असल्याचे त्याला जाणवते.

'अशा प्रकारच्या ज्ञानामुळे वाईटाहून वाईट पाप्याचाही उद्धार होऊ शकतो. ते मुमुक्षूला कर्मबंधनांपासून मुक्त करते. त्यामुळे त्याला कर्मफळे बांधत नाहीत. या ज्ञानाइतके जगात काहीही पवित्र नाही. त्यामुळे असे ज्ञान तू इंद्रियनिग्रह करून श्रद्धापूर्ण अंतःकरणाने मिळव. त्यामुळे तुला परिपूर्ण मनःशांती मिळेल.'

(गीतेचा तिसरा, चौथा आणि आणि यानंतरचा पाचवा या अध्यायांमध्ये अनासक्तियोग म्हणजे काय आणि त्याचा अभ्यास कसा करावा हे सांगितलेले असल्यामुळे हे तिन्ही अध्याय एकत्रित वाचले पाहिजेत. जर हे तीन अध्याय नीट समजले तर नंतरच्या अध्यायांमध्ये काय आहे हे समजून घेणे वाचकांकरिता सोपे जाईल. उर्वरित अध्यायांमध्ये अनासक्ती मिळवण्याच्या मार्गांची आणि साधनांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. आपण गीतेचा अभ्यास या दृष्टिकोनातून चिकाटीने केला तर दैनंदिन जीवनात आपल्याला ज्या समस्या भेडसावतात त्यांचे उत्तर फारसा त्रास न होता सापडू शकेल. याकरिता रोजचा अभ्यास हवा. त्याकरिता प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. उदाहरणार्थ जर एखाद्याला राग आला असेल तर त्याने क्रोधावरील श्लोकांचे चिंतन करावे आणि त्या शत्रूला गप्प बसवावे. कोणाला द्वेष वाटतो, धीर

खचला, मनापासून एखादी व्यक्ती आवडत नाही, एखादा खादाड आहे वा एखाद्याला काय करावे काय करू नये हे सुचत नाही, तर त्या त्या विषयावरील श्लोकांचे त्याने चिंतन करावे. गीतामातेवर आपली संपूर्ण श्रद्धा असेल आणि आपण तिचा नित्य अभ्यास करत असू तर तिच्या मदतीने या सर्व समस्या सोडवता येऊ शकतात. आपण दररोज गीतेचा पाठ का करावा हे सांगण्याकरिताच हा प्रयत्न आहे.)

## यज्ञ - १

(मंगलप्रभातमध्ये प्रसिद्ध केलेल्या पत्रांनंतर गांधीजींनी यज्ञावर दोन पत्रे लिहिली. त्यांनी लिहिलेल्या खाजगी पत्रांमध्ये याविषयी अनेकदा काही विशेष लेखन केले आहे. यज्ञाचा अर्थ समजण्याकरिता मदत व्हावी म्हणून ते इथे उद्धृत करत आहे.)

२१-१०-'३०

मंगलप्रभात

आपण यज्ञ शब्दाचा उपयोग अनेक प्रकारे करतो. आपण दैनंदिन कताईलाही महायज्ञाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे यज्ञ या शब्दाच्या विविध अर्थांचा व त्यांच्या परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे. यज्ञ म्हणजे कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करता लोकांच्या कल्याणार्थ केलेले कर्म. मोबदला भौतिक वा आध्यात्मिक असू शकतो. कर्माचा अर्थ इथे व्यापकतम अर्थाने घेतला पाहिजे. त्यात विचार, शब्द आणि कर्मांचाही समावेश होतो. इतरांमध्ये केवळ मानवजातच नाही तर सर्व प्राणिमात्रांचा समावेश होतो. त्यामुळे आणि अहिंसेच्या दृष्टिकोनातूनही निम्नस्तराच्या प्राण्यांचा बळी देणे या गोष्टीचा यज्ञात समावेश होऊ शकत नाही. वेदांमध्ये अश्व, गाय इत्यादी प्राण्यांचा बळी देण्याला आधार सापडतो यामुळे काहीही फरक पडत नाही. अशा प्रकारे बळी देण्याचा प्रकार मूलभूत सत्याच्या

आणि अहिंसेच्या कसोटीवर उतरू शकत नाही एवढे आपल्याकरिता पुरे आहे. वेदांबद्दलचे माझे ज्ञान मर्यादित आहे हे मी आनंदाने मान्य करतो. परंतु या विषयाचे मर्यादित ज्ञान असल्याबद्दल मला काळजी वाटत नाही. कारण प्राण्याचा बळी देण्याची प्रथा ही गोष्ट वेदकालीन समाजामध्ये असल्याचे जरी सिद्ध झाले तरी अहिंसेच्या उपासकाकरिता तो पायंडा होऊ शकत नाही.

यज्ञाच्या या व्याख्येनुसार विचार केला असता आपल्या लक्षात येईल की ज्या कर्मामुळे अधिकात अधिक जिवांचे मोठ्यात मोठ्या क्षेत्रात कल्याण होईल आणि जे कर्म जास्तीत जास्त स्त्री-पुरुष कमीत कमी त्रासाने करू शकतील असे कर्म म्हणजे यज्ञ वा महायज्ञ. अशा प्रकारच्या कोणत्याही यज्ञकार्यात इतर कोणाच्या अकल्याणाची इच्छाच करता येऊ शकत नाही. यामुळे जर कोणी सेवा म्हणून इतरांचे अकल्याण करत असेल वा करू इच्छित असेल तर ते कर्म महायज्ञ तर सोडाच पण यज्ञाच्या कसोटीलाही उतरू शकत नाही आणि यज्ञाशिवाय केलेले कर्म बंधनरूप होते हे आपण गीतेतून आणि अनुभवानेही शिकलो आहोत.

यज्ञाशिवाय हे जग एक क्षणही टिकू शकत नाही. त्यामुळे गीताकारांनी दुस-या अध्यायात ज्ञानाची चर्चा केल्यानंतर तिस-या अध्यायात ज्ञान कसे मिळवावे या विषयाकडे ते वळतात आणि स्पष्टपणे सांगतात की आपल्या निर्मितीबरोबरच यज्ञ आला आहे. एवढेच नाही तर हा देहही आपल्याला परमार्थाच्या कारणाकरिताच मिळाला आहे. त्यामुळे यज्ञ केल्याशिवाय जो जेवतो तो चोरीचे खातो, असे कठोर वाक्य गीताकारांनी उच्चारले आहे. शुद्ध जीवन व्यतीत करण्याची इच्छा करणा-याची सर्व कर्मे यज्ञरूप असली पाहिजेत. आपल्या जन्माबरोबरच यज्ञ आलेला असल्यामुळे आपण आयुष्यभर कर्जदार वा गुलाम असतो व त्यामुळे विश्वाची सेवा करणे आपल्यावर बंधनकारक असते. गुलामाला त्याचा मालक अन्नवस्त्रादी सेवेचा

मोबदला म्हणूनच देत असतो. त्याचप्रमाणे आपण गुलाम म्हणून केलेल्या सेवेच्या मोबदल्यात या जगाचा स्वामी आपल्याला अन्नवस्त्रादी देत असतो. आपल्याला जे काही मिळते त्याला आपण देणगी समजले पाहिजे. त्यामुळे जे मिळते ते आपण आभारपूर्वक स्वीकारले पाहिजे. हा आपला हक्क आहे असे आपण समजू नये, आपल्याला जरी काही मिळाले नाही तरी आपण आपल्या स्वामीला दोष देता कामा नये. परत केलेल्या ऋणाचा मोबदला मागण्याचा अधिकार कर्जदाराला नसतो.

हे शरीर त्याचेच आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे तो याला राखेल वा नष्ट करील. ही दुःखाची वा कीव करायला लागावी अशी स्थिती नाही. ईश्वराच्या योजनेत आपले नेमके स्थान कोणते आहे हे कळले तर ही स्वाभाविक आणि परम आनंददायी स्थिती आहे आणि ती प्राप्त व्हावी अशी आपण इच्छा केली पाहिजे असे आपल्या लक्षात येईल. याकरिता अविचल श्रद्धेची आवश्यकता असते. आपण स्वतःबद्दल काळजी करण्याची मुळीच गरज नाही. ती चिंता आपण परमेश्वरावर सोडून दिली पाहिजे असा आदेश तर सर्व धर्मांमध्ये देण्यात आलेला आहे. यामुळे कुणालाही घाबरण्याचे कारण नाही. जो कोणी शुद्ध अंतःकरणाने स्वतःला सेवेकरिता वाहून घेईल त्याला दिवसेंदिवस या वचनाची आवश्यकता अधिकाधिक जाणवू लागेल व त्याची श्रद्धाही तसतशी वृद्धिंगत होत जाईल. ज्याची स्वार्थ सोडण्याची मुळीच तयारी नाही आणि कोणत्या परिस्थितीत आपला जन्म झाला हे लक्षात घेण्याची तयारी नाही त्याच्याकरिता मात्र हा सेवेचा मार्ग कठीण आहे. त्याच्या सेवेला स्वार्थाचा वास आल्याशिवाय राहत नाही. परंतु या जगात इतक्या स्वार्थी स्वभावाचे लोक फार कमी आहेत. कळत नकळत आपल्यापैकी प्रत्येक जण काही ना काही सेवाकार्य करतच असतो. हीच सेवा जाणीवपूर्वक करण्याची सवय आपण वाढवत गेलो तर सेवा करण्याची आपली इच्छा वाढत जाईल. त्यातच आपले खरे सुख असेल आणि जगाचे कल्याण असेल.

## यज्ञ २

२८-१०-३०

मंगलप्रभात

मागील आठवड्यात यज्ञाविषयी लिहिले होते पण पोट भरले नव्हते. जी वस्तू जन्माबरोबरच सोबत घेऊन आपण या जगात प्रवेश केला तिच्याबद्दल थोडा अधिक विचार केला तर तो वाया जाणार नाही. यज्ञ नित्य कर्तव्य आहे. यज्ञ हे असे कर्तव्य आहे की ज्याचे आपण चोवीस तास आचरण केले पाहिजे. त्यामुळेच यज्ञासारख्या सेवाकार्याकरिता 'परोपकाराय सतां विभूतयः' हे वचन लावण्यात येते. ज्याप्रमाणे कर्जाची परतफेड करणे हा परोपकार नसतो तर स्वतःवर केलेला उपकार असतो त्याचप्रमाणे निष्काम कर्म हा परोपकार नसून स्वतःवर केलेला उपकार आहे. आपण आपल्या डोक्यावरील ओझे खाली ठेवतो, आपल्या धर्माचे पालन करतो. केवळ संतांचीच नाही तर आपणा सर्वांची संपत्ती परोपकारार्थ आणि सेवेच्या कार्याकरिता आहे. असा जर नियम असेल आणि तसा तो आहे हे स्पष्ट आहे, तर उपभोगाचा प्रश्नच उरत नाही. माणसाची संपत्ती सेवेकरिताच असते. त्याग हाच माणसाकरिता उपभोग आहे. हाच माणूस आणि पशू यांच्यामध्ये भेद आहे. यावर काहींचा असा आक्षेप आहे की असे केल्यास जीवन शुष्क व निरस होऊन जाईल आणि जीवनातील कला निघून जाईल तसेच यामुळे सांसारिक जीवनही संपून जाईल. परंतु मला असे वाटते की असे म्हणणा-यांनी त्याग या शब्दाचा चुकीचा अर्थ लावलेला आहे. त्याग म्हणजे इथले सर्व काही सोडून अरण्यात निघून जाणे नाही. आपली सर्व कामे त्यागभावनेने करणे हा त्यागाचा अर्थ आहे. गृहस्थजीवन त्यागमय असो की भोगमय, चांभार जोडे शिवणारच आहे, ग्रामीण शेती करणारच आहेत, व्यापारी व्यापार करणार, न्हावी केस काढणार. यात त्यागभावना वा भोगलालसा असू शकते. त्यागभावनेने व्यापार करणारा व्यापारी करोडो

रुपयांचा व्यापार करत असला तरी जर तो त्यागभावनेच्या नियमाचे पालन करणारा असेल तर तो आपल्या क्षमतांचा उपयोग लोककल्याणार्थ केल्याशिवाय राहणार नाही, त्यामुळे तो कोणाची फसवणूक करणार नाही वा सट्टेबाजी करणार नाही. तो साधे जीवन व्यतीत करील. कोणत्याही जिवंत प्राण्याला तो दुखापत करणार नाही. कोणाचे नुकसान करण्याऐवजी तो लाखो रुपयांचे नुकसान सहन करणे पसंत करील. अशा प्रकारचा व्यापारी केवळ कल्पनेतच अस्तित्वात असू शकतो असा आक्षेप घेण्याचे कुणालाही कारण नाही. सुदैवाने असे व्यापारी पूर्वेकडे आणि पश्चिमेकडेही अस्तित्वात आहेत. हे खरे आहे की अशा व्यापा-यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी असू शकेल. परंतु असा एक जरी व्यापारी सापडला तरी वरील आक्षेप चुकीचा ठरतो. वाढवाणमधील परोपकारी शिंप्याची आपणा सर्वांना माहिती आहे. असाच एक न्हावी असल्याचे मला माहीत आहे. अशाच प्रकारच्या विणकराचीही आपणा सर्वांना माहिती आहे. विचार केला आणि शोध घेतला तर आपल्याला सर्व व्यवसायांमध्ये यज्ञार्थ जीवन जगणारे आणि आपला व्यवसाय चालवणारे लोक दिसून येतात. हे लोक व्यवसाय आजिविका मिळवण्याकरिता करत नसतात. त्याच्यासाठी आजिविका व्यवसायाचे गौण फळ असते. मोतीलाल पूर्वीही शिंपी होता आणि ज्ञान मिळाल्यानंतरही शिंपीच होता. त्याची भावना बदलल्याबरोबर त्याचा व्यवसाय यज्ञरूप झाला. त्यात पावित्र्य आले आणि व्यवसायात इतरांच्या सुखाचा विचारही आला आणि ख-या अर्थाने त्याचे जीवन कलापूर्ण झाले. यज्ञमय जीवन कलेची पराकाष्ठा आहे. खरा रस त्यातच आहे कारण त्यातून रसाचे नित्यनूतन निर्झर निघत असतात. माणूस ते पिताना थकत नाही आणि ते निर्झर कधीही वाळत नाहीत. यज्ञ जर ओझ्यासारखा वा त्रासदायक वाटत असेल तर तो यज्ञ नसतो. भोगाच्या शेवटी विनाश आहे, त्यागाच्या अखेरीस चिरंतनता आहे. रस स्वतंत्र वस्तू नाही, रस आपल्या वृत्तीत असतो. एकाला नाटकाच्या

पडद्यात रस वाटतो तर दुस-याला आकाशात उघडणा-या नवनवीन पटात. अशा रीतीने रस हा संस्काराचा विषय आहे. लहानपणी ज्या गोष्टींमध्ये आनंद घेणे आपण शिकतो त्यात आपल्याला रस वाटतो. एकाला जे रसपूर्ण वाटते तेच दुस-याला रसहीन वाटते अशी अनेक उदाहरणे सापडतात.

शिवाय यज्ञ करणा-या अनेक सेवकांची अशी भावना असते की आम्ही निष्काम भावाने काम करत असल्यामुळे आम्हाला जे हवे ते आणि ज्याची गरज नसेल तेही घेण्याचा हक्क आहे. ज्याक्षणी सेवकाच्या मनात असा विचार येतो त्या क्षणी तो सेवक सेवक राहत नाही तर जुलमी हुकूमशहा बनतो. सेवेत आपल्या स्वतःच्या विचारांना स्थानच नसते. सेवेच्या सुखाचा विचार करणारा परमेश्वर असतो. त्याला आपल्याला जे द्यायचे असेल ते तो देईल. त्यामुळे सेवकासमोर जे येईल ते तो गोळा करत बसत नाही उलट तो अनेक गोष्टींचा त्याग करतो. त्याच्याकरिता जरी परिस्थिती सुखावह नसली तरी तो शांत राहील, चिडणार नाही, मनातूनही कोणाला दोष देणार नाही. यज्ञ करणा-याचा मोबदला - सेवकाची मजुरी - सेवाच आहे. त्यातच तो समाधानी असतो.

याशिवाय सेवाकार्यात दुर्लक्ष करून वा हातचे राखून चालत नाही. केवळ आपल्या स्वतःच्या कामात आपण काळजीपूर्वक वागले पाहिजे आणि सार्वजनिक कार्य कसेही आणि केव्हाही केले तरी चालते असे ज्याला वाटते त्याला सेवेच्या मूलभूत गोष्टीही कळलेल्या नाहीत असे म्हणावे लागेल. स्वेच्छेने स्वीकारलेल्या सेवाकार्यात माणसाच्या सर्वोत्तम कौशल्याची आवश्यकता असते आणि सेवकाने नेहमीच सार्वजनिक हिताला आपल्या वैयक्तिक हिताच्या वर ठेवले पाहिजे. खरे सांगायचे तर शुद्ध भक्त मानवतेच्या सेवेकरिता स्वतःचा बळी द्यायलाही तयार असतो.

## यज्ञ - ३

(खाजगी पत्रामधून)

१३-११-'३०

चरखा आणि फ्रेन्चबद्दल तू लिहिले आहेस. यात सैद्धांतिक दृष्टीकोनातून मला उणीव जाणवते. चरख्याला सर्वस्व अर्पण केल्यानंतर त्या वेळात वैयक्तिक लाभाची इतर कोणतीही गोष्ट करता येत नाही. कोणी येऊन गोष्टी करू लागला तर शिष्टाचार म्हणून बोला. पण म्हणून कोणी गप्पा मारून एवीतेवी आपला वेळ घेतोच आहे तर मग त्या वेळात आपण त्याच्याकडून काही शिकण्याचेही काम करून घेतले तर काय हरकत आहे असे समजणे चूक आहे, हा न्याय नाही. तुझी इच्छा असल्यास गप्पा मारण्याला तू नकार देऊ शकतोस आणि समोरची व्यक्तीही तू बोलतो आहेस म्हणून बोलत बसा असे म्हणून तुझा जास्त वेळ घेणार नाही. परंतु एकदा का त्याने तुझा शिक्षक होण्याचे मान्य केले की त्याला तुझ्याबरोबर पुरेसा वेळ बसणे आवश्यक होते. या सर्वांमागे यज्ञ म्हणून कताईकरिता देण्यात आलेल्या वेळेचा संदर्भ आहे. या युक्तिवादामधील मर्म मी स्वतः अनुभवले आहे. मी जर कताई करत असताना इतर कशाचा विचार करू लागलो तर त्याचा कताईच्या वेगावर व सुताच्या तलमपणावर परिणाम होतो. सुताच्या धाग्याचा पोत कमी जास्त होतो. कल्पना करा की रोमॉ रोलॉ बेथोवन वाजवत पियानोवर बसलेले आहेत आणि ते वाजवण्यात ते इतके तन्मय झालेले आहेत की ते ना काही बोलू शकतात आणि ना काही इतर विचार करू शकतात. कला आणि कलाकार वेगळे नसतात. ही गोष्ट जर पियानोकरिता खरी असेल तर कताईच्या यज्ञाकरिता किती खरी असेल? आज हे काम करत असताना तेवढी तन्मयता आपल्याला साध्य झाली नसेल. परंतु ती वेगळी गोष्ट आहे. आपण जर आपले आदर्श शुद्ध ठेवले तर एक ना एक दिवस त्या आदर्शापर्यंत पोहचण्यात आपल्याला यश येईलच.

मी तुला परत सांगतो की जे काही घडले त्याबद्दल टीका करण्याचा माझा विचार नाही. माझ्यासारख्या अतिशय अपूर्ण माणसाला टीका करण्याचा अधिकार तरी काय? मला जे काही कळते त्याप्रमाणे तरी मी कुठे वागू शकतो? असे झाले असते तर सात लाख खेड्यांमध्ये चरखासंगिताचा ध्वनी गुंजत राहिला असता. एवढेच नाही तर मला आज जे योग्य आहे असे वाटते त्याप्रमाणे मी वागू शकलो असतो तर इथे तुरुंगात बसल्याबसल्याच चरखा वायुवेगाने भारताच्या सात लाख खेड्यांमध्ये पसरला असता. 'माझी ही अपेक्षा आज जरी माझ्या शक्तीपलीकडील असली तरी तो विचार माझ्या मनात पक्का रुजला आहे. ईश्वराची आज्ञा झाली तर मी त्याच्या तेजाच्या ज्योतीप्रमाणे होईन.' (रायचंदभाईंच्या लेखनातून चोरलेले वाक्य. क्षमा.) परंतु मालवीयजी जर भागवत-पुराणाच्या गोष्टी करताना थकत नाहीत तर मग मी चरखासंगिताच्या गोष्टी करताना कसा थकेन? चरखापुराण असे मी अर्थातच म्हणू शकत नाही. पुराण रचण्यासारखे कार्य असेल तर त्याची रचना आमच्या नंतरची पिढी करील. सध्या तर आपल्याला याच्या भाग्यतंतूतून संगीत रचायचे आहे. अखेरीस त्यातून कसा सूर निघतो ते आपली तपश्चर्या, आपले समर्पण यांच्यावर अवलंबून राहील.

आता मी मागील पत्रातील युक्तिवादाबद्दल परत लिहीन...

मला वाटते की यज्ञाच्या वेळी मौन असावे आणि त्यावेळी विचार केवळ चरखा, खादी यांच्यासंबंधी असावा. अथवा आपण रामनामाचा जप करावा. रामनामाचा विस्तृत अर्थ केला पाहिजे. खरे पाहता रामनामाचा जप तर आपल्याकडून कळत न कळत सतत व्हायला पाहिजे. परंतु जे काम हात करत असतात त्यात आपले लक्ष केंद्रित होणार नसेल तर आपल्या सर्व विचारांमध्ये आणि कामांमध्ये संगीतातील तंबो-याप्रमाणे रामनामाची साथ असली पाहिजे. चरखा चालवत असताना आपण गोष्टी करतो वा लोक जे सांगतात ते ऐकतो वा इतर काही काम करतो. अशा प्रकारची कताई

निश्चितच यज्ञ नाही. कताईयज्ञ जर पवित्र कर्तव्य असेल तर त्यात आपण संपूर्णपणे गुतूंन जायला पाहिजे. ज्याचे जीवन यज्ञरूप आहे आणि जो अनासक्त आहे तो एका वेळी एकच काम करतो. मी मौन धारण करून कधीही एकांतात कताई करण्याकरिता बसलो नाही. हे सगळे मला माहीत असूनही या बाबतीत कमी अधिक प्रमाणात मीच पहिला अपराधी आहे. माझ्या मौनाच्या दिवसांमध्ये कताई करत असताना मी एक तर लोकांनी वाचून दाखवलेली पत्रे ऐकत असे वा लोकांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकत असे. ही गोष्ट इथेच संपत नाही. त्यामुळे दररोज नियमितपणे कताई करत असूनही २०० धाग्यांपेक्षा मी वेग वाढवू शकलो नाही यात काय नवल? इतरही अनेक दोष माझ्यात असल्याचे मला दिसतात - जसे की धागा तुटणे, माळ करणे न आवडणे, चरख्याबद्दलचे अल्पज्ञान, रुईची जात न ओळखता येणे, धाग्यामध्ये समान पोत नसणे आणि तंतूच्या प्रतवारीची कल्पना नसणे. ही गोष्ट यज्ञ करणा-याला शोभते काय? मग खादीची प्रगती संथ आहे यात नवल काय? ईश्वर जर खरोखर दरिद्रनारायण असेल आणि तो आहेच आणि त्याचा प्रसाद खादी आहे असे सांगणारा असूनही हा विचार अमलात आणण्याच्या दृष्टीने मी किती निष्काळजी आहे? त्यामुळे इतर कोणाला दोष देण्याची इच्छाच होत नाही. या बाबतीतील माझ्या स्वतःच्या उणिवा, त्यामुळे मला होणारे दुःख आणि या दुःखामुळे मला स्वतःबद्दल झालेली जाणीव हे सगळे मी केवळ तुला सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. काकांशी बोलताना अशा प्रकारच्या भावना मी काही वेळा व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी तू पहिली अशी व्यक्ती आहेस जिच्याजवळ मी हे विचार इतक्या स्पष्टपणे सांगतो आहे. तू फ्रेंच आणि कताई या दोन कामांना एकत्र करण्याचा प्रयत्न केलास म्हणून हे विचार व्यक्त करण्याची संधी मला मिळाली. मी तुला परत सांगू इच्छितो की मला तुझा कोणताही दोष दिसत नाही. चरख्याच्या मंत्राचा पुरस्कार करणारा मी किती अपूर्ण शिक्षक आहे हे

मला यामुळे कळले आणि ही गोष्ट जितकी या चरख्याला लागू पडते तितकीच जीवनालाही लागू पडते. मला मंत्र माहीत होता परंतु त्याच्या विधीनुसार मी पूर्णपणे आचरण केले नाही आणि त्यामुळे त्याच्या पूर्ण शक्तीचा आपल्याला अनुभव येऊ शकला नाही. इथे कताईकरिता जो युक्तिवाद मी केला तो सर्व जीवनालाही लागू पडतो. त्यामुळे कल्पनेत तरी तुला जीवनातील अद्‌भुत शांततेचा आणि सफलतेचा अनुभव येईल. 'योगः कर्मसू कौशलम्'चा हाच अर्थ आहे. काम करताना जेवढे शक्य असेल तेवढेच करायचे, तेवढेच हाती घेऊन त्यात समाधान मानायचे. मला खात्री आहे की असे केल्यामुळे आपली आणि समाजाची तीव्रतम प्रगती होईल. परंतु मीच जर याप्रमाणे सर्व गोष्टींमध्ये पूर्णपणे आचरण केले नाही तर ते पुस्तकी पांडित्य होईल. दिवसेंदिवस यामध्ये मी निश्चितच प्रगती करतो आहे. येथून सुटका झाल्यानंतर काय होईल ते देवालाच माहीत. कताई यज्ञाकरिता जितके तार कातण्याचे तू ठरवले आहेस तेवढे तार तू शास्त्रोक्त पद्धतीने कात. बाकी राष्ट्राच्या संपन्नतेकरिता तुला जी कताई करायची असेल ती तू तुझ्या पद्धतीने कर. अजूनही पुढे लिहिण्याचा मोह होतो आहे, पण आता इथे पुरे.

## अध्याय पाचवा

अर्जुन म्हणाला, 'हे कृष्णा तू ज्ञानाची फार प्रशंसा करतोस. त्यामुळे मला वाटू लागले आहे की कर्म करण्याची काही आवश्यकता नाही. परंतु नंतर तू कर्माचीही प्रशंसा करतोस. त्यामुळे यज्ञकर्म करणे हेच योग्य आहे असे मला वाटू लागते. परंतु या दोनपैकी कोणता मार्ग श्रेयस्कर आहे हे जर तू मला सांगितलेस तरच मला शांती मिळेल.'

हे ऐकून भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, 'संन्यास म्हणजे ज्ञान

आणि कर्मयोग म्हणजे निष्काम कर्म. या दोन्ही गोष्टी चांगल्या आहेत परंतु मला या दोनपैकी एकाचीच निवड करावी लागणार असेल तर मी म्हणेन की योग म्हणजे अनासक्तीपूर्ण कर्म हेच श्रेष्ठ आहे. जो माणूस कोणाचाही वा कशाचाही द्वेष करत नाही, कशाचीही इच्छा ठेवत नाही आणि जो उष्ण-शीत, सुख-दुःख वगैरेसारख्या विरोधी गोष्टींपासून दूर राहतो तो संन्यासी असतो, मग तो कर्म करत असो की नसो. यामुळे काहीही फरक पडत नाही. असा माणूस सहज कर्मबंधनांपासून मुक्त होतो. अज्ञानी माणूस ज्ञान आणि कर्म वेगवेगळे आहेत असे म्हणू शकतो, ज्ञानी माणूस नाही. दोघांचेही फळ एकच आहे आणि दोघेही एकाच स्थानाकडे घेऊन जातात. त्यामुळे या दोन्ही गोष्टी एकच आहेत हे जो ओळखतो तोच खरा ज्ञानी. शुद्ध ज्ञान असलेला माणूस केवळ इच्छा करून आपले ईप्सित साध्य करू शकतो, त्याकरिता बाह्य कर्म करण्याची त्याला गरज नसते. जेव्हा जनकपुरी जळत होती तेव्हा इतर सर्व लोकांचे कर्तव्य ती आग विझवण्याकरिता धावपळ करणे होते, जनक राजाचे नाही. कारण जनक राजाचे सेवक त्याचे आज्ञापालन करण्याकरिता तत्पर होते. आग विझवण्याकरिता जनकराजा जर स्वतः पाण्याचे भांडे घेऊन धावत गेला असता तर लोक त्याच्याचकडे पाहत राहिले असते, आपले कर्तव्य विसरले असते आणि त्याला आगीपासून वाचवण्याकरिता धडपडू लागले असते. त्यामुळे आग विझवण्याच्या कामात व्यत्ययच आला असता. परंतु आपल्यापैकी कोणीही एकदम जनकाची अवस्था प्राप्त करून घेऊ शकत नाही. ती स्थिती फार दुर्लभ आहे. करोडोतून एखादाच आपल्या सेवेच्या बळावर या अवस्थेप्रत पोहोचू शकतो आणि ही अवस्था काही गुलाब पुष्पाच्या शय्येप्रमाणे सुखकर नसते. माणूस जसजसा निःस्वार्थ कर्म करू लागतो तसतशी त्याच्या विचारांची ताकद वाढू लागते आणि त्याला बाह्य कर्मांचा कमीत कमी आधार घ्यावा लागतो परंतु या बदलाची त्या व्यक्तीला मात्र क्वचितच जाणीव असते. या बदलाकरिता

तो धडपडतही नसतो. त्याने स्वतःला केवळ सेवाकार्याकरिता वाहून घेतलेले असते. त्यामुळे सेवा करण्याची त्याची शक्ती इतकी वाढलेली असते की सेवाकार्यापासून विसावा घेण्याची गरजही त्याला क्वचितच पडते आणि अखेरीस त्याची सेवा केवळ संकल्पापर्यंतच मर्यादित होते. अतिशय वेगात जाणारी गोष्ट स्थिर असल्यासारखी वाटावी तसेच हे. असा माणूस काहीही करत नाही असे म्हणणे चुकीचे होईल. परंतु या अवस्थेची केवळ कल्पना करता येऊ शकते, तिचा अनुभव घेता येऊ शकत नाही. त्यामुळे मी कर्मयोग पसंत करतो. करोडो लोक निष्काम कर्म करूनच संन्यासाची फळे उपभोगतात. त्यांनी जर संन्यास घेण्याचा प्रयत्न केला तर दोन घोड्यांवर बसण्याचा प्रयत्न करणा-या स्वाराप्रमाणे त्यांची अवस्था होईल. ते जर संन्यासाकडे वळले असते तर ते दांभिकतेकडे वळण्याचा धोका होता आणि त्यांनी कर्म करणे बंद केलेले असल्यामुळे ते सर्व काही गमावतात. परंतु ज्या माणसाने निःस्वार्थ कर्माद्वारे स्वतःला शुद्ध केलेले असते, मन आणि इंद्रिये ज्याच्या नियंत्रणात असतात आणि जो सर्व प्राणीमात्रांशी तादात्म्य पावलेला असतो आणि स्वतःला त्यांच्यातीलच एक समजतो असा माणूस अहोरात्र कर्म करत असला तरी तो त्या कर्मांपासून वेगळा असतो, त्याला कर्मबंधने बांधू शकत नाहीत. तो बोलतो, चालतो, दैनंदिन कामात भाग घेतो परंतु त्याच्या हालचाली या केवळ त्याच्या कर्मेंद्रियांच्या हालचाली असतात, तो काहीच करत नाही असे आढळून येते. शारीरिक दृष्टीने निरोगी असलेल्या माणसाच्या हालचाली स्वाभाविक आणि उत्स्फूर्त असतात. उदाहरणार्थ त्याच्या पोटाचे कार्य तो काहीही करत नसताना चालत असते, त्याला त्याची काळजी घेण्याची गरज नसते. त्याचप्रमाणे ज्याचा आत्मा निरोगी आहे तो माणूस अलिप्त असतो, तो काहीही करत नाही असे दिसते. असा माणूस आपली सगळी कर्मे ब्रह्मार्पण करतो व ब्रह्मदेवाच्या वतीने तो सर्व कामे करतो. त्यामुळे तो कर्म करत असला तरी त्या कामाच्या चांगल्या

वाईट फळाचा तो भागीदार होत नाही. कमलपत्र पाण्यात राहत असूनही पाण्यापासून अस्पर्श असते त्याचप्रमाणे योगी पुरुषालाही (निःस्वार्थ कर्म करणारा) कर्मफलाचा स्पर्श होत नाही. अशा प्रकारची अनासक्ती ज्याने मिळवलेली असते त्याला योगी म्हणतात. मनाने, बुद्धीने कार्य करत राहूनही अनासक्त भावाने काम करत असताना ती व्यक्ती अहंकारविरहित होते, शुद्ध होते व तिला स्वर्गीय शांततेचा लाभ होतो. तिलाच योगी असे म्हणतात. उलटपक्षी अ-योगी व्यक्तीला कर्मफलाची अपेक्षा असल्यामुळे ती आपल्याच इच्छांची गुलाम बनते. योगी नऊ दारे असलेल्या या देहात आनंदात राहतो. त्याने आपल्या सर्व कर्मांचा बुद्धिपूर्वक त्याग केलेला असतो व त्याला काही करायचे नसते आणि कुणाकडून काही करवूनही घ्यायचे नसते. त्यामुळे तो सुखी असतो. संस्कारी शुद्ध आत्मा ना पाप करतो ना पुण्य करतो. ज्याने कर्मफलाबद्दलची आसक्ती काढून घेतलेली असते, अहंकाराचा नाश केलेला असतो, फळांचा त्याग केलेला असतो ती व्यक्ती जडवत होऊन वागत असते, निमित्तमात्र वर्तत असते. तिला पापपुण्याचा स्पर्श कसा होऊ शकेल? मालकाच्या म्हणजे ईश्वराच्या हुकुमाप्रमाणे आणि इच्छेप्रमाणे काम करणा-या यंत्रासारखी त्या व्यक्तीची परिस्थिती होते. त्यामुळे अशा व्यक्तीकरिता निंदास्तुतीत भागीदार होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. उलटपक्षी अज्ञानी माणूस सतत गणित करत असतो - मी इतके पुण्यकर्म केले, इतके पाप केले. असे करत करत तो अजून खोलवर खड्ड्यात रुतत जातो. त्यामुळे अखेरीस तो एकाच गोष्टीकरिता पात्र ठरतो - पापाकरिता. जो माणूस दररोज ज्ञानाद्वारे आपले अज्ञान नष्ट करत जातो त्याच्या कार्यातील शुद्धता दिवसेंदिवस वाढत जाते आणि जगालाही तो परिपूर्ण आणि गुणवान पुरुष असल्याचे जाणवू लागते. अशा माणसाची कर्मे स्वाभाविकपणे होत असलेली दिसून येतात. असा पुरुष समदर्शी होतो. अशा योगी पुरुषाच्या दृष्टिकोनातून विद्वान आणि सौजन्यशील पुरुष, ब्रह्मज्ञानी ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा आणि

पशुपेक्षाही हीन असलेला माणूस हे सर्व सारखे असतात. म्हणजे या सर्वांची तो सारख्याच भक्तिभावाने सेवा करतो. तो एकाचे आदरपूर्वक स्वागत करत नाही की दुस-याला घृणेने धुडकावून लावत नाही. निःस्वार्थ सेवा करणारा माणूस स्वतःला जगाचा ऋणको समजत असतो. तो प्रत्येकाच्या कर्जाची परतफेड करण्याचा व प्रत्येकाला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न करत असतो. असा माणूस इथेच सर्व जगाला जिंकून घेतो. या भूतलावरील प्रत्येक प्राणिमात्राकडे पाहून त्याला त्यातील ईश्वराचे दर्शन होते व त्या प्राण्याची सेवा करत असताना त्याला ईश्वराची सेवा करत असल्यासारखे जाणवते. कोणी त्याची स्तुती केली तर तो आनंदाने नाचत नाही आणि कुणी त्याच्यावर निंदेचा वर्षाव केला तरी त्याला त्याचे दुःख होत नाही. आसक्ती असलेली व्यक्ती या भौतिक जगात गुंतलेली असते स्वतःबाहेर सुखाचा शोध घेत असते. उलटपक्षी अहंकार विरहित होऊन अनासक्तभावाने काम करणा-या माणसाने आपले मन बाह्य विषयांतून काढून घेतलेले असल्यामुळे त्याला चिरंतन शांततेचा झरा स्वतःच्या आतच असल्याचे आढळते. सर्व इंद्रियजन्य सुखांमधूनच वेदनांचा उगम होत असतो. त्यामुळे प्रत्येकाने कामना, क्रोध यांसारख्या षड्रिपूंचा हल्ला परतवून लावला पाहिजे. निःस्वार्थी योगी सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाकरिता अहोरात्र झटत असतो. त्याचे सर्व संशय नष्ट झालेले असतात. तो या जगात राहत असला तरी तो या जगाचा नसतो. प्राणायाम वगैरेंच्या मदतीने त्याने आपली दृष्टी आत वळवलेली असते व कामनांवर विजय मिळवलेला असतो. मीच सर्वश्रेष्ठ परमेश्वर आहे, सखा आहे आणि त्यागभावनेने करण्यात आलेली सेवाही माझ्याकडेच पोहोचत असते हे त्याला माहीत असल्यामुळे त्याला चिरंतन शांतता प्राप्त होते.'

## अध्याय सहावा

येरवडा मंदिर
१६-१२-३०
मंगलप्रभात

श्री भगवान म्हणाले, 'कर्मफळ सोडून जो माणूस आपले कर्तव्य पार पाडतो त्याला आपण संन्यासी अथवा योगी म्हणू शकतो. परंतु जो अगदीच कर्म करत नाही तो आळशी असतो. खरे सांगायचे तर त्याने मनाच्या घोड्याला इकडेतिकडे पळण्याची परवानगी देऊन केवळ काम सोडलेले असते. या म्हणण्याचा आशय हा आहे की माणसाने आपले चित्त इच्छेच्या एका विषयापासून दुस-या, दुस-या विषयापासून तिस-या विषयाकडे अशा प्रकारे भरकटू देऊ नये. सर्वांप्रती समभाव असेल तर माणूस कर्म केल्याशिवाय राहूच शकत नाही. ज्या माणसामध्ये असा समत्वभाव आलेला असेल तो माणूस शांत दिसत असला तरी त्याच्या विचारात कर्माचे बळ आलेले असते. ज्या माणसाला इंद्रियविषयांबद्दल वा कर्माबद्दल आसक्ती वाटत नसते व ज्याचे चित्त सतत इकडे तिकडे भरकटत नाही त्या माणसाने योग साध्य केला - तो योगारूढ झाला असे म्हणतात.

'आत्म्याचा उद्धार आत्म्याद्वारेच होऊ शकतो. माणूस स्वतःच्या कल्याणाकरिता वा अधोगतीकरिता स्वतःच जबाबदार असतो असे आपण म्हणू शकतो. त्यामुळे परिस्थितीनुसार तो स्वतःच स्वतःचा मित्र वा शत्रू असू शकतो. ज्याने आपले मन जिंकलेले असते त्याचा आत्मा त्याचा मित्र असतो आणि ज्याने स्वतःवरील नियंत्रण गमावलेले असते त्या माणसाचा आत्माच त्याचा शत्रू असतो. उष्ण, शीत, सुख, दुःख, मान, अपमान अशा प्रकारच्या गोष्टींमुळे अंतःकरणातील शांतता न ढळणे ही मनाला जिंकण्याची कसोटी आहे. ज्या माणसाला ज्ञान असते व अनुभवही असतो, जो विचलीत होत नाही आणि ज्याचा आपल्या इंद्रियांवर ताबा असतो; सोने, दगड, माती हे सर्व

ज्याला समान वाटतात तो माणूस योगी असतो. असा माणूस शत्रू-मित्र, पापी-पुण्यवान या सर्वांना सम दृष्टीने पाहतो. ही अवस्था प्राप्त करून घेण्याकरिता चित्त स्थिर करावे लागते, वासनांचा त्याग करावा लागतो, एकांतात बसून ईश्वराचे ध्यान करावे लागते. केवळ योगासने करणे याकरिता पुरेसे नसते. चित्ताची समभावना प्राप्त करून घेण्याकरिता माणसाला ब्रह्मचर्यासारख्या महाव्रतांचे पालन करावे लागते. अशा प्रकारे जो माणूस आपल्या स्थानावर स्थिर राहून सर्व व्रतांचे पालन करतो आणि परमेश्वरावर आपले लक्ष केंद्रित करतो त्या माणसाला परिपूर्ण शांततेचा लाभ होतो. खादाड, विनाकारण उपवास करणारा, झोपाळू वा जागरण करणारा यांच्यामध्ये समतोल वृत्ती निर्माण होऊ शकत नाही. समतोल वृत्ती धारण करू इच्छिणा-याला आपले खाणेपिणे, झोपणे आणि जागे राहणे अशा सर्व वर्तनांमध्ये प्रमाणबद्धता राहील याची काळजी घ्यावी लागते. एक दिवस भरपूर खायचे आणि दुस-या दिवशी उपवास करायचा, एखाद्या दिवशी दिवसभर झोप काढायची आणि दुस-या दिवशी जागरण करायचे, एक दिवस खूप काम करायचे आणि दुसरा दिवस आळसात घालवायचा हे योगी पुरुषाचे लक्षण नाही. योगी पुरुषाची मनोवृत्ती सदैव स्थिर असते आणि कामनामात्रांचा त्याने सहजपणे त्याग केलेला असतो. वारा नसलेल्या ठिकाणी स्थिरपणे तेवणा-या ज्योतीप्रमाणे योगी असतो. या विश्वपटलावरील नाट्यमय घडामोडींमुळे म्हणा वा स्वतःच्या विचारांमुळे म्हणा तो इकडेतिकडे घरंगळत नाही. अशा प्रकारची मानसिक अवस्था हळूहळू परंतु सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे साध्य होऊ शकते. मन अस्थिर आणि चंचल असते. हळूहळू त्याला स्थिर करावे लागते. ते स्थिर होईल तेव्हाच शांती मिळू शकते. मनाला स्थिर करण्याकरिता आत्म्यावर लक्ष केंद्रित करावे लागते. असे केले की त्याला स्वतःमध्ये सर्व प्राणिमात्रांचे दर्शन होईल आणि सर्वांमध्ये त्याचे स्वतःचे दर्शन होईल. सर्व प्राणिमात्रांमध्ये मीच असल्यामुळे असे होते. ज्याने स्वतःला माझ्यामध्ये विलीन करून टाकलेले

असते आणि ज्याला मी सर्वत्र दिसतो तो तो राहत नाही. मग तो काहीही करत असला तरी त्याचे सूर मात्र माझ्याशीच जुळलेले असतात आणि त्याच्याकडून न करण्यासारखे कृत्य होऊच शकणार नाही.'

श्रीकृष्णाने योगाचे केलेले हे वर्णन अर्जुनाला कठीण वाटले. त्यामुळे तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'मनाची ही समतोलवृत्ती कशी मिळवायची? मन हे माकडाप्रमाणे असते. वा-याला नियंत्रित करता आले तर मनाला नियंत्रित करता येईल. अशा या मनाला नियंत्रणात कसे ठेवायचे?'

भगवान म्हणाले, 'तू म्हणतोस ते बरोबर आहे. परंतु माणसाने जर रागद्वेष यांच्यावर विजय मिळवण्याचा गंभीरपणे प्रयत्न केला तर तो तसे करू शकतो. मन जिंकल्याशिवाय योग साध्य होऊ शकत नाही हे मात्र खरे आहे.'

यावर अर्जुनाने परत विचारले, 'समजा माणसामध्ये श्रद्धा आहे परंतु तो प्रयत्नांमध्ये कमी पडतो व त्यामुळे तो निर्दोष होऊ शकत नाही. अशा माणसाचे काय होते? आकाशातील फुटलेले ढग ज्याप्रमाणे विरून जातात तसा तो नष्ट होतो काय?'

भगवान म्हणाले, 'योग्य मार्गाने वाटचाल करणारा माणूस ज्याप्रमाणे चुकीच्या ठिकाणी पोहोचू शकत नाही त्याप्रमाणे अशा प्रकारच्या श्रद्धाशील माणसाचा अंत कधीही वाईट होऊ शकत नाही. पुण्यवान लोक राहत असलेल्या स्वर्गामध्ये त्याच्या पुण्याच्या प्रमाणात तो राहतो आणि त्यानंतर तो परत एखाद्या पवित्र कुटुंबात जन्म घेतो. असा जन्म लोकांकरिता दुर्लभ असतो. त्यानंतर त्याचे पूर्वजन्मीचे संस्कार परत वर येतात व निर्दोष होण्याकरिता तो अधिक जोरदार संघर्ष करू लागतो आणि आपल्या अंतिम ध्येयापर्यंत पोहोचतो. अशा प्रकारे कठोर परिश्रम करणा-या काही लोकांना समतोल वृत्ती लवकर प्राप्त होते तर इतर काहींना त्यांच्या परिश्रमाच्या आणि श्रद्धेच्या प्रमाणात समतोल वृत्ती धारण करण्याकरिता अनेक जन्म घालवावे लागतात. ही समतोल वृत्ती तप, ज्ञान, पवित्र व्रते यांच्यापेक्षासुद्धा श्रेष्ठ असते

कारण या सगळ्या गोष्टी समतोल वृत्तीच्या प्राप्तीकरताच करण्यात येत असतात. त्यामुळे हे अर्जुना, तू समत्वबुद्धीचा योगी हो आणि या योग्यांमधूनही जो मला आपले सर्वस्व अर्पण करतो आणि पूर्ण श्रद्धेने माझी भक्ती करतो असा सर्वश्रेष्ठ योगी हो..'

(प्राणायाम आणि आसनांचा या अध्यायात गुणग्राहकतेने उल्लेख करण्यात आला आहे. पण त्याचबरोबर आपण लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वराच्या अधिकाधिक जवळ जाण्याकरिता ब्रह्मचर्य आणि यमनियमादींचे पालन यांचेही महत्त्व या अध्यायात सांगण्यात आले आहे. आपल्याला नीटपणे कळायला हवे की केवळ आसन आणि तत्सम गोष्टी करून समतोल वृत्ती धारण करता येऊ शकत नाही. समतोल वृत्ती प्राप्त व्हावी या एकाच उद्दिष्टाने आपण आसन केले तर त्यांचा त्याकरिता उपयोग होऊ शकेल. असे केले नाही तर इतर शारीरिक व्यायामांच्या प्रशिक्षणापेक्षा आसनांचा आणि प्राणायामाचा फारसा जास्त उपयोग नाही. शारीरिक व्यायाम म्हणून ते फार चांगले आहेत आणि माझा विश्वास आहे की आत्म्याकरिता या शारीरिक व्यायामांचा लाभही आहे. म्हणून शारीरिक दृष्टीने आपण ते करू शकतो. परंतु माझ्या असे लक्षात आले आहे की सिद्धी प्राप्त करण्याकरिता आणि चमत्कार करता येण्याकरिता जेव्हा यांचा उपयोग केला जातो तेव्हा त्यांच्यामुळे आपली हानी होऊ शकते. या प्रकरणाचा अभ्यास गेल्या तीन प्रकरणांचा सारांश म्हणून करण्यात यावा. आध्यात्मिक प्रगतीकरिता आपला जो संघर्ष सुरू आहे त्याकरिता या प्रकरणांच्या अभ्यासामुळे प्रोत्साहन मिळते आणि समतोल वृत्ती धारण करण्याकरिता प्रयत्न करण्यास ते आपल्याला उद्युक्त करतात.)

## अध्याय सातवा

२३-१२-'३०

भगवान म्हणाले, 'हे राजा, आपले सर्व चित्त मला समर्पित करून माझ्यातच आश्रय घेऊन कर्मयोगाप्रमाणे आचरण करणा-या व्यक्तीला माझे संपूर्ण ज्ञान कसे होते व त्या ज्ञानासंबंधी त्याच्या मनात किंचितही संशय कसा राहत नाही हे मी तुला आता सांगेन. अनुभवावर आधारित हे ज्ञान तुला कळल्यानंतर तुझ्याकरिता जाणण्यासारखे काहीही शिल्लक राहणार नाही. हजारोंमधून एखादाच हे ज्ञान मिळवण्याकरिता प्रयत्नशील असतो आणि अशांपैकी एखाद्यालाच ते मिळवण्यात यश मिळते.

'पृथ्वी, पाणी, अग्नी, वारा, आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार या आठ प्रकारांमध्ये माझी प्रकृती विभाजित आहे. हिला अपरा प्रकृती म्हणतात आणि दुसरी परा प्रकृती आहे. ही जीवनाच्या स्वरूपाची आहे. या दोन प्रकृतींच्या देहजीवनाच्या संबंधातून संपूर्ण जगाची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींचे निर्मितिकारणही मीच आहे आणि यांच्या विनाशाकरिताही मीच कारणीभूत होत असतो. ज्याप्रमाणे हारातील मोती धाग्याच्या आधारावर एकत्र असतात त्याचप्रमाणे हे जगही माझ्यामुळेच एकत्र आहे. त्यामुळे मी पाण्यामधील रस आहे, सूर्यचंद्रामधील प्रकाश आहे, वेदांमधील 'ओम' आहे, आकाशामधील ध्वनी आहे आणि पुरुषांमधील पराक्रम आहे, पृथ्वीमधील गोड गंध आहे, अग्नीमधील तेज आहे, प्राणिमात्रांचे जीवन आहे, तपस्व्यांचे तप आहे, बुद्धिमान लोकांमधील बुद्धी आहे, सबळांमधील शुद्ध बळ आहे आणि सर्व प्राणिमात्रांमधील सदाचाराच्या विरोधात न जाणारी कामना आहे. तू लक्षात ठेव की थोडक्यात सांगायचे तर सत्त्व, रज आणि तम या तिन्ही गुणांच्या अवस्थांचा जनकसुद्धा मीच आहे आणि त्यांचा अंतही एकट्या माझ्यामध्येच होत असतो. हे विश्व या तीन गुणांनी मोहीत झालेले असल्यामुळे त्याला माझ्या अविनाशी स्वरूपाचे ज्ञान नाही. माझ्या मायेने निर्माण केलेल्या गुणांवर

मात करणे फार कठीण आहे. परंतु जे लोक माझ्या आश्रयाला येतात ते सहजपणे या मायेला म्हणजे या तीन गुणांना ओलांडून पलीकडे जाऊ शकतात.

परंतु आचारविचाराला धरबंध नसलेले मूर्ख लोक मला शरण येण्याची कल्पना कशी करू शकतील? ते मायारुपी अंधारात चाचपडत असल्यामुळे त्यांना ज्ञान मिळू शकत नाही. परंतु सत्कर्म करणारे लोक माझी भक्ती करत असतात. तर काही कर्तव्य समजून माझे ज्ञान मिळवण्याकरिता असे करत असतात. माझी भक्ती करण्याकरिता ते जगाची सेवा करत असतात. त्यातील कोणी दुःखामुळे, कोणी काही लाभ मिळवण्याकरिता, तर कोणी 'चला सेवा केल्याने काय होते ते पाहू या' असे म्हणून सेवा करतात. तर इतर काही जाणीवपूर्वक एक कर्तव्य म्हणून, राहवत नाही म्हणून सेवाकार्य करत असतात. हे माझे ज्ञानी भक्त आहेत. इतर सर्व वर्गातील भक्तांपेक्षा हे मला अधिक प्रिय आहेत. ते मला अधिक चांगले ओळखतात आणि ते माझ्याजवळ असतात असेही म्हणता येईल. त्यांनी मिळवलेले ज्ञान हे त्यांच्या अनेक जन्माच्या तपश्चर्येचे फळ असते. ते ज्ञान मिळाल्यानंतर त्यांना या जगात माझ्याशिवाय - वासुदेवाशिवाय इतर काहीही दिसत नाही. परंतु जे इतर इच्छांनी प्रभावित झालेले असतात ते वेगवेगळ्या देवतांची पूजा करतात. परंतु प्रत्येकाच्या भक्तीच्या प्रकाराप्रमाणे फळ देणारा मीच असतो. मर्यादित ज्ञानाने भक्ती करणा-याचे फळही मर्यादितच असते. परंतु त्यांचे तेवढ्याने समाधान होते. अज्ञानामुळे काही लोकांना असे वाटते की इंद्रियांद्वारे त्यांना झालेले माझे ज्ञानच बरोबर आहे. त्यांना हे कळतच नाही की माझे चिरंतन आणि अविनाशी स्वरूप इंद्रियांच्या आवाक्यापलीकडील आहे आणि हात, कान, नाक, डोळे इत्यादी इंद्रियांनी माझ्या स्वरूपाचे आकलन होऊ शकत नाही. मी जरी सर्वांचा निर्माता असलो तरी अशा प्रकारे अज्ञानी माणसाला माझे ज्ञान होऊ शकत नाही. हीच माझी योगमाया (निर्मितीशक्ती) आहे. आवड

आणि नावड यांचे अपरिहार्य परिणाम सुख आणि दुःख हे आहेत. यांच्यामुळेच मानवजात भ्रमात राहत असते. परंतु भ्रमाचे हे जाळे तोडून ते स्वतःला मुक्त करतात आणि आपल्या आचारविचारांना शुद्ध करतात. असे लोक व्रतस्थ राहून सतत माझीच भक्ती करत असतात. ते मला पूर्णब्रह्माच्या (निराकार) शुद्ध स्वरूपातही ओळखतात आणि विविध आकाराच्या प्राण्यांमधील आणि विविध कर्मांमधील माझ्या स्वरूपाचेही त्यांना ज्ञान असते. अशा प्रकारे जे मला अधिभूत म्हणजे भौतिक, अधिदैव म्हणजे दैवी स्वरूपात आणि अधियज्ञरूपाने ओळखतात त्यांना समत्व बुद्धी प्राप्त झालेली असते. त्यांची मृत्यूनंतरच्या जन्ममृत्यूच्या फे-यातून मुक्तता होते कारण हे ज्ञान झाल्यानंतर त्यांचे चित्त इतर सटरफटर गोष्टींकडे भरकटत नाही. तसेच संपूर्ण विश्व परमेश्वराने भरलेले असल्याचे त्यांना दिसत असल्यामुळे ते परमेश्वरामध्ये विलीन होतात.

## अध्याय आठवा

२९-१२-३०

सोमप्रभात

अर्जुनाने विचारले, 'तू पूर्णब्रह्म (निराकार), अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव आणि अधियज्ञ ही नावे घेतली परंतु या सर्व शब्दांचा अर्थ मला कळू शकला नाही. शिवाय जे मला अधिभूत म्हणून ओळखतात आणि ज्यांनी समतोल वृत्ती प्राप्त केलेली असते त्यांना मृत्यूच्या वेळी माझी ओळख पटते. हे सर्व तू मला समजावून सांग.'

या प्रश्नाचे उत्तर देत श्री भगवान म्हणाले, 'पूर्णब्रह्म म्हणजे परमेश्वराचे सर्वोच्च अविनाशी स्वरूप आणि अध्यात्म म्हणजे प्राणिमात्रांच्या देहात राहणारा, कर्ता-भोक्ता आत्मा. ज्यामुळे सर्व जिवांची निर्मिती होते ते कर्म. वेगळ्या शब्दात सांगायचे तर कर्म म्हणजे निर्मितीप्रक्रिया, नाशिवंत देहाच्या

स्वरूपातील मी म्हणजे अधिभूत आणि अधियज्ञ म्हणजे त्यागाद्वारे पवित्र झालेला व्यक्तीचा आत्मा. अशा प्रकारे देह, मायेत गुंतलेला माणूस, पवित्र आत्मा वा ब्रह्म अशा सर्वांमध्ये मीच असतो. या दृष्टिकोनातून मृत्यूच्या वेळी जो माझे ध्यान करतो, जो स्वतःला विसरतो व कशाचीही काळजी करत नाही व कशाचीही इच्छा ठेवत नाही तो माझ्या स्वरूपाशी एकरूप होतो. माणसाच्या मनात सतत जे सुरू असते व मृत्यूसमयी त्याला जे आठवते तेच त्याला प्राप्त होते. त्यामुळे तू सतत माझे स्मरण केले पाहिजे आणि तू तुझे चित्त आणि मन माझ्यावर केंद्रित केले पाहिजे. असे केलेस तर तू खात्रीपूर्वक माझ्याकडे येशील. तू म्हणशील की अशा प्रकारे मन स्थिर करणे कठीण असते. परंतु मी तुला खात्रीपूर्वक सांगतो की चिकाटीपूर्वक दररोज अभ्यास केला तर कोणतीही गोष्ट आपण साध्य करू शकतो. मी आताच सांगितल्याप्रमाणे सर्व देहधारी व्यक्तींमध्ये साररूपाने मीच असतो. त्यामुळे मृत्यूसमयी आपले मन इकडेतिकडे भरकटू नये म्हणून माझ्या भक्तीतच रममाण होऊन जीवनशक्तीला (प्राण) माझ्यावर केंद्रित करण्याचा आणि सर्वज्ञ, पुरातन, सर्वांवर राज्य करणा-या आणि सूर्याप्रमाणे सर्वांचा अज्ञानरुपी अंधकार दूर करणा-या माझ्या स्वरूपाचे ध्यान करण्याचा अभ्यास माणसाने सुरुवातीपासून केला पाहिजे.

'वेदांमध्ये या सर्वोच्च अवस्थेला 'अक्षरब्रह्म' (अविनाशी ब्रह्म) म्हणून संबोधले आहे. ज्या ऋषीमुनींनी रागद्वेषादींचा त्याग केला होता ते या अवस्थेपर्यंत पोहोचले होते. ही अवस्था प्राप्त करू इच्छिणा-यांना ब्रह्मचर्याचे पालन करावे लागते म्हणजे त्यांना आपले शरीर, मन आणि वाणी यांच्यावर नियंत्रण ठेवावे लागते आणि वरील तीन मार्गांनी इंद्रियांच्या सर्व विषयांचा त्याग करावा लागतो. ज्या स्त्री-पुरुषांनी इंद्रियनिग्रह केलेला असतो आणि मृत्यूसमयी जे 'ओम्' हा पवित्र एकाक्षरी शब्द उच्चारत माझे स्मरण करतात व ते या सर्वोच्च अवस्थेला पोहोचतात. त्यांचे मन इतर विचारांनी कधीही

इकडेतिकडे भरकटत नाही. अशा प्रकारे ते जेव्हा माझ्याकडे येतात तेव्हा त्यांना यातनामय परिस्थितीतील पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे माझ्याकडे येणे हाच आहे.

'माणसे आपल्या जीवनाच्या दृष्टिकोनातून शतकांमध्ये काळाची गणना करतात व या काळात हजारो पाशांमध्ये स्वतःला गुंतवून घेतात. परंतु काळ अनंत आहे. हजार युगांचा मिळून ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. त्यासमोर मानवी दिवस वा शतक कुठे राहील? त्यामुळे या अनंत काळाचे मोजमाप करण्याच्या व्यर्थ प्रयत्नाला काय अर्थ आहे? कालचक्रात मानवी जीवन हे जणू काही एखाद्या क्षणाप्रमाणे आहे. त्यामुळे इतर सर्व गोष्टी सोडून देऊन केवळ कालातीत ईश्वरावरच विचार केंद्रित करणे त्याच्याकरिता उचित आहे. क्षणिक सुखांच्या मागे धाव घेणे आपल्याला कसे काय परवडू शकते? निर्मिती आणि विनाश या गोष्टी ब्रह्माच्या विश्वात रात्रंदिवस अविरत सुरू असतात आणि पुढेही सुरू राहणार आहेत.

'उत्पत्ती आणि विलय करणारा ब्रह्म हे माझेच इंद्रियांना अगोचर असे रूप आहे. या अप्रगट स्वरूपाच्या पलीकडे माझे अजून एक सनातन अप्रगट रूप आहे व त्याबद्दल मी तुला सांगितलेलेच आहे. माझ्या या स्वरूपाच्या बाबतीत रात्र आणि दिवसाच्या द्वंद्वाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. ते केवळ शांत अविचल स्वरूप आहे. एकाग्र चित्ताने भक्ती करणा-यालाच याची प्रचिती येऊ शकते. माझे हेच रूप संपूर्ण विश्वाला आधारही देते आणि ते विश्वात सर्वत्र व्याप्तही असते.

असे म्हणतात की उत्तरायणातील शुद्ध पक्षात जो माझे स्मरण करत मरण पावतो तो माझ्याकडे येतो आणि जो दक्षिणायनातील वद्य पक्षात रात्री मरण पावतो त्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो. उत्तरायणाचा अर्थ इथे निःस्वार्थ सेवा आणि दक्षिणायनचा अर्थ स्वार्थी भावनेने केलेले काम असा घेता येईल. सेवामार्गाने मुक्ती आणि स्वार्थाच्या मार्गाने बंधन. सेवामार्ग हा ज्ञानमार्ग आहे

आणि स्वार्थमार्ग हा अज्ञानाचा मार्ग आहे. जो माणूस ज्ञानमार्गाने चालतो तो जन्ममृत्यूच्या फे-यातून सुटतो आणि अज्ञानाच्या मार्गाने जाणा-याला मात्र जन्ममृत्यूची शृंखला कायम जखडून ठेवते. या दोन गोष्टींमधील अंतर कळल्यानंतरही अज्ञानाचा मार्ग निवडण्याएवढा मूर्ख कोण असेल? प्रत्येक माणसाने या दोन मार्गांमधील अंतर लक्षात ठेवले पाहिजे तसेच कर्मफलांचा त्याग करून अनासक्त राहून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे आणि अशा प्रकारे त्या परमोच्च अवस्थेकडे पोहोचण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## अध्याय नववा

५-१-'३१

सोमप्रभात

मागील अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात योग्याच्या उदात्त अवस्थेचे वर्णन केल्यानंतर स्वाभाविकपणे भगवान कृष्ण भक्तीचे महात्म्य सांगण्याकडे वळतात. गीतेत वर्णन केल्याप्रमाणे योगी हा जसा शुष्क ज्ञानार्थी नसतो तसाच कुणीकडेही वाहून जाणारा भक्त नसतो. गीतेतील योगी ज्ञान आणि भक्तिपूर्ण अनासक्त कर्म करणारा असतो. त्यामुळे भगवान सांगतात, 'आता तू द्वेषभावनेपासून मुक्त झालेला असल्यामुळे मी तुला अशा ज्ञानाचे रहस्य सांगेन ज्यामुळे तुझे कल्याण होईल. हे ज्ञान पवित्र आहे, सर्वश्रेष्ठ आहे आणि त्यानुसार आचरण करणे सोपे आहे. ज्यांची त्यावर श्रद्धा नसते त्यांना माझे दर्शन होऊ शकत नाही. लोकांना माझ्या निराकार स्वरूपाचे ज्ञान साध्या इंद्रियांनी होऊ शकत नाही कारण माझे स्वरूप विश्वव्यापी आहे. ते विश्वाचा आधार आहे, विश्वावर ते आधारित नाही. (इथे शंकराचार्यांचा श्लोक आठवण्यासारखा आहे - 'सत्यपि भेदापगमे पार्थ, तबाहं न मामफिनस त्वम्

सामुद्रो हि तरङ्गाः, क्वचन समुद्रो न तरङ्गाः')

आणि एका अर्थाने असेही म्हणता येईल की हे सर्व प्रणिमात्र माझ्यामध्ये

नाहीत आणि मीही त्यांच्यामध्ये नाही. सर्व प्राणिमात्रांचे उगमस्थान आणि धारण-पोषण करणारा जरी मी असलो तरी मी त्यांच्यात नाही आणि ते माझ्यात नाहीत कारण अज्ञानामुळे ते मला जाणत नाहीत आणि त्यांच्यात माझ्याबद्दलचा भक्तिभाव नाही. हा माझा चमत्कार आहे हे तू लक्षात ठेव.

'परंतु या सर्व प्राणिमात्रांमध्ये मी नाही असे दिसत असले तरी आकाशातून निर्माण झालेला वारा चोहोकडे आकाशात विहरत असतो. त्या वा-यासारखाच मी आहे. कालचक्राच्या शेवटी या सर्व प्राण्यांचा स्वभावतःच विलय होतो आणि निर्मितीच्या सुरुवातीला ते पुन्हा जन्म घेतात. हे सर्व मी करतो परंतु मला या गोष्टींचे कर्मफल बाधत नाही कारण मी त्याबद्दल उदासीन असतो. या सर्व घटना माझ्या प्रकृतीचा भाग म्हणूनच घडत असतात. परंतु माझ्या या स्वरूपाचे ज्ञान लोकांना नसल्यामुळे ते माझे अस्तित्वच पूर्णपणे नाकारतात, ते नास्तिक असतात. असे लोक व्यर्थ मनोराज्यात गुंग असतात. त्यांचे कर्मही न-कर्म असते. ते व्यर्थ कर्म करतात. ते पूर्णपणे अज्ञानी असतात. त्यामुळे त्यांना आसुरी प्रवृत्तीचे म्हणतात. परंतु ज्यांना माझ्या दैवी स्वरूपाचे ज्ञान असते ते अविनाशी निर्माता म्हणून माझी भक्ती करतात. त्यांचा निर्धार ठाम असतो. सद्‌गुणांच्या प्राप्तीकरिता ते सतत धडपडत असतात, माझे स्तवन करत असतात आणि माझे ध्यान करत असतात. माझ्या एकाच रूपावर काही लोकांचा विश्वास असतो तर माझी अनेक रूपे आहेत असा काहींचा विश्वास असतो. मला विविध प्रकारची विशेषणे लावण्यात येतात. त्यामुळे अनेक रूपांमध्ये मी ज्यांना दिसतो ते मला त्या त्या रूपाप्रमाणे विशेषणे लावतात.

'यज्ञाचा हेतू मी असतो तसेच मी यज्ञही असतो. पितरांचा आधार मी, यज्ञातील वनस्पती मी, मंत्र मी, हवनात अर्पण करायचे द्रव्यही मीच. मीच जगत्पिता आहे, माता आहे, पितामह आहे, या जगाला धारण करणारा मीच आहे, ज्ञानाचा विषयही मीच आहे, ओम् हे अक्षर मी आहे, ऋग्वेद मी आहे,

यजुर्वेद मी आहे, यात्रेकरूंचा मार्ग मी आहे, या जगाचे भरणपोषण करणारा मी आहे, सर्वांचा स्वामी मी आहे आणि मी साक्षी आहे. मी निवारा आहे, परतफेडीची अपेक्षा न करता हित करणारा मी आहे, मी उगम आहे, मी प्रलय आहे, मी उष्णता आहे, मी थंडी आहे, मी सत् आणि असत्ही आहे.

'लोक वेदांमध्ये सांगितलेली कर्मे फलप्राप्तीकरिता करतात. अशा प्रकारे त्यांना स्वर्गाचे राज्य मिळाले तरी त्यांचा जन्ममरणाचा फेरा चुकत नाही. परंतु जे अविचल मनाने माझे ध्यान करतात आणि केवळ माझी भक्ती करतात त्यांचे सर्व ओझे मी वाहतो, त्यांच्या सर्व गरजांची परिपूर्ती मी करतो व त्यांना सुखरूपही मीच ठेवतो.

'इतर काही लोक इतर देवतांची श्रद्धापूर्वक भक्ती करतात. परंतु त्यांची ती भक्ती अज्ञानातून जन्माला आलेली असते. वास्तवात ते माझीच भक्ती करत असतात कारण सर्व प्रकारच्या यज्ञांचा भोक्ता आणि स्वामी मीच आहे. परंतु त्यांना माझे हे व्यापक स्वरूप माहीत नसल्यामुळे ते परमावस्थेला पोहोचू शकत नाहीत. देवतांची पूजा करणारे देवांच्या जगात जातात, पूर्वजपूजा करणारे पूर्वजांच्या जगात जातात व भुताखेतांची पूजा करणारे भुतांच्या जगात जातात, परंतु योग्य मार्गाने माझी भक्ती करणा-यांना मी भेटतो. मुमुक्षू जे काही मला अर्पण करतात त्याचा मी स्वीकार करतो, मग ते पान असो की फूल असो. त्यामुळे तू जे काही करतोस ते मला अर्पण करण्याच्या दृष्टीने कर. असे केल्यामुळे त्याचे जे काही बरेवाईट परिणाम होतील त्याची जबाबदारी तुझ्यावर राहणार नाही. असे करताना तू तुझ्या सर्व कर्मफलांचा त्याग केलेला असल्यामुळे तू जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटशील. माझ्याकरिता सर्व प्राणिमात्र सारखे आहेत. एक प्रिय आणि दुसरा अप्रिय असे नाही. जे श्रद्धापूर्वक माझी भक्ती करतात ते माझ्यात असतात आणि मी त्यांच्यात. हा भेदभाव नाही तर त्यांच्या भक्तीचा तो स्वाभाविक परिणाम आहे. भक्तीचे खरोखरच अद्‌भुत परिणाम होत असतात. जो माझी

अंतःकरणापासून भक्ती करतो तो पापी असला तरी संत होऊ शकतो. ज्याप्रमाणे सूर्यासमोर काळोख नाहीसा होतो त्याचप्रमाणे माझ्याजवळ येता क्षणीच माणूस आपल्या वाईट मार्गांपासून दूर होतो. त्यामुळे हे अर्जुना, माझ्या भक्ताचा कधीही विनाश होऊ शकत नाही हे लक्षात ठेव. माझ्या भक्तीमुळे तो धर्मात्मा होतो आणि त्याला शांतता प्राप्त होते. तथाकथित खालच्या वर्गात जन्माला आलेले लोक, अशिक्षित, स्त्रिया, वैश्य आणि शूद्र वगैरे जे मला शरण येतात तेही माझ्यात विलीन होतात. अशाच प्रकारे पवित्र जीवन व्यतीत करणारे ब्राह्मण आणि क्षत्रियही माझ्यामध्ये विलीन होतात. प्रत्येक भक्ताला त्याच्या भक्तीचे फळ मिळते. या क्षणभंगुर जगात तुझाही जन्म झालेला असल्यामुळे माझी भक्ती करून तू मुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजेस. तुझे मन माझ्यावर केंद्रित कर, माझ्यावर श्रद्धा ठेव, तुला जे काही अर्पण करायचे असेल ते तू मला अर्पण कर आणि मला समर्पित हो आणि माझ्या सूरात सूर मिळवून स्वतःला शून्य करून टाक. असे झाले की तू निश्चितपणे माझ्याकडे येशील.'

टीप -

मंगलप्रभात

या अध्यायातून आपल्याला कळते की भक्ती म्हणजे ईश्वराची आसक्ती. अनासक्तीची भावना मनात रुजवण्याचा हा राजमार्ग आहे. त्यामुळे सुरुवातीलाच आपल्याला सांगण्यात आले आहे की भक्ती हा राजयोग आहे व त्याचा अभ्यास करणे सोपे आहे. या योगाने जर आपल्या अंतःकरणाची पकड घेतली तर याचा अभ्यास करणे सोपे होते, परंतु असे झाले नाही तर मात्र हीच गोष्ट कठीण होते. त्यामुळे असे करण्याकरिता आपल्याला आपल्या जीवनाचेच मोल द्यावे लागते हे इथे स्पष्ट करून सांगण्यात आले आहे. जो माणूस यात रममाण होतो त्याला यात परिपूर्ण शांतता मिळते परंतु दुरून पाहणा-या प्रेक्षकाला मात्र या गोष्टीची भीती वाटते. उकळत्या तेलात

उडी घेतल्यानंतर सुधन्वा हसत होता परंतु त्याला पाहणारे मात्र भयानक घाबरलेले होते. अस्पृश्य नंदची जेव्हा अग्नीत टाकून सत्त्वपरीक्षा घेण्यात येत होती तेव्हा तो आनंदाने नाचत होता. या गोष्टी ख-या आहेत की नाही याबद्दल आपण चिंता करण्याचे कारण नाही. माणूस जेव्हा एका वा दुस-या गोष्टीत पूर्णपणे मग्न होतो तेव्हा त्याच्या मनातील सगळे क्षोभ दूर होतात व त्याला एका आगळ्यावेगळ्या शांततेचा अनुभव येतो, तो स्वतःला विसरून जातो. परंतु ईश्वर सोडून इतर कोणत्याही गोष्टीकडे अशा माणसाचे लक्ष कोण वेधू शकेल? 'ऊस सोडून कडूनिंबाकडे वळू नका, दुपारच्या वेळी सूर्य सोडून काजव्याच्या मागे लागू नका.' अशा प्रकारे नवव्या प्रकरणात दाखवण्यात आले आहे की फलाशाविरहित कर्म ईश्वराच्या भक्तीशिवाय अशक्य आहे. या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात या अध्यायाचा सार पुढील शब्दात सांगितला आहे - 'कशाचीही अपेक्षा न करता तू तुझे सर्व काही मला दे आणि माझ्यात सामावून जा.'

## अध्याय दहावा

१२-१-'३१

सोमप्रभात

श्री भगवान म्हणाले, 'हे अर्जुना, इथे परत एकदा मी तुला भक्तांच्या कल्याणार्थ काही सांगेन ते ऐक. देवांना अथवा महर्षींनाही माझ्या उत्पत्तीबद्दलची माहिती नाही. याचे कारण अगदी साधे आहे - मी अनादी व अजन्मा आहे आणि देवीदेवता आणि ऋषीमुनींसह या संपूर्ण विश्वाचा मी निर्माता आहे. जे ज्ञानी मला अनादी व अजन्मा म्हणून ओळखतात त्यांच्यामध्ये पापवृत्ती राहूच शकत नाही. पापवृत्तीचे मूळ स्वतःविषयीचे अज्ञान आहे.

'ज्याप्रमाणे सर्व जीव माझ्यापासून उत्पन्न झालेले असतात त्याचप्रमाणे त्यांची विविध स्वभाववैशिष्ट्येही मी त्यांना दिलेली असतात. उदाहरणार्थ

क्षमा, सत्य, सुख आणि दुःख, जन्म आणि मृत्यू, भीती आणि निर्भयता हे सर्व माझेच आविष्कार आहेत हे माहीत असणा-यांचा अहंकार गळून पडतो व ते सहजपणे समतोल वृत्ती धारण करू शकतात. त्यांचे अंतःकरण माझ्यावर केंद्रित झालेले असते. ते आपले सर्वस्व मला अर्पण करतात. त्यांच्या संभाषणाचा विषय मी एकटाच असतो. ते सतत माझे स्तवन करत सुखात आणि समाधानात राहतात. त्यांच्या जाणिवेचा विषय सतत मीच असतो. अशा या माझ्या प्रिय भक्तांना मी समजूतदारपणाची शक्ती देतो व त्या शक्तीच्या सहाय्याने ते मजपर्यंत पोहोचतात.'

त्यानंतर भगवान श्रीकृष्णाची स्तुती करत अर्जुन म्हणाला, 'तूच सर्वोच्च ब्रह्म आहेस, परमधाम आहेस आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वरही आहेस. तूच सांगितले आहेस की ऋषिमुनी तुझी भक्ती सर्वश्रेष्ठ देवता म्हणून करतात. तू अजन्मा आहेस, तू सर्वव्यापी आहेस. हे देवा, तुझे खरे स्वरूप कोणालाही माहीत नाही; ते केवळ तुला स्वतःलाच माहीत आहे. त्यामुळे आता तू मला तुझ्या त्या भव्य स्वरूपासंबंधी सविस्तर सांगून ध्यानाद्वारे तुला कसे ओळखायचे तेही समजावून सांग.'

श्री भगवान म्हणाले, 'माझ्या दैवी आविष्काराला मर्यादा नाही, परंतु त्यातील काही प्रमुख वैशिष्ट्यांबद्दल मी आता तुला सांगेन. सर्व जिवांमध्ये राहणारा मी आत्मा आहे आणि त्या जिवांची सुरुवात, मध्य आणि शेवटही मीच आहे, आदित्यांमधील मी विष्णू आहे. उज्ज्वल वस्तूंमधील मी सूर्य आहे. मारुतांमध्ये (वारा) मी मरिची आहे. नक्षत्रांमधील मी चंद्र आहे. वेदांमधील मी सामवेद आहे. देवतांमधील मी इंद्र आहे. ज्ञानेंद्रियांमध्ये मी मन आहे, प्रणिमात्रांचे मी चैतन्य आहे. रुद्रांमध्ये मी शंकर आहे. यक्ष आणि राक्षसांमध्ये मी कुबेर आहे. दैत्यांमध्ये मी प्रह्लाद आहे. जनावरांमध्ये मी सिंह आहे. पक्षांमध्ये मी गरुड आहे. एवढेच नाही तर छळ करणा-यांमध्ये धूर्तही मीच आहे. या जगात जे काही बरेवाईट घडते ते सर्व माझ्या परवानगीमुळेच

घडत असते. या गोष्टीची जाणीव सोडून लोकांनी आपला अहंकार टाकून दिला पाहिजे. मीच ब-यावाईटाचे फळ देणारा असल्यामुळे लोकांनी वाईटापासून दूर राहिले पाहिजे. हे अर्जुना, तू लक्षात घे की माझ्या लहानशा अंशावर हे जग टिकलेले आहे.'

## अध्याय अकरावा

१२-१-'३१

सोमप्रभात

भगवान कृष्णाला कृपा करण्याची विनंती करत अर्जुन म्हणाला, 'हे देवाधिदेवा, आत्म्याबद्दलचे सत्य तू मला समजावून सांगितल्यामुळे माझे अज्ञान दूर झाले आहे. तू सर्वांचा निर्माता आणि प्रलय (विनाश) करणारा असलास तरी तू मात्र अविनाशी आहेस. त्यामुळे शक्य असेल तर तू मला तुझ्या दैवी स्वरूपाचे ज्ञान करून दे.'

श्री भगवान म्हणाले, 'हजारो प्रकारची माझी दैवी रूपे आहेत व त्याचे विविध रंग आहेत. आदित्य, अष्टवसू, अकरा रुद्र आणि इतरही सर्व सजीव वा निर्जीव सृष्टीचा त्यात समावेश आहे. परंतु तुझ्या या चर्मचक्षूंनी तू माझे ते दिव्य रूप पाहू शकत नाहीस. त्यामुळे ते रूप पाहता यावे म्हणून मी तुला आता दिव्य दृष्टी देतो.'

संजय धृतराष्ट्राला म्हणाला, 'हे राजा! अशा प्रकारे अर्जुनाशी बोलल्यानंतर भगवान कृष्णाने त्याला आपले भव्यदिव्य रूप दाखवले. त्याचे वर्णन शब्दांत करणे अशक्य आहे. आपण आकाशात दररोज एकच सूर्य पाहतो, परंतु कल्पना कर की आकाशात हजारो सूर्य तळपू लागले तर आकाश जेवढे प्रकाशाने झळझळेल त्यापेक्षाही जास्त दृष्टी दिपवणारे ते रूप होते. त्या रूपाच्या अंगावरील दागिने आणि शस्त्रास्त्रे हेही दिव्य होते. ते पाहून अर्जुन असा काही शहारला की त्याच्या अंगावरील केस उभे झाले

आणि थरथरत श्रीकृष्णाची स्तुती करत तो म्हणाला -

'हे देवा, मला तुझ्या देहामध्ये सगळ्या गोष्टी आणि सगळे लोक दिसत आहेत. तिथे ब्रह्म आणि शिव आहे; सर्व ऋषी तिथे आहेत. त्याचप्रमाणे पवित्र सर्पही तिथे आहेत. त्या तुझ्या स्वरूपात मला तुझे अगणित हात आणि चेहरे दिसत आहेत. किंचितही डाग नसलेल्या प्रकाशाने तू चमचमताना मला दिसतो आहेस. या विश्वाचा तूच मूळ पाया आहेस, तूच सनातन काळ आहेस आणि सनातन नियमांचा रक्षकही तूच आहेस. जिथे कुठे मी पाहतो तिथे मला तुझ्या शरीराचे भाग दिसतात. सूर्य आणि चंद्र हे तुझे डोळे आहेत, स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामध्ये तूच भरलेला आहेस. तुझ्या दिव्य तेजाने हे विश्व पेटलेले आहे. तुझ्याकडे हे विश्व आश्चर्यचकित होऊन पाहते आहे. देव, ऋषी आणि सिद्ध पुरुष हे सर्व तुझ्यासमोर हात जोडून उभे आहेत आणि तुझे स्तवन करत आहेत. तुझे हे भव्य रूप आणि दिव्य तेज पाहून माझा थरकाप होतो आहे. माझा धीर हरवला असून मी मनःशांती गमावली आहे. हे देवा, माझ्यावर कृपा कर. या सर्व लोकांना मी तुझ्या मुखामध्ये घाबरून प्रवेश करताना पाहतो आहे आणि ज्याप्रमाणे पतंगाला अग्नी जाळून टाकतो त्याप्रमाणे तुझ्या सुळयांखाली त्यांचा भुगा होताना मी पाहतो आहे. अशा भयानक स्वरूपातील तू कोण आहेस? मला तुझ्या स्वरूपाचे आकलन होत नाही.'

श्री भगवान म्हणाले, 'या जगाचा विनाश करणारा मी काळ आहे. तू युद्ध कर अथवा करू नकोस, परंतु दोन्ही बाजूकडील हे सर्व योद्धे मरणारच आहेत. ईश्वरी इच्छेचे पालन करणारा तू केवळ निमित्त आहेस.'

अर्जुन म्हणाला, 'सर्व जगाचे निवासस्थान असलेल्या हे देवा तू अविनाशी आहेस. तुझ्यामध्ये सर्व जीव आणि निर्जीव राहतात, शिवाय दोघांच्या पलीकडे असलेलेसुद्धा तुझ्यातच राहतात. तू या विश्वाचे आश्रयस्थान आहेस. तू एकच अशी गोष्ट आहेस जिचे ज्ञान होणे आवश्यक आहे. तू वायू, यम,

अग्नी आणि प्रजापती आहेस. मी तुझा सहस्त्र वेळा जयजयकार करतो. आता तू तुझे मूळ रूप मला दाखव.

त्यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'माझे तुझ्यावर प्रेम असल्यामुळे मी तुला माझे विश्वरूप दर्शन घडवले. तू आज असे काही पाहिलेस की जे पाहण्याची दृष्टी वेदांच्या वा इतर कशाच्याही अभ्यासातून प्राप्त होऊ शकत नाही, तसेच ही दृष्टी धार्मिक विधी केल्यामुळे, दानधर्मामुळे वा अधिकारी पुरुषांमुळेही प्राप्त होऊ शकत नाही. माझे हे रूप पाहिल्यामुळे तू घाबरू नकोस. तू तुझी भीती दूर कर, शांत हो आणि हे माझे परिचित रूप पाहा. माझे जे रूप तू पाहिले ते देवांकरिताही दुर्लभ आहे. केवळ शुद्ध भक्तिद्वारेच ते दिसू शकते. जो माझ्याकरिता काम करतो, जो माझ्यात स्वतःचे अंतिम कल्याण पाहतो तोच माझा भक्त होत असतो. जो सर्व प्रकारच्या आसक्तीपासून स्वतःला मुक्त करतो व सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करतो तोच माझ्यात विलीन होतो.'

टीप -

या आणि मागील प्रकरणाचा मी मुद्दाम संक्षेप केला आहे. हे प्रकरण काव्याने पूर्णपणे भरलेले आहे. त्यामुळे मुळातून वा अनुवादाद्वारे यांचे वारंवार वाचन केले पाहिले. असे केल्यामुळे आपण भक्तिरसात डुंबून जाऊ. आपण अशा प्रकारे भक्तिरसात डुंबतो की नाही याची कसोटी आपण शेवटच्या श्लोकाधारे पाहू शकतो. संपूर्ण शरणागतीशिवाय आणि सर्व प्राणिमात्रांच्या प्रेमाशिवाय भक्ती अशक्य असते. ज्या विश्वविनाशक काळस्वरूपी ईश्वराच्या मुखात सर्व जग नष्ट होण्याकरिता प्रवेश करण्यास उत्सुक असते त्या ईश्वराचे आपण चिंतन केले तर आत्मसमर्पण आणि सर्व प्राणिमात्रांशी तादात्म्याची भावना या गोष्टी आपण सहज साध्य करू शकू. आपली इच्छा असो वा नसो आणि लवकर म्हणा वा उशिरा ही भवितव्यता आपल्या शिरावर सदैव लटकलेली असते. अशा प्रकारे लहान आणि मोठा,

श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, मानव आणि निम्न श्रेणीतील प्राणी हे सर्व नाहीसे होणार आहेत. विश्वविनाशक ईश्वराच्या मुखातील एखाद्या घासाप्रमाणे आपण आहोत हे पाहिल्यानंतर आपण नम्र झालो पाहिजे व स्वतःला शून्याप्रत नेऊन सर्वांशी मैत्री केली पाहिजे. आपण असे केले तर ईश्वराच्या या भयानक स्वरूपाची आपल्याला भीती वाटणारच नाही, उलट त्यामुळे आपल्याला मनःशांती मिळेल.

## अध्याय बारावा

दिनांक ४-११-'३०

मंगलप्रभात

आज १२व्या अध्यायाचा सार सांगण्याचा माझा विचार आहे. हा भक्तियोग आहे. विवाह करणा-या दांपत्याला पाच यज्ञ करण्याकरिता सांगण्यात येतात. त्यात या अध्यायाचे मनन करून पाठांतर करण्याचाही समावेश आहे. भक्तीशिवाय ज्ञान आणि कर्म शुष्क आहेत. भक्ती नसेल तर उलट ते बंधनासारखे होण्याची शक्यता असते. त्यामुळे भक्तिपूर्ण अंतःकरणाने गीतेच्या या चिंतनाला सुरुवात करू या.

अर्जुनाने भगवान कृष्णाला विचारले, 'साकार भक्ती करणारा आणि निराकार भक्ती करणारा यापैकी श्रेष्ठ कोण?

या प्रश्नाचे उत्तर देताना भगवान कृष्ण म्हणाले, 'जो पूर्ण श्रद्धेने माझ्या साकार स्वरूपाचे श्रद्धापूर्वक मनन करतो व त्यातच लीन होतो तोच श्रद्धाळू माझा खरा भक्त असतो. परंतु जो माझ्या निराकार तत्त्वाची भक्ती करण्याकरिता आपली इंद्रिये नियंत्रणात ठेवतो आणि सर्व भूतमात्रांकडे समबुद्धीने पाहतो, श्रेष्ठ-कनिष्ठ भाव मनात न बाळगता सर्वांची समभावनेने सेवा करतो तोसुद्धा माझ्याकडेच येतो. भक्तांच्या या दोन वर्गांमध्ये कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ हे सांगता येत नाही. परंतु निराकाराची भक्ती देहधारी

माणसाकरिता जवळपास अशक्य आहे. निराकार निर्गुण आहे त्यामुळे तो माणसाच्या कल्पनेपलीकडे असतो. त्यामुळे सामान्यपणे आपण सर्व देहधारी माणसे, जाणीव असो वा नसो, साकार भक्तीच पसंत करत असतो. 'त्यामुळे हे अर्जुना, तू माझ्या साकार स्वरूपावरच समर्पित भावाने रममाण हो आणि तुझे सर्व काही मला समर्पित कर. परंतु हे शक्य नसेल तर चित्ताच्या विकारांना अडवण्याकरिता प्रयत्न कर. याकरिता तू प्राणायामाच्या मदतीने यम आणि नियम यांचे पालन कर व योगाभ्यासाच्या मदतीने मनावर नियंत्रण मिळव. आणि हीही गोष्ट करणे तुला शक्य नसेल तर तू जे काही करतोस ते सर्व माझ्याकरिताच करतो आहेस असा विचार करून सर्व काम कर. त्यामुळे तुझा मोह, तुझी ममता या गोष्टी कमी होत जातील आणि तू शुद्ध होत जाऊन तुझ्यामध्ये भक्तिरस निर्माण होईल. तुला हेही करणे शक्य नसेल तर तू तुझ्या कर्मफळांचा त्याग कर. म्हणजे कर्मफलांची इच्छा करू नकोस. केवळ तुझ्या वाट्याला आलेली कर्तव्ये तेवढी नीटपणे पार पाडत जा. माणूस कर्मफळाचा स्वामी असूच शकत नाही कारण कर्मफलांकरिता अनेक गोष्टी कारणीभूत असतात व त्या आपल्या हाती नसतात. त्यामुळे तू केवळ निमित्तमात्र हो. याप्रमाणे मी तुला हे जे चार मार्ग समजावून सांगितले आहेत त्यात कोणताही श्रेष्ठ आणि कोणताही कनिष्ठ नाही. त्यामुळे यापैकी जो मार्ग तुला आवडेल त्या मार्गाची निवड तू करू शकतोस. तुला वाटू शकेल की वर जे यमनियम, प्राणायाम, आसन इत्यादी मार्ग सांगितले आहेत त्यांच्यापेक्षा श्रवण-मननाचा ज्ञानमार्ग (तत्त्वविचार आणि त्याचे चिंतन) सोपा आहे. त्यामुळे उपासनारूप ध्यान सहजपणे करता येईल व ध्यान करत असताना कर्मफलत्यागही सहज करता येईल. परंतु एकच पद्धती सर्वांकरिता सोयीस्कर नसते. काही मुमुक्षूंना तर या चारही मार्गांचे अनुसरण करावे लागते. हे सर्व मार्ग परस्परांमध्ये तर मिसळलेले आहेतच. त्यामुळे ज्या मार्गाने तुला भक्ती करता येईल त्या मार्गाने तू जाऊ शकतोस. भक्त कुणाला

म्हणतात ते आता मी तुला सांगतो. भक्त कोणाचाही द्वेष करत नाही, कोणाबद्दलही त्याच्या मनात वैरभाव नसतो, प्राणीमात्रांबद्दल त्याच्या मनात मैत्रीची भावना असते. करुणा असते. असे केल्यामुळे तो ममतेपासून मुक्त होतो, तो स्वतःला शून्यवत समजू लागतो, सुखदुःख त्याला सारखे वाटू लागतात, कोणी चूक केली तर तो त्याला क्षमा करतो, आपली चूक झाली तर इतरांनी आपल्याला क्षमा करावी असे वाटत असल्यामुळे इतरांनी केलेल्या चुकांबद्दलही तो क्षमाशील असतो. नशिबी आलेल्या गोष्टींबद्दल तो समाधानी असतो आणि आपल्या निर्धारापासून तो कधीही ढळत नाही. त्याने आपली बुद्धी आणि मन मला समर्पित केलेले असतात. तो आपल्या सहचर प्राणीमात्रांना कधीही त्रास देत नाही. यामुळे लोकांबद्दल त्याच्या मनामध्ये घृणाभाव नसतो. तो कुणालाही घाबरत नाही. त्याला कशाचीही इच्छा नसते. माझा भक्त हर्ष, खेद, क्रोध, भीती अशा प्रकारच्या विकारांपासून मुक्त असतो. तो स्वतःकरिता कशाचीही अपेक्षा करत नसतो. तो शुद्ध असतो. मोठमोठ्या कामांची तो सुरुवात करत नाही. त्याचा निर्धार जरी पक्का असला तरी आपल्या कामाच्या चांगल्या वाईट परिणामांची त्याला फिकीर नसते. त्याचा कोणीही शत्रू नसतो आणि कोणीही मित्र नसतो. सन्मान आणि अपमान या दोन्ही गोष्टी त्याच्याकरिता सारख्या असतात. जे काही घडेल त्याचा तो शांतपणे स्वीकार करतो व सर्व प्रकारच्या अवस्थांमध्ये तो समाधानी असतो. जणू काय तो एकटाच असावा याप्रमाणे चोहोकडे विचरत असतो व अविचलभावाने सर्वत्र वावरत असतो. अशा प्रकारे वर्तन करणारा भक्त मला प्रिय असतो.'

टीप -

प्रश्न - भक्त सुरुवात करत नाही याचे एखादे उदाहरण सांगू शकाल काय?

उत्तर - भक्त कामाची सुरुवात करत नाही म्हणजे कोणत्याही कामाचा तो

घाट घालत बसत नाही. उदाहरणार्थ आज तो कापड विकणारा व्यापारी असेल तर उद्या इंधन विक्रीचा व्यवसाय करण्याचा विचार तो करणार नाही. अथवा आज त्याच्याजवळ एक दुकान असेल तर उद्या अजून पाच दुकाने उघडण्याची योजना तो आखणार नाही. ही नवीन कामाची सुरुवात असेल आणि भक्ताचा तर अशा कोणत्याही गोष्टीशी संबंध नसतो. हाच नियम सेवाकार्यालाही लागू होतो. उदाहरणार्थ आज तो खादी विभागातील एक कार्यकर्ता असेल तर दुस-या दिवशी गोपालनाचे तिस-या दिवशी शेती करण्याचे, चौथ्या दिवशी औषधोपचाराचे काम, अशी कामे तो हाती घेणार नाही. जे कोणते काम त्याच्या वाट्याला आले असेल ते तो उत्तमरित्या पार पाडण्याचा प्रयत्न करील. ज्याचा अहंकार गेला त्याच्याकरिता करण्यासारखे काय राहणार? 'देवाने मला सुताच्या एका धाग्याने बांधले आहे, मी त्याचा आहे, आता तो मला कुठेही नेऊ शकतो. प्रेमाच्या कट्यारीने त्याने मला विद्ध केले आहे.' भक्ताने काय करावे आणि काय करू नये हे सर्व ईश्वरच ठरवत असतो. त्याने करावयाची कामे त्याच्या वाट्याला स्वाभाविकपणे येत असतात. त्यामुळे त्यात तो समाधानी असतो. सर्वसमारंभत्यागाचाही हाच अर्थ आहे. भक्त कर्म करणे थांबवत नसतो. उलटपक्षी तो जर कर्म करणार नसेल तर त्याचे अस्तित्वच संपून जाईल. तो आपल्या कामाचा निरर्थक विचार करणे बंद करतो. ही ती गोष्ट आहे जिचा त्याला परित्याग करायचा असतो. 'इदमद्य मया लब्धं प्राप्स्ये मनोरथम्' - गीता १६.१३. ही गोष्ट कामाचा आरंभ करण्याच्या उलट आहे.

## अध्याय तेरावा

२६-१-'३२

सोमप्रभात

श्री भगवान म्हणाले, 'माणसाच्या या शरीराचे दुसरे नाव 'क्षेत्र' म्हणजे 'शेत' हेही आहे आणि ते ज्याला कळते तो 'क्षेत्रज्ञ' म्हणजे शेताचे ज्ञान असलेला. हे अर्जुना! सर्वांच्या शरीरात मी असल्यामुळे तू मला क्षेत्रज्ञ समज. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यातील भेद लक्षात ठेवणे म्हणजे खरे ज्ञान. पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, अभिव्यक्त न झालेली मूळ प्रकृती, पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये अशी दहा इंद्रिये, मन, इंद्रियांचे पाच विषय, रागद्वेष, सुखदुःख, संघात (स्थूल देहाचा पिंड अथवा देहामध्ये या सर्व गोष्टींचे मिश्रण करण्याची देहाची शक्ती) चेतना, धृती या सर्वांचे मिळून हे विकारी क्षेत्र बनते. या सर्वांचा त्याग करावयाचा असल्यामुळे यांचे ज्ञान आवश्यक असते. ज्ञानाच्या पायावरच त्यागाचा इमला उभारता येतो. या ठिकाणी ज्ञानाचा अर्थ नम्रता, अहंमन्यता नसणे, क्षमाभाव, प्रामाणिकपणा, गुरूची सेवा, आत्मनिग्रह, इंद्रियविषयांबद्दल अनासक्ती, आत्मस्तुतीचा अभाव; जन्म, मृत्यू, जरा, रोग आणि वेदना, पत्नी आणि मुले, घरदार, मित्र आणि नातेवाईक या सर्वांबद्दल अनासक्ती; ब-या आणि वाईट नशिबाबद्दल समभाव, ईश्वराची अंतःकरणापासून भक्ती, एकांताची आवड, इतरांच्या सहवासात असतानाही मौजमजा करण्याची इच्छा न होणे, आत्मज्ञानाची तृष्णा आणि शिवाय आनंदी दृष्टी हा आहे. या विरोधी जे जे असेल ते अज्ञान आहे. आता मुक्ती मिळवण्याकरिता काय कळणे आवश्यक आहे ते मी तुला थोडक्यात सांगेन. ते आहे अनादी असे सर्वोच्च ब्रह्म. ब्रह्म अनादी आहे कारण त्याचा जन्म झालेला नाही आणि जेव्हा काहीही नव्हते तेव्हाही तो अस्तित्वात होता. तो सत्ही (अस्तित्व) नाही आणि असत्ही (अनास्तित्व) नाही. तो या पलीकडील आहे. परंतु वेगळ्या

दृष्टिकोनातून त्याला आपण सतसुद्धा म्हणू शकतो कारण तो चिरंतन आहे. त्याने हे सर्व विश्व व्यापलेले आहे. माणसाला त्याच्याबद्दलचे ज्ञान नसते. असे म्हणता येईल की त्याला हजारो हातपाय आहेत आणि त्याला हजारो हातपाय असल्याचे दिसत असले तरी त्याला ज्ञानेंद्रिये नाहीत कारण त्याला या इंद्रियांचे कामच नसते. त्यामुळे तो अलिप्त असतो. इंद्रिये आज आहेत उद्या नाहीत, ब्रह्म मात्र चिरंतन आहे. तो सर्वांना व्यापणारा आणि सर्वांना धारण करणारा असल्यामुळे तो गुणांचा भोक्ता आहे असेही म्हणता येईल. त्याचबरोबर तो निर्गुणही आहे. गुण असतात तिथे बदल म्हणजे विकार असतो. परंतु ब्रह्म मात्र अविकारी आहे. जेवढे गुण तेवढे विकार. ज्यांना त्याचे ज्ञान नाही त्यांना तो आपल्या पलीकडील आहे असे वाटत असल्यामुळे तो सर्व प्राणिमात्रांच्या पलीकडे आहे असे म्हणता येईल आणि त्याने संपूर्ण विश्व व्यापलेले असल्यामुळे सर्व प्राणिमात्रांमध्ये ब्रह्म आहे असेही म्हणता येईल. त्याचप्रमाणे ब्रह्म चल आणि अचल दोन्हीही आहे. ब्रह्म सूक्ष्म आहे आणि त्यामुळे सर्वसामान्यांना तो अगम्य आहे. दूर आहे आणि जवळही आहे. ब्रह्माचे नाव आणि आकार बदलत असले तरी ब्रह्म अविनाशी आहे आणि त्यामुळे तो अविभाज्य आहे असेही म्हणता येईल परंतु ब्रह्म सर्व प्राणिमात्रांमध्ये आहे. त्यामुळे तो विभाजित आहे असेही म्हणता येते. तो निर्माण करतो, धारण-पोषण करतो आणि नष्टही करतो. काळोखाच्या पलीकडील तो प्रकाशांचा प्रकाशही आहे आणि अखेरीस ज्ञानाचे उद्दिष्टही तोच आहे. प्रत्येकाच्या हृदयात वसलेला ब्रह्म ज्ञेय आहे आणि जाणून घेण्यायोग्य तो एकच आहे. त्याच्याशी एकरूप होण्याचे साधन म्हणूनच ज्ञानाचा उपयोग आहे.

'ईश्वर आणि त्याची माया या दोघांनाही आदी नाही. विकारांचा (बदल) जन्म मायेमुळे होतो आणि त्यामुळे विविध कर्म निर्माण होतात. मायेमुळेच आत्म्याला सुखदुःखाचा अनुभव येतो. पाप आणि पुण्य यांचे फळ

आपल्याला भोगावे लागते. ज्याला या गोष्टीचे ज्ञान झालेले असते, जो आपले कर्तव्य अनासक्तभावाने पार पाडतो तो माणूस कर्म करत असला तरी त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. सर्व चेह-यामध्ये केवळ ईश्वराचाच चेहरा त्याच्या अंतःकरणात ठसलेला असतो. ईश्वराच्या इच्छेशिवाय पानही हालत नाही हे त्याला माहीत असते. त्यामुळे तो अहंकारापासून मुक्त असतो. आपण आपल्या शरीरापासून वेगळे आहोत याचे त्याला भान असते आणि देहामध्ये राहणारा आत्मा हा सर्वव्यापी परमेश्वराप्रमाणे जसाच्या तसाच असतो याचे त्याला ज्ञान असते.'

## अध्याय चौदावा

२६-१-३२

मौनवार

श्री भगवान म्हणाले, 'जे ज्ञान मिळवून ऋषीमुनींना परम सिद्धी प्राप्त झाली ते ज्ञान मी आता तुला सांगेन. ज्या लोकांना हे ज्ञान प्राप्त होते आणि त्यानुसार जे लोक आचरण करतात ते जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटतात. हे अर्जुना, सर्व प्राणिमात्रांचा मीच माता आणि पिता आहे हे लक्षात ठेव. निसर्गातून सत्त्व, रज आणि तम हे जे तीन गुण जन्माला आले आहेत ते देहीला बांधून ठेवणारे आहेत. या गुणाचे वर्णन क्रमशः उच्च, मध्यम आणि खालचा असेही करता येईल. यापैकी सत्त्वगुण शुद्ध आणि निष्कलंक असल्यामुळे तो प्रकाश देणारा आहे. त्यामुळे त्यामध्ये सुखाचा स्रोत आहे. राजस गुण हा आसक्ती आणि तृष्णा यांच्यामधून निर्माण होतो व तो माणसाला विविध स्वरूपाची कर्मे करायला लावतो. तम या गुणाचे मूळ अज्ञान आणि संभ्रम यांच्यात आहे. त्यामुळे या गुणांच्या व्यक्तीचे कर्तव्याकडे दुर्लक्ष होते, ती आळशी होते. थोडक्यात सांगायचे तर सत्त्वगुणामुळे माणूस सुखी होतो, रजोगुणामुळे अस्वस्थ होतो आणि तमोगुणामुळे आळशी. काही वेळा

सत्त्वगुणाचे रजोगुण आणि तमोगुण यांच्यापेक्षा प्राबल्य असते तर इतर काही वेळा रजोगुणाचे सत्त्व आणि तमोगुणावर प्राबल्य असते आणि अजून काही वेळा तमोगुणाचे सत्त्व आणि रजोगुणावर प्राबल्य असते. जेव्हा माणसाच्या सर्व कामकाजातून आणि शारीरिक हालचालीतून ज्ञानाचे दर्शन होते तेव्हा तिथे सत्त्वगुणाचे प्राबल्य आहे असे समजावे. जिथे हाव, गडबड, अस्वस्थता आणि स्पर्धा या गोष्टी दिसून येतात तिथे रजोगुणाचे राज्य असते आणि अज्ञान, आळशीपणा, भ्रम या गोष्टी तमोगुणाच्या निदर्शक आहेत. माणसाच्या जीवनात जर सत्त्व वरचढ असला तर तो मृत्यूनंतर महान ऋषीमुनींच्या निष्पाप वातावरणात जन्म घेतो. जर माणसाच्या जीवनात रजोगुणाला महत्त्व आले असेल तर कर्म करण्यात दंग असलेल्या लोकांच्या घरामध्ये त्याचा जन्म होतो आणि जीवनात तमसाचे प्राबल्य असलेली व्यक्ती परत मूर्ख व्यक्तीच्या गर्भाशयात जाते. सात्त्विक प्रवृत्तीचे फळ शुद्धता आहे, रजोगुणाचे फळ दुःख आहे तर तमोगुणाचे फळ अज्ञान आहे. सात्त्विक व्यक्तीला उच्च गती मिळते, रजोगुण असलेल्या व्यक्तीला मध्यम आणि तमोगुण असलेल्या व्यक्तीची अधोगती होते. या गुणांशिवाय इतर कोणीही कर्म करणारा नाही हे जेव्हा माणसाला कळते आणि 'मी कोण' याची त्याला ओळख पटते तेव्हा तो माझ्या प्रकृतीत (त्रिगुणमयी माया) प्रवेश करतो. जेव्हा देही म्हणजे आत्मा सर्वांच्या देहांना जन्म देणा-या या तिन्ही गुणांपलीकडे जातो तेव्हा तो जन्म, मृत्यू, जरा आणि दुःख यांच्यापासून मुक्त होतो आणि मोक्षरूपी अमृत प्राशन करतो.'

गुणातीत व्यक्तीला मिळणारी ही सुंदर गती असेल तर त्याच्या खुणा कोणत्या आणि गुणातीत कसे होता होईल असा प्रश्न अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारला.

त्यावर श्री भगवान म्हणाले, 'या त्रिगुणांच्या पलीकडे माणूस पोहोचला आहे असे जेव्हा म्हणता येईल तेव्हा त्याला सत्त्वगुणाचा प्रकाश दिसणार नाही, रजोगुणाची धावपळ आणि गडबड दिसणार नाही तसेच तमोगुणातील

अज्ञानही त्याला दिसणार नाही. शिवाय हे काहीही दिसत नसल्यामुळे तो अस्वस्थही होणार नाही. तो अशा प्रकारे शांत बसलेला असेल की जणू काय या त्रिगुणांशी त्याला काही घेणेदेणेच नाही आणि या त्रिगुणांच्या अनुपस्थितीमुळे तो अस्वस्थ होणार नाही. त्रिगुणच सर्व कर्मांच्या मागे असतात हे कळत असल्यामुळे तो त्यांच्यापासून अगदी वेगळा असतो व आपल्या मनावर त्यांचा काहीही परिणाम होऊ देत नाही. त्याच्याकरिता सुखदुःख, तसेच मातीचा गोळा, दगड आणि सोने हे सर्व सारखेच असतात. निंदास्तुतीचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. नावलौकिक वा बदनामी यांच्याकडे तो समान दृष्टीने पाहतो. शत्रू आणि मित्रांशी तो समभावाने वागतो. त्याने सर्व कार्यारंभांचा त्याग केलेला असतो. अशा व्यक्तीला गुणातीत समजावे. या खुणा मी तुला उत्तेजित करण्याकरिता सांगितलेल्या नाहीत किंवा तू आळसामुळे कपाळावर हात ठेवून गप्प बसावे याकरिताही सांगितलेल्या नाहीत. मी तुला केवळ सिद्ध पुरुषाच्या खुणा सांगितल्या आहेत. तोपर्यंत पोहोचण्याचा मार्ग हा आहे -

'एकाग्र चित्ताने माझी भक्ती करणे हाच गुणातीत होण्याचा मार्ग आहे. तिस-या अध्यायापासून मी सांगत आलो आहे की माणूस कर्म केल्याशिवाय श्वासोच्छ्वासही करू शकत नाही. कर्मापासून सुटका करून घेण्याची कोणताही माणूस कल्पनाही करू शकत नाही. ज्याला या गुणांच्या पलीकडे जाण्याची इच्छा असेल त्याने आपली सर्व कर्मे मला अर्पण करून त्यापासून मिळणा-या फळांची अपेक्षा करता कामा नये. मीच ब्रह्म, चिरंतन जीवन, सनातन नियम आणि चिरंतन आनंद असल्यामुळे त्याने जर असे केले तर त्याची कर्मे त्याच्या प्रगतीच्या आड येणार नाहीत.

'माणूस जेव्हा स्वतःला शून्य करतो तेव्हा त्याला चोहोकडे केवळ मीच दिसतो. तो गुणातीत होतो.'

## अध्याय पंधरावा

रात्री, ३१-१-'३२

श्री भगवान म्हणाले, 'या जगात दोन पद्धती दिसतात. पहिली - ज्याची मुळे उंच आहेत आणि शाखा खाली आणि ज्याला वेदरुपी पाने फुटलेली आहेत अशा अश्वत्थ (पिंपळ) वृक्षाप्रमाणे जे जगाला पाहतात ते ज्ञानी. दुसरी पद्धत अशी आहे - संसाररुपी या वृक्षाच्या शाखा वरखाली पसरलेल्या आहेत, त्याला त्रिगुणयुक्त विषयरूपी अंकुर फुटलेले आहेत आणि विषयांमुळे ते कर्मबंधनात सापडले आहे. या वृक्षाचे स्वरूप, त्याचा आरंभ, अंत आणि ठिकाण हे काहीच कळू शकत नाही.

'या अश्वत्थ वृक्षाचे खरे स्वरूप, त्याची सुरुवात, त्याचा शेवट, त्याचा आधार या गोष्टी या ठिकाणी समजून सांगता येऊ शकत नाहीत.

'आत्म्याचा उच्च जगात प्रवेश व्हावा व तेथून त्याला परत या नश्वर जगात यावे लागू नये म्हणून खोलवर मुळे रुजलेल्या या अश्वत्थरूपी संसारवृक्षाला असहकाराच्या कु-हाडीने तोडावे लागते. हे उद्दिष्ट लक्षात ठेवून विश्वाची ही प्रक्रिया पुरातन काळापासून ज्या नारायणाने सुरू केली आहे त्याची आपण भक्ती केली पाहिजे. जो सुज्ञ माणूस अहंकार आणि भ्रम यांच्यापासून मुक्त असतो आणि ज्याने आसक्तीच्या विकारावर विजय मिळवलेला असतो, जो परम आत्म्याची भक्ती करतो, ज्याला कशाचीही हाव नसते आणि ज्याच्याकरिता सुख आणि दुःख हे सारखेच असतात तो या सर्व बदलांच्या अवस्थेच्या पलीकडे असलेल्या अशा ठिकाणी पोहोचतो ज्या ठिकाणाला सूर्य, चंद्र वा अग्नी यांनी प्रकाशित करावे लागत नाही. ते ठिकाणच माझे परमधाम आहे.

'या देहातील जीवात्मा हा माझाच सनातन अंश आहे आणि तो या प्रकृतीतील मन आणि पंचज्ञानेंद्रियांना आकर्षित करतो. वारा ज्याप्रमाणे स्वतःबरोबर सुगंध वाहून नेतो त्याचप्रमाणे जेव्हा आत्मा शरीरात प्रवेश करतो

वा शरीर सोडतो तेव्हा तो या इंद्रियांना आपल्यासोबत आणतो वा परत नेतो. तो कान, डोळे, त्वचा, रसना, नाक या ज्ञानेंद्रियांच्या आणि मनाच्या सहाय्याने इंद्रियविषयांचे सेवन करत असतो. शरीराला सोडून जाताना, अथवा शरीरात राहत असताना अथवा इंद्रियविषयांचा उपभोग घेताना तिन्ही गुणांनी युक्त अशा या आत्म्याचे अज्ञानी लोकांना ज्ञान होऊ शकत नाही. केवळ विवेकदृष्टी असलेल्या ऋषींनाच त्याचे ज्ञान होऊ शकते. या आत्म्याला पाहण्याकरिता प्रयत्न करणा-या योगी लोकांना आपल्याच शरीरात राहणा-या या आत्म्याचे तत्त्वरूपाने दर्शन होते. परंतु ज्यांनी समतोलवृत्ती धारण केली नसेल त्यांना प्रयत्न करूनही या आत्म्याचे दर्शन होऊ शकत नाही.

'सर्व जगाला प्रकाशित करणा-या सूर्याचा प्रकाश तसेच चंद्र, अग्नी इत्यादींचा प्रकाश हा माझाच आहे हे तू लक्षात ठेव आणि मीच भूमीत प्रवेश करून संपूर्ण विश्वाला धारण करतो. तसेच सर्व वनस्पतींमध्ये रस निर्माण करणारा चंद्रही मीच आहे. सर्व प्राणीमात्रांच्या शरीरातील जीवनरूपी अग्नी होऊन मी भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य या चार प्रकारचे अन्न पचवतो. सर्वांच्या हृदयात मी राहत असतो. माझ्यापासूनच स्मृती, बुद्धी आणि त्याचबरोबर त्यांचा अभाव यांचा जन्म होत असतो. सर्व वेदांद्वारे ज्ञान करून घेण्यासारखा मीच आहे. त्याचप्रमाणे मी वेदांचा निर्माताही आहे आणि वेद जाणणाराही मीच आहे.

'असे म्हणता येईल की या जगात क्षर म्हणजे नाशवान आणि अक्षर म्हणजे अविनाशी अशा दोन प्रकारच्या व्यक्ती असतात. सर्व प्राणिमात्र हे नाशमान आहेत आणि मी अविनाशी आहे. मीच यांना प्रेरणा देत असतो आणि माझ्यात कोणतेही परिवर्तन होत नसते. परंतु या आकाशाच्या पलीकडे सर्वोच्च आत्मा राहतो, त्याला परमात्मा असे म्हणतात. तो सर्वांना व्यापून असतो आणि स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ या तिन्ही लोकांना तो धारण करतो. तो परमात्मा मीच आहे. अशा प्रकारे मी नाशमानच नाही तर अविनाशी

तत्त्वांच्याही पलीकडे असतो. त्यामुळे या जगात तसेच वेदांमध्ये मला सर्वोच्च सत्य म्हणजे पुरुषोत्तम असे म्हणतात. ज्या सुजाण माणसाला माझ्या या स्वरूपाचे ज्ञान असते त्याला मिळवण्यासारखे सर्व ज्ञान मिळालेले असते आणि तो सर्वस्व अर्पून माझी सेवा करत असतो.

'हे निष्पाप अर्जुना, मी तुला हे अतिशय गुप्त ज्ञान सांगितले आहे. हे समजल्यामुळे माणूस खरोखरच विद्वान होतो आणि तो मुक्तीच्या काठावर पोहोचतो.'

## अध्याय सोळावा

येरवडा मंदिर,
७-२-'३२

श्री भगवान म्हणाले, 'मी तुला आता धर्मवृत्ती (दैवी संपदा) आणि अधर्मवृत्ती (आसुरी संपदा) यांच्यामधील अंतर सांगेन. धर्मवृत्तीबद्दल तर मी तुला आधी बरेच सांगितले आहे. त्यामुळे धर्मवृत्तीचे लक्षण आधी सांगतो. ते पुढीलप्रमाणे आहेत - निर्भयता, अंतःकरणाचे पावित्र्य, ज्ञान, समतोल वृत्ती, इंद्रियनिग्रह, दान, त्याग, धर्मग्रंथांचा अभ्यास, तप, साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, सर्वसंगपरित्याग, शांती, इतरांबद्दल वाईट न बोलणे, सर्व प्राणिमात्रांबद्दल करुणाभाव, हाव नसणे, सौजन्यशीलता, नम्रता, स्वभावात चंचलपणा नसणे, जोम, क्षमाभाव, सहनशीलता, अहंकार आणि आकस यांच्यापासून अंतर्बाह्य मुक्ती.

'अधर्मवृत्तीची चिन्हे (दानवी संपदेची) पुढीलप्रमाणे आहेत - दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरपणा आणि अज्ञान.

'धर्मवृत्ती माणसाला मुक्तीकडे घेऊन जाते तर अधर्मवृत्ती बंधनांकडे. हे अर्जुना, तू धर्मवृत्ती घेऊन जन्माला आला आहेस.

'लोकांनी अधर्मवृत्तीकडे वळू नये म्हणून अधर्मवृत्तीबद्दल मी तुला अजून

थोडे समजावून सांगेन. अशा प्रकारच्या स्वभावाच्या माणसाला काय केले पाहिजे आणि कशा प्रकारच्या कर्मापासून दूर राहिले पाहिजे याची कल्पना नसते. त्याच्यामध्ये पावित्र्य वा खरेपणा नसल्यामुळे उत्तम वर्तणुकीच्या गुणांचे तो पालन करू शकत नाही.

'अधर्मवृत्ती असलेल्या लोकांना प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्यामधील भेद कळत नाही. त्यांना शुद्धाशुद्धतेचे वा सत्य-असत्याचे भान नसते. अशा व्यक्तींच्या वर्तनाबद्दल काय सांगावे? त्यांना जग कोणत्याही आधाराशिवाय चालते असे वाटते. त्यांचे म्हणणे असते की जगाचा कोणी नियंता नाही, हे जग केवळ स्त्री-पुरुषाच्या संयोगाने निर्माण झाले आहे, त्यात ईश्वराची कोणतीही भूमिका नाही. त्यामुळे या जगात कामभावनेशिवाय कशालाही महत्त्व नाही.

'ते भयानक क्रूरकर्म करतात. ते मंदबुद्धीचे असतात. आपल्या दुष्ट विचारांना ते घट्ट पकडून ठेवतात आणि त्यांची सर्व कामे या जगाच्या विनाशाकरिता कारणीभूत होत असतात. त्यांच्या कामवासनेला अंतच नसतो. त्याच्यात दांभिकपणा, गर्व आणि उद्धटपणा नखशिखांत भरलेला असतो.

यामुळे त्यांच्या चिंतेलाही पारावार नसतो. त्यांना नित्य नवा भोग हवा असतो. 'शेकडो व्यर्थ आशांच्या जाळ्यात ते जखडलेले असतात.' (अर्नोल्ड) तसेच आपल्या इच्छा पूर्ण करण्याकरिता ते वैध-अवैध मार्गाने संपत्ती गोळा करत असतात.

'मी आज हे मिळवले; उद्या ते मिळवीन. आज मी या शत्रूला मारले, मी इतरांनाही मारून टाकणार आहे. मी बलवान आहे. माझ्याजवळ अमाप संपत्ती आहे. माझी बरोबरी कोण करू शकेल? नावलौकिक मिळावा म्हणून मी यज्ञयाग करेन, दानधर्म करेन आणि मजा करेन.' स्वतःशीच मोठ्या खुषीत ते असे बोलत असतात. अशा प्रकारे भ्रमजालात सापडून ते नरकाच्या वाटेला लागतात.

'अशा प्रकारच्या प्रकृतीचे लोक अहंकाराला बळी पडून इतरांबद्दल वाईट बोलतात आणि सर्व भूतमात्रांच्या अंतःकरणात राहणा-या ईश्वराचा तिरस्कार करतात. त्यामुळे स्खलित लोकांच्या पोटी त्यांना वारंवार जन्म घ्यावा लागतो.

'नरकाला आत्मविनाशाकडे नेणारी तीन दारे असतात - काम, क्रोध आणि लोभ. त्यामुळे या सर्वांचा आपण त्याग केला पाहिजे. त्यांच्यापासून तोंड फिरवून सरळ आणि अरुंद वाटेने जे चालू लागतात ते परमधामाला पोहोचतात.

'जो माणूस अनादी सिद्धांतरुपी शास्त्रांकडे ('शास्त्रविधी' या शब्दाचा गांधीजींनी 'अनासक्तियोग'मध्ये जो अर्थ केला तो असा आहे - 'शास्त्रविधीचा अर्थ धर्माने मान्यता दिलेल्या अनेक क्रिया नाहीत तर अनुभव आणि ज्ञान असलेल्या सत्पुरुषांनी आचरिलेला मार्ग.) दुर्लक्ष करतो आणि स्वतः ऐषारामात दंग होतो त्याला योग्य मार्गाने मिळणा-या सुखाचा आणि आनंदाचा लाभ होऊ शकत नाही.

'त्यामुळे काय केले पाहिजे आणि काय करायला नको हे ठरवताना तू विद्वान लोकांकडून मूलभूत अविकारी तत्त्वांचे ज्ञान मिळवले पाहिजे आणि त्याबद्दल सारासार विचार करून सुज्ञपणाने वागले पाहिजे.'

## अध्याय सतरावा

येरवडा मंदिर,
१४-२-'३२

अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाला विचारले, 'जे लोक प्रचलित नीतिनियमांचा आणि शास्त्रांचा त्याग करून श्रद्धापूर्वक देवाधिकांची पूजा करतात त्याचे काय होते?'

श्री भगवान म्हणाले, 'सत्त्व, रज आणि तमोगुणांवर आधारित श्रद्धा तीन प्रकारच्या असतात. आणि जशी माणसाची श्रद्धा असेल तसाच तो होतो.

‘सात्त्विक लोक ईश्वराची भक्ती करतात, रजोगुण असलेले लोक यक्ष आणि राक्षसांची पूजा करतात, तर तमोगुणी मृतात्म्यांची भक्ती करतात.

‘माणसाची प्रकृती कशी आहे ते एकाएकी सांगता येत नाही. त्या प्रकृतीचे बरोबर आकलन होण्याकरिता आपल्याला त्याच्या खाण्यापिण्याची, राहणीची, यज्ञादिकांची आणि दानधर्माची माहिती असणे आवश्यक आहे.

‘जो यज्ञ एकाग्र चित्ताने व निरपेक्ष भावनेने कर्तव्य म्हणून पार पाडण्यात येतो तो यज्ञ सात्त्विक आहे असे म्हणता येईल. जो यज्ञ फलाशेने व लोकांना दाखवण्याकरिता करण्यात येतो तो यज्ञ राजस आहे असे म्हणतात. ज्या यज्ञामध्ये धर्मग्रंथांतील नियमांचे पालन केले जात नाही, ज्यात अन्नधान्य वा इतर प्रकारचा दानधर्म करण्यात येत नाही आणि कोणत्याही प्रकारच्या वेदमंत्रांचा घोष करण्यात येत नाही त्या यज्ञाला तामसी यज्ञ म्हणतात.

‘संतत्व, पावित्र्य, ब्रह्मचर्य आणि अहिंसा हे गुण शरीराच्या तपश्चर्येकरिता आवश्यक असतात. सत्यवादिता, प्रसन्न आणि हितावह बोलणे आणि त्याचबरोबर धर्मग्रंथांचा अभ्यास हे वाणीच्या तपश्चर्येचे लक्षण आहे. आनंदी स्वभाव, सौजन्य, शांतपणा, आत्मनिग्रह आणि हेतूची शुद्धता या गुणांनी मनाची तपश्चर्या होते. अशा प्रकारे तन, मन आणि वाणीद्वारे फलाशा न ठेवता समतोल भावनेने तपश्चर्या करण्यात येते तेव्हा त्या तपश्चर्येला सात्त्विक म्हणतात. जी तपश्चर्या दाखवण्याकरिता वा नावलौकिकाकरिता करण्यात येते ती तपश्चर्या राजसी असते. दुराग्रही मूर्ख आत्मक्लेशाद्वारे अथवा इतरांचा छळ करून जी तपश्चर्या केली जाते ती तामसी असते.

‘फलाशा न ठेवता निरपेक्षपणे जे दान ‘योग्य ठिकाणी, योग्य वेळी व सत्पात्री’ करण्यात येते आणि ज्याला आपण दान देतो ती व्यक्ती दान घेण्याकरिता पात्र आहे अशी आपली खात्री असते ते दान सात्त्विक असते. मोबदल्याच्या अपेक्षेने कुरकुरत वा मागेपुढे पाहत जे दान करण्यात येते ते राजसी दान असते आणि जे दान आदरसत्कार न करता अपमान करून

देण्यात येते, स्थळ, काळ आणि पात्रता यांचे औचित्य न पाहता देण्यात येते त्या दानाला तामसी म्हणतात.

'वेदांमध्ये ब्रह्माचे वर्णन 'ओम, तत्, सत्' असे करण्यात आले आहे. त्यामुळे श्रद्धाळू लोक जेव्हा त्याग, दान वा तपश्चर्येचे कर्तव्य पार पाडतात तेव्हा ते 'ओम्' हा पवित्र शब्द उच्चारतात. हे एकच अक्षर ब्रह्माचे प्रतिनिधित्व करते. 'तत्' म्हणजे 'ते'. आणि सत् म्हणजे सत्य, हितकारी. म्हणजे ईश्वर एकच आहे आणि तोच एकटा आहे. तो एकटाच सत्य आहे आणि जगाचा हितकर्ता आहे. जो कोणी यज्ञ करतो आणि दानधर्म करतो तो तपश्चर्याच करत असतो. त्याला सत्याचे खरे ज्ञान झालेले असते व त्याच्या समर्पण भावामुळे तो सात्त्विक श्रद्धेचा पुरुष म्हणवला जातो. अशा प्रकारचा माणूस जाणीवपूर्वक वा अजाणता योग्य पद्धती सोडून वेगळ्या पद्धतीने जरी काम करत असला तरी तो निर्दोष असतो. परंतु या भावनेशिवाय करण्यात आलेले काम हे श्रद्धेशिवाय करण्यात आलेले आहे असे म्हणता येईल आणि त्यामुळे ते 'असत्' असते.

## अध्याय अठरावा

येरवडा मंदिर,
२१-२-'३२

मागील सगळ्या अध्यायांचे मनन केल्यानंतरही अर्जुनाच्या मनात काही शंका राहिल्या होत्या. त्यामुळे तो म्हणाला, 'गीतेत सांगितलेला संन्यास हा सर्वसामान्यांची धारणा असलेल्या संन्यासापेक्षा वेगळा दिसतो. संन्यास आणि त्याग हे खरोखरच वेगळे आहेत काय?'

या प्रश्नातून व्यक्त झालेल्या अर्जुनाच्या संशयाचे निराकरण करत भगवान कृष्णाने थोडक्यात गीतेचे तत्त्वज्ञान पुन्हा सांगितले - 'काही कर्म इच्छापूर्तीकरिता करण्यात येत असतात. माणसाची अनेक कामे वेगवेगळ्या

इच्छांच्या परिपूर्तीकरिता होत असतात. अशा कर्मांना काम्य कर्म असे म्हणतात. शिवाय शरीरस्वास्थ्य टिकवण्याकरिता आणि सेवेचे साधन म्हणून शरीर निरोगी राहण्याकरिता काही आवश्यक नैसर्गिक कर्म माणसाला करावी लागतात. उदाहरणार्थ श्वासोच्छ्वास, खाणेपिणे, आडवे होणे, बसणे इत्यादी आणि कर्माचा तिसरा प्रकार म्हणजे पारमार्थिक कर्म. याचा अर्थ इतरांची सेवा करण्याकरिता काही कामे करावी लागतात. काम्य कर्मांचा त्याग म्हणजे गीतेचा संन्यास आणि सर्व कर्मफळांचा त्याग म्हणजे गीतेला मान्य त्याग.

'काही लोकांचा विश्वास असतो की आपण कितीही लहान काम केले तरी त्यात काही ना काही दोष राहतोच. असे असले तरी यज्ञाच्या भावनेने करावयाच्या कामांचा म्हणजे इतरांची सेवा करणा-या कर्मांचा माणसाने त्याग करता कामा नये. दान आणि तप यांचा यज्ञातच समावेश आहे. परंतु इतरांची सेवा करतानासुद्धा माणसाने अनासक्तभावाने वागले पाहिजे. असे केले नाही तर त्याच्या कर्मांमध्ये वाईटपण शिरण्याची शक्यता असते.

'कर्तव्यासंबंधीच्या अज्ञानातून केलेला त्याग हा तमोगुणातून जन्माला आलेला असतो असे म्हणतात. एखादे कर्म करण्यात शारीरिक त्रास होत असल्यामुळे ते कर्म सोडून देणे हे रजोगुणाचे लक्षण आहे. परंतु इतरांच्या सेवेकरिता हे कर्म आपण केलेच पाहिजे असे वाटून जेव्हा एखादे कर्म करण्यात येते तेव्हा तो खरोखर सात्त्विक त्याग होतो. या त्यागात सर्व कर्मांचा त्याग करण्यात येत नाही तर कर्तव्य म्हणून केलेल्या कर्माच्या फळाचा व काम्य कर्मांचा तेवढा त्याग करण्यात येतो. जेव्हा सूज्ञ माणूस अशा प्रकारे निःस्वार्थ भावनेने व शुद्ध हेतूने कर्म करतो आणि कर्म करताना स्वतःच्या सुखदुःखाचा विचारही त्याच्या मनात नसतो तेव्हा हे करू की ते करू असा प्रश्न त्याला पडत नाही.

'जी व्यक्ती कर्मफलांचा त्याग करत नाही तिला आपल्या कर्मांचे

स्वाभाविक परिणाम म्हणजे कर्मफळे भोगावीच लागतात; आणि अशा प्रकारे त्या व्यक्तीला कायम बंधनात राहावे लागते. परंतु कर्मफलत्याग करणारा मात्र मुक्त होतो.

'आणि माणसाला आपल्या कर्मफलांची आसक्ती तरी का वाटावी? कोणत्याही व्यक्तीने मीच कर्ता आहे असे समजणे निरर्थक आहे. कोणत्याही कर्माची पूर्तता होण्याकरिता पाच प्रकारच्या कारणांची गरज असते. ती पाच कारणे आहेत - शरीर (अधिष्ठान), कर्ता, विविध साधने, प्रयत्न आणि अखेरचे पण कमी महत्त्व नसलेले दैव.

'ही गोष्ट लक्षात घेतली तर माणसाने 'मी कर्म केले' हा अहंकार सोडून दिला पाहिजे. जो कोणी अहंकारविरहित कर्म करतो तो कर्म करत असूनही अकर्माच राहतो. अर्थातच तो माणूस स्वतःला शून्य करून टाकतो. तो जरी मारत असला तरी तो मारणारा नाही असे म्हणता येते. याचा अर्थ असा होत नाही की एखाद्या माणसात नम्रता असली तर त्याने इतरांना मारले पाहिजे आणि जर त्याने मारले तर दुस-यावर त्याच्या मारण्याचा परिणाम होणार नाही. कारण अशा माणसाकरिता हिंसा करण्यासारखी परिस्थितीच उत्पन्न होऊ शकत नाही.

'तीन गोष्टी अशा आहेत ज्या कर्म करण्याकरिता प्रवृत्त करतात - ज्ञान, ज्ञानविषय (ज्ञेय), आणि ज्ञाता. याशिवाय कर्माचे तीन घटक असतात - कर्ता, (कृत्य), करण (इंद्रिय) आणि क्रिया. जी गोष्ट करायची असते ती ज्ञानविषय असते. ते कर्म करण्याची पद्धती म्हणजे ज्ञान आणि ज्याला ती पद्धती माहीत असते तो ज्ञाता. अशा प्रकारे कर्म करण्याची प्रेरणा झाल्यानंतर माणूस कर्म करतो व त्याची इंद्रिये साधन म्हणून ते कर्म करण्याकरिता काम करतात. अशा प्रकारे विचारांचे कर्मामध्ये परिवर्तन होते.

'सात्त्विक ज्ञानामध्ये दिसणा-या या वैविध्यामागील आवश्यक एकसंधपणा लक्षात येतो. विविध प्राण्यांमध्ये वेगवेगळे आत्मे आहेत असे सांगते ते राजसी

ज्ञान. जे ज्ञान शरीरच सर्व काही आहे असे समजते आणि ज्या ज्ञानाचा तर्काशी संबंध नसतो तसेच सर्व गोष्टी तालासुराशिवाय एकमेकांत मिसळल्या आहेत असे ज्या ज्ञानामुळे वाटते ते ज्ञान तामसी असते असे समज.

'ज्ञानाप्रमाणेच तीन प्रकारची कर्म असतात. ज्या कर्मामध्ये आवडीनिवडीचा काहीही संबंध नसतो आणि व्यक्तिगत लाभाचा विचार नसतो ते कर्म सात्त्विक असते. जे कर्म सुखप्राप्ती, आत्मतुष्टी आणि अस्वस्थता दूर करण्याकरिता करण्यात येते ते राजस कर्म असते. जे कर्म भ्रमामुळे व्यक्तिगत क्षमतेचा विचार न करता करण्यात येते आणि परिणामी ज्यामुळे हिंसा वा इजा होते ते कर्म तामसी असते.

'अशाच प्रकारे तीन प्रकारचे कर्ते असतात. सात्त्विक कर्ता राग किंवा आसक्ती आणि अहंता यांच्यापासून मुक्त असतो आणि तो निग्रही आणि साहसी असतो. कार्याच्या यशामुळे तो नाचत सुटत नाही आणि अपयशामुळे तो दुःखी होत नाही. जो कर्ता कर्मफळांबद्दल आसक्त असतो, ज्याच्या कर्मामध्ये भावना गुंतलेल्या असतात आणि जो हावरट आणि हिंसक असतो तो तामसी कर्ता असतो. एडविन अर्नोल्ड यांच्या शब्दात सांगायचे तर 'सुख आणि दुःखांचा तो आळीपाळीने गुलाम होत असतो.' तामसी कर्ता हा अव्यवस्थित, इतरांचा छळ करणारा, दुराग्रही आणि मत्सरी असतो. थोडक्यात सांगायचे तर त्याच्याजवळ सुसंस्कृततेचा अंशही नसतो.

'बुद्धी, निग्रह, आणि सुख हेही तीन प्रकारचे असतात असे म्हणता येईल.

'कर्म आणि अकर्म यांच्यातील भेद योग्य प्रकारे ओळखू शकते ती सात्त्विक बुद्धी.

'काय केले पाहिजे आणि काय करायला नको हे सांगते ती सात्त्विक बुद्धी.

'कशाला घाबरायचे आणि कशाला घाबरायचे नाही हे सांगते ती सात्त्विक बुद्धी.

'आत्म्यावर कशाचे बंधन येते आणि कशामुळे मुक्ती मिळते हे सांगते ती सात्त्विक बुद्धी.'

(एडविन अर्नोल्ड)

राजस बुद्धी हे अंतर पाहण्याचा प्रयत्न करते परंतु सामान्यपणे नेमकेपणाने तसे करण्यात तिला अपयश येते आणि तामसीबुद्धीला तर 'चुकीची गोष्टच बरोबर आहे असे वाटत असते आणि इतर सर्व चांगल्या गुणांकडेही ती दोषैकदृष्टीने पाहत असते'. (एडविन अर्नोल्ड)

'निग्रह म्हणजे एखाद्या गोष्टीची जबाबदारी घेणे आणि कितीही अडचणी आल्या तरी तिला चिकटून राहणे. कमी अधिक प्रमाणात प्रत्येत गोष्टीत निग्रह हा असतोच. असे नसते तर हे जग क्षणभरही टिकू शकले नसते. मन, प्राण आणि इंद्रिये यांच्यामध्ये जेव्हा योग्य समतोल राखण्यात येतो तेव्हा निग्रह सात्त्विक असतो. ज्या निग्रहामुळे सुख आणि संपत्ती मिळावी व वैयक्तिक लाभ व्हावा म्हणून माणूस आपल्या कर्तव्याला चिकटून राहतो तो निग्रह राजसी आणि ज्या निग्रहामुळे माणूस निद्रा, भय, चिंता, दुःख आणि उन्मत्तपणाला सोडत नाही तो निग्रह तामसी असतो.

'सात्त्विक सुख हे असे सुख असते जे, 'सुरुवातीला विषासारखे कटू वाटते परंतु अंती त्याचा परिणाम अमृतासारखा गोड होतो' (एडविन अर्नोल्ड) व ख-या आत्मज्ञानातून त्याचा जन्म होतो. उलट राजसी सुखाचा जन्म इंद्रिय सुखाच्या लालसेतून होत असतो. 'सुरुवातीला ते अमृतासारखे गोड वाटत असले तरी अंती त्याचे परिणाम विषासारखे कटू होतात.' (एडविन अर्नोल्ड) ज्या सुखाचा जन्म निद्रा, आळस आणि प्रमाद यांच्यामधून होतो ते सुख सुरुवातीपासून अंतापर्यंत कटूच असते.

'अशा प्रकारे सत्त्व, रज व तम हे प्रकार प्रत्येक गोष्टीला लागू होतात. चार वर्णांची कर्तव्येही त्यांच्या आनुवंशिक गुणांचे प्राबल्य पाहून ठरवण्यात आली आहेत.

‘मनोनिग्रह, तप, शुद्धता, क्षमाभाव, स्पष्टवक्तेपणा, चातुर्य, ईश्वरावरील श्रद्धा आणि त्याचा अनुभव हे गुण ब्राह्मणाच्या आचरणात असणे आवश्यक आहे. शौर्य, तेज, धैर्य, चातुर्य, युद्धातून पळ न काढणे ही सगळी क्षत्रियाची कर्तव्ये आहेत. शेती, गोपालन, प्रामाणिकपणाचा व्यापार ही क्षत्रियाच्या कामाची वैशिष्ट्ये असली पाहिजेत. शूद्राचे काम सेवा करणे आहे. याचा अर्थ असा नाही की एका वर्गातील सदस्यामध्ये दुस-या वर्गातील सदस्याचे गुण येऊच शकत नाहीत अथवा एका वर्गातील व्यक्तीने दुस-या वर्गाचे गुण अंगी बाणवण्याकरिता प्रयत्नच करू नये. परंतु वरील गुणांचा आणि कर्मांचा उपयोग माणसाचा वर्ण ओळखण्याकरिता आहे. जर प्रत्येक वर्गाचे गुण आणि कर्तव्य लक्षात ठेवले गेले तर समाजातील अनावश्यक स्पर्धा वा द्वेषभावना नाहीशी होईल. इथे उच्च प्रतीचा वा कमी प्रतीचा असे प्रश्नच उपस्थित होत नाहीत. माणसाने आपले कर्तव्य आपल्या प्रकृतीधर्माप्रमाणे निःस्वार्थ भावनेने पार पाडले तर तो माणूस परिपूर्ण होईल. त्यामुळे आपले स्वतःचे कर्तव्य; जरी ते निरर्थक वाटत असले आणि इतरांचे काम सोपे वाटत असले तरी इतरांच्या कर्तव्यापेक्षा आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणे आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य श्रेष्ठ असते. स्वाभाविकपणे माणसाच्या वाट्याला आलेले कर्तव्य त्याने पार पाडले तर तो पापांपासून आणि स्वार्थी इच्छांपासून मुक्त होऊ शकतो. इतर वर्गांच्या वाट्याला आलेले काम करण्याची इच्छा आपले कर्तव्य पार न पाडता इतर काही करण्याची इच्छा स्वार्थीपणामुळे होत असते, अग्नी ज्याप्रमाणे धुराने मलीन होतो त्याप्रमाणे इतरांकरिता असलेले कर्तव्य आपल्याकरिता दोषपूर्ण असते. स्वाभाविकपणे आपल्या वाट्याला आलेले काम फळाची अपेक्षा न करता आपण पार पाडले तर त्या कामामधील बंधन निर्माण करण्याची शक्ती निघून जाते.

‘अशा प्रकारे जो आपले कर्तव्य शांतपणे पार पाडतो तेव्हा तो पापमुक्त होतो. त्याचे मन त्याच्या नियंत्रणात असते, त्याने कर्मेंद्रियांच्या पाचही

विषयांचा त्याग केलेला असतो, तो आवड आणि नावड यांच्या पलीकडे गेलेला असतो, तो एकांतवासात राहत असतो म्हणजे त्याची दृष्टी अंतर्मनाकडे वळलेली असते, त्याने आपल्या मनावर, शरीरावर आणि वाणीवर स्वामित्व मिळवलेले असते. ईश्वराच्या जिवंत अस्तित्वाची त्याला सदैव जाणीव असते आणि त्याने अहंकार, कामना, क्रोध, लोभीपणा वगैरे सारख्या गोष्टींचा त्याग केलेला असतो - असा योगी ब्रह्माशी एकरूप होण्याकरिता पात्र असतो. तो सर्व लोकांकडे समभावनेने पाहतो. त्याला हर्षोन्मादही होत नाही आणि दुःखामुळे तो कुढतही बसत नाही. अशा प्रकारच्या भक्ताला ईश्वराचे खरे ज्ञान झालेले असते आणि तो त्याच्या भक्तीत लीन झालेला असतो. अशा प्रकारे माझ्यामध्ये आश्रय घेऊन तो चिरंतन स्थान मिळवतो.

'त्यामुळे हे अर्जुना, जे काही तुझे असेल ते सर्व तू मला समर्पित कर. तुझ्या प्रेमाचा सर्वोच्च विषय मीच आहे असे समज. हे लक्षात घेऊन तुझे चित्त माझ्यावर केंद्रित कर. ज्याक्षणी तू असे करशील त्या क्षणीच तुझ्या सर्व अडचणी दूर होतील. परंतु अहंकारामुळे तू माझे ऐकले नाहीस तर तुझा विनाश होईल. सर्व प्रकारच्या परस्पर विरोधी दृष्टिकोनांचा विचार करणे सोडून तू केवळ माझ्या आश्रयाला ये. असे केलेस की तू पापांपासून मुक्त होशील.

'हे सत्य तू अशा कोणत्याही व्यक्तीला सांगू नकोस जी माझी भक्त नाही, जिच्यामध्ये तपस्वी वृत्ती नाही व जी माझा तिरस्कार करते. परंतु जी व्यक्ती माझे हे महान रहस्य माझ्या भक्तांना सांगेल ती व्यक्ती आपल्या भक्तिभावनेमुळे नक्कीच माझ्याकडे येईल.'

अशा प्रकारे कृष्ण आणि अर्जुन यांच्यामधील सर्व संभाषण धृतराष्ट्राला सांगितल्यानंतर संजय म्हणाला, 'जिथे कुठे योगीराज कृष्ण असेल आणि धनुष्यबाणासह अर्जुन असेल तिथे उत्कर्ष, जय, सुख आणि मूलभूत

नैतिकता या गोष्टी असतील.'

कृष्णाला इथे योगीराज हे विशेषण लावण्यात आले आहे. याचा अर्थ आध्यात्मिक अर्थावर आधारित शुद्ध ज्ञान आणि अर्जुनाचा धनुर्विद म्हणून उल्लेख केला आहे. याचा अर्थ जिथे कुठे अशा प्रकारच्या ज्ञानाने परिपूर्ण कर्म करण्यात आलेले असेल तिथे कर्त्याच्या उच्च नैतिकतेच्या विरोधात नसलेल्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

## परिशिष्ट १

### श्री वालजीभाई देसाई यांची प्रस्तावना

गांधीजींच्या गीतेचा गुजराती अनुवाद १२ मार्च १९३०ला प्रकाशित झाला होता. हा दिवस कधीही विसरता येण्यासारखा नाही कारण त्या दिवशी साबरमती येथून दांडी यात्रेला सुरुवात झाली होती. आश्रमातील ज्या सदस्यांनी तो अनुवाद वाचला त्यांनी तो समजण्याकरिता कठीण वाटतो अशी तक्रार त्यावेळी येरवडा तुरुंगात असलेल्या गांधीजींकडे केली. त्यामुळे गांधीजींनी आश्रमातील सदस्यांना पत्रांची एक मालिका लिहिली. त्या मालिकेत त्यांनी प्रत्येक अध्यायाकरिता एकेक पत्र लिहिले होते. पहिले पत्र त्यांनी १२ व्या अध्यायावर ४ नोव्हेंबर १९३० ला लिहिले आणि नंतरची पत्रे क्रमशः इतर अध्यायांवर लिहिली. याच पत्रांचा इथे इंग्रजीत अनुवाद करण्यात आला आहे.

वालजी देसाई

शके २०१६, पौष वद्य तृतीया

## परिशिष्ट २

श्रीयुत वालजी गोविंदजी देसाई यांनी इंग्रजी अनुवादला जोडलेल्या टिपा.

### अध्याय बारा

'जेव्हा गीता पाठ असणा-या व्यक्तीला मी भेटतो, तेव्हा त्या व्यक्तींबद्दल मला आदर वाटतो... परंतु ते पाठांतर करणा-याला मला सांगावेसे वाटते की गीतेचे केवळ पाठांतर पुरेसे नाही. त्यामुळे गीतेच्या अर्थावर आणि संदेशावर चिंतन आणि मनन करण्याकरिता मदत होईल. चिकाटीने प्रयत्न केला तर पोपटाकडूनसुद्धा गीता पाठ करून घेता येईल. परंतु असे पाठांतर केल्यामुळे तो अधिक विद्वान होणार नाही. गीतेच्या लेखकाने जसे अपेक्षिले आहे तसे गीतेचे पाठांतर करणा-याने व्हायला पाहिजे - बृहदार्थाने त्याने योगी झाले पाहिजे. गीता आपल्या वाचकांकडून विचार, वाणी आणि वर्तन या सर्वांमध्ये संपूर्ण समतोलपणाची आणि सुसंवादाची अपेक्षा करते. ज्याच्या वाणीचा आणि वर्तनाचा विचारांशी मेळ नसतो तो दांभिक वा थापाड्या असतो. (मो. क. गांधी, 'हिंदू धर्म' नवजीवन १९५०, पृष्ठ १७०-७१)

भक्ती म्हणजे केवळ ओठांची हालचाल नाही. तो मृत्यूशी दिलेला लढा असतो.....

(ती) कोमल अंतःकरणाचे मोकळेपणे केलेले प्रकटीकरण असते. (तिला) बाह्य गोष्टींशी फार कमी घेणेदेणे असतो. इच्छा असेल तर भक्त जपमाळेचा वा कपाळावरील गंधाचा वा हवन आदींचा उपयोग करू शकतो. परंतु या गोष्टींवरून त्याच्या भक्तीची परीक्षा होऊ शकत नाही....

'भक्तासंबंधी लोकांचा असा समज आहे की ती माळ फिरवत जप करणारी व्यक्ती असते आणि त्याच्या माळ जपताना आड एखादे आवश्यक काम आले तरी ती ते करत नाही. असा भक्त ती माळ जपण्याचे काम केवळ खाण्यापिण्यासारख्या गोष्टींकरिताच सोडतो, गहू वगैरे दळण्याकरिता

वा आजा-याची सेवा करण्याकरिता तो ती माळ जपण्याचे काम थांबवत नाही.

परंतु गीता सांगते, 'कोणीही आपल्या ध्येयापर्यंत कर्म केल्याशिवाय पोहोचू शकत नाही...' (मो. क. गांधी, 'हिंदू धर्म' नवजीवन १९५०, पृष्ठ १६०-६१, परिच्छेद ९, १०, १३)

वृंदावनात श्रीकृष्णप्रेम यांनी एका वैष्णवाला विषमज्वराने मरताना पाहिले. त्या वैष्णवाच्या आजूबाजूने अनेक वैष्णव येत जात होते. त्यांच्या हातामध्ये माळ होती आणि ते जप करत चालले होते. परंतु त्या मरणा-या वैष्णवाला पेलाभर पाणी देण्याकरिताही कोणी थांबत नव्हता. अशा भक्तीचा काय उपयोग? असे गांधीजींनी विचारले. (पहा गांधीजींचे सर्च फॉर ट्रुथ, पृष्ठ २६)

## अध्याय पहिला

'माझ्या मते दुर्योधन आणि त्याच्या पक्षातील लोक हे माणसाच्या हीन इच्छांचे प्रतीक आहेत आणि अर्जुन आणि त्याच्या पक्षातील लोक हे माणसाच्या उच्च आकांक्षांचे प्रतिनिधी आहेत. रणभूमी आपला देह आहे. या दोन पक्षांमध्ये सतत संघर्ष सुरू असतो.... कृष्ण आपल्या अंतःकरणात राहणारा आहे. शुद्ध अंतःकरणामध्ये तो सतत कुजबुजत असतो. घड्याळाप्रमाणेच हृदयालासुद्धा शुद्धतेची चावी द्यावी लागते. असे केले नाही तर आत राहणारा तो बोलणे बंद करतो. (मो. क. गांधी, 'हिंदू धर्म' नवजीवन १९५०, पृष्ठ १५६)

## अध्याय दुसरा

'इंग्रज मित्रांनी मला गीता वाचण्याकरिता प्रवृत्त केले... त्यांनी माझ्यासमोर एडविन अर्नोल्ड यांनी केलेला गीतेचा सुंदर अनुवाद ठेवला. मी गीतेचे मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत वाचन केले. मी तिच्यामुळे भारून गेलो. दुस-या

अध्यायाचे शेवटचे १९ श्लोक माझ्या हृदयावर कायम कोरले गेले आहेत. त्यांच्यामध्ये माझ्याकरिता आवश्यक असे सगळे ज्ञान आहे. त्यातून शिकवण्यात आलेले सत्य हे 'चिरंतन स्वरूपाचे' आहे.'

'गीतेचा अर्थ लावण्याची गुरुकिल्ली त्या श्लोकांमध्ये आहे.'(मो. क. गांधी, 'हिंदू धर्म' नवजीवन १९५०, पृष्ठ १५२)

गीतेचा संदेश दुस-या अध्यायात सापडतो. कृष्ण स्थितप्रज्ञाच्या लक्षणासंबंधी, मानसिक समतोलपणाविषयी जे बोलतो त्यात हा संदेश आहे. ही अवस्था कशी प्राप्त करून घेता येऊ शकते ते कृष्णाने या अध्यायाच्या शेवटच्या १९ श्लोकांमध्ये सांगितले आहे. तो सांगतो की ही अवस्था आपल्या कामनांचा त्याग करून आपण प्राप्त करून घेऊ शकतो. आपल्या सर्व इच्छा मारल्यानंतर आपल्या भावाला मारणे शक्य होत नाही.' (मो. क. गांधी, 'हिंदू धर्म' नवजीवन १९५०, पृष्ठ १७९)

आसक्तिविरहित होऊन आपले कर्तव्य पार पाडण्याचा संदेश गीतेमध्ये देण्यात आला आहे, हे दाखवण्याचा मी प्रयत्न केला आहे. गीतेच्या या उपदेशाचा विषय दुस-या अध्यायात मांडण्यात आला आहे व त्या उपदेशानुसार आचरण करण्याचा मार्ग तिस-या अध्यायात दाखवण्यात आला आहे. हे सांगण्याचा अर्थ असा नाही की गीतेच्या इतर अध्यायांना काहीही महत्त्व नाही. उलटपक्षी गीतेतील प्रत्येत अध्यायाला त्याचे स्वतःचे महत्त्व आहे.

जे लोक या समारंभात (गीताजयंती) भाग घेत आहेत ते गीतेकडे योग्य दृष्टीने पाहतील आणि या उदात्त काव्यातील संदेशानुसार जीवनात आचरण करतील अशी मला आशा आहे. (मो. क. गांधी, 'हिंदू धर्म' नवजीवन १९५०, पृष्ठ १८२)

१७ नोव्हेंबर १९५६ला 'द टाईम्स ऑफ इंडिया'मध्ये एक निनावी पत्र आले होते. ते या विषयाशी चपखलपणे जुळते. गीतेच्या तत्त्वज्ञानावर एक

उत्तम भाष्य म्हणून त्या पत्राकडे पाहता येईल -

'प्रार्थनेकरिता गोळा झालेल्या लोकांनी उद्याकरिता (२५ डिसेंबर रविवार, ट्रिनिटीनंतरचा दिवस.) प्रार्थना केली - ज्यांनी 'उत्तम कामाचे फळ' समोर आणले त्यांना 'ईश्वराने पारितोषिक दिले पाहिजे'. इथे नैतिकता आणि धर्म यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झालेला आढळतो. कारण चांगले कृत्य कोणत्याही पारितोषकाच्या अपेक्षेने करता कामा नये असा नैतिकतेचा आग्रह असतो आणि 'कर्तव्याकरिता कर्तव्य' हे नैतिकतेचे घोषवाक्य आहे. धर्म सांगतो की ईश्वर चांगल्या आणि वाईट गोष्टींमध्ये फरक करतो आणि एकाच्या वागण्याला ईश्वराची पसंती मिळते तर दुस-याच्या वर्तनाबद्दल शिक्षा करण्यात येते. नेहमीच्या पद्धतीने हीच गोष्ट सांगायची तर शिक्षा आणि पारितोषिक या शब्दांचा उपयोग आपण करू शकतो.

'येशूने स्वतःच असे विचारले नव्हते काय, 'माणसाने जर आत्मा गमावला आणि संपूर्ण जग जिंकले तरी त्याचा काय फायदा?' जी सेवा स्वार्थाने बरबरटलेली नसते तीच ईश्वराची खरी सेवा असते या गोष्टीचा स्पष्ट पुरावा येशूच्या आयुष्यातून मिळतो. येशूला जरी हे माहीत होते की त्याच्या भक्तीमुळे त्याला जवळच्या मित्रांना मुकावे लागेल आणि व शत्रूंच्या हातून त्याला मरण पत्करावे लागेल. क्रॉस आठवण करून देतो की ईश्वरावरील निष्ठा आणि माणसावरील प्रेम यांच्याबद्दल काही पारितोषिक मिळणारच असेल तर ते पारितोषिक भौतिक लाभापेक्षा इतर काही तरी असले पाहिजे.

'मग गोळा झालेले लोक ज्या पारितोषिकाबद्दल बोलत होते ते पारितोषिक कोणते? याचे उत्तर पुढील शब्दांमध्ये सापडू शकेल - 'अंतःकरणाने शुद्ध असलेल्या लोकांवर ईश्वराची कृपा असते कारण त्यांना ईश्वराचे दर्शन होणार असते.' सेवा करणे चांगले आहे असे वाटले पाहिजे एवढ्याकरिता सेवेचे बक्षीस सेवेशी जोडायचे नसते. सेवेचे बक्षीस सेवेसारखेच सेवेच्या

वर्गातील असते. ईश्वराची अंत:करणापासून केलेली भक्ती आपल्याला त्याच्या गोतावळ्यात नेऊन बसवते आणि आपल्याला त्याच्या इच्छेचे सखोल ज्ञान होते. ईश्वरावरील प्रेमामुळे आपण ईश्वराच्या अजून समीप जाऊ शकतो. ईश्वरी दृष्टी, आपल्या अस्तित्वाला अधिक अर्थपूर्ण करणे, त्याच्या राज्यातील उपक्रमात सहकार्य करण्यामधील आनंद ही ती पारितोषके आहेत जी ईश्वर आपल्या सेवकांना देतो.

'परंतु गोष्ट इथेच थांबत नाही. आत्म्याच्या दृष्टीने दिलेली पारितोषके ही आत्म्याच्याच क्षेत्रातील असतात. हेसुद्धा खरे आहे की चारित्र्य आणि स्पष्टवक्तेपणा यांच्यामुळे निम्न स्तरावरीलही लाभ होऊ शकतात. नेत्याचा प्रामाणिकपणा आणि त्याचा निःस्वार्थी स्वभाव यांच्यावर लोकांचा विश्वास असल्यामुळे जनता त्याच्यामागे गेल्याची आणि त्याला पद आणि सत्ता दिल्याची काही उदाहरणे आहेत. त्याच्यापेक्षा कमी प्रतीच्या व्यक्तीला लोकांनी तसा पाठिंबा दिला नसता हेही शक्य आहे. अतिशय प्रामाणिकपणा आणि संपूर्ण विश्वासार्हता यांच्यामुळे व्यापारात लाभ होऊ शकतो आणि क्षणिक लाभाचा विचार करणा-या व्यापा-यांच्या नशिबी असा लाभ कदाचित येऊ शकणार नाही हेही खरे आहे.

'अशा प्रकारचे वर्तन या लाभापोटी करण्यात आलेले असते असे काही नाही. 'प्रामाणिकपणाच उत्तम धोरण आहे' हे म्हणणे फारच धोक्याचे आहे. लाभापोटी प्रामाणिकपणाची निवड करणा-या व्यक्तीच्या लक्षात आले की प्रामाणिकपणामुळे फायदा होत नाही तर ती ते धोरण बदलूही शकते. उलटपक्षी प्रामाणिकपणासारख्या सद्‌गुणांचे आचरण जेव्हा आपण केवळ त्या गुणांकरिता करतो तेव्हाच त्या गुणांच्या आचरणात आपण यशस्वी झालो असे म्हणता येईल. धर्म आणि नैतिकता यांचे पालन जेव्हा स्वार्थापोटी करण्यात येते तेव्हा त्यांची हानी होत असते. सद्‌गुणाच्या आचरणाचे बक्षीस म्हणून आपल्याला ईश्वरी दृष्टी मिळते आणि जे नफानुकसानीचा विचार न

करता सद्‌गुणानुसार आचरण करतात त्यांनाच हे बक्षीस मिळते.

'येशू म्हणाला होता की जो कोणी त्याचा जीव वाचवील तो स्वतःचा जीव गमावील आणि जो आपला जीव गमावण्याकरिता तयार असेल त्याला वास्तवात असे आढळून येईल की त्याने आपला जीव वाचवलेला आहे. येशूच्या या वक्तव्याचा जो आशय आहे तोच आशय 'सद्‌गुणाच्या आचरणाचे बक्षीस म्हणून आपल्याला ईश्वरी दृष्टी मिळते' आणि 'हे बक्षीस त्यांनाच मिळते जे नफानुकसानीचा विचार न करता सद्‌गुणाखातर सद्‌गुणानुसार आचरण करत असतात' या विधानांतूनही व्यक्त होतो. देव त्याच निवडक लोकांचा सहवास पसंत करतो जे सत्य आणि सदाचाराचे पालन सत्य आणि सदाचाराकरिताच करतात आणि आपल्या या आचरणाचा उपयोग काय?, असा प्रश्नही ज्यांच्या मनात उपस्थित होत नाही. इग्निशस लॉइला यांच्या शब्दात, 'ते प्रयत्न करतात आणि कोणताही मोबदला मागत नाहीत कारण आपण ईश्वराचे काम करतो आहोत हे त्यांना माहीत असते.'

## संदर्भग्रंथ सूची

१) एम. के. गांधी - द गॉस्पेल ऑफ सेल्फलेस ॲक्शन, नवजीवन
२) एडविन अर्नोल्ड - द साँग सेलेस्टियल, किताबिस्तान
३) ॲनी बेझंट - भगवद्गीता, नटेसन
४) स्वामी प्रभवानंद आणि क्रिस्तोफर इस्थरवुड - द साँग ऑफ गॉड, मेंटर बुक्स
५) एस. राधाक्रिष्णन - द भगवद्गीता, द भगवद्गीता, जॉर्ज ॲलन अँड अनविन
६) श्री क्रिष्ण प्रेम - द योग ऑफ भगवद्गीता, वॅटकिन्स
७) आर. सी. झिनर - ॲट संडे टाईम्स, फेबर अँड फेबर